# तृतीय वर्ष कला
# सत्र - VI (CBCS)

## ग्रामीण विकास अभ्यासपत्रिका क्र. VIII
## ग्रामीण भागाच्या ज्वलंत समस्या

## विषय कोड : 86660

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रो. सुब्रत कुमार साहू**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक व लेखक** : **डॉ.बारी भुवनेश एच.**
ग्रामीण विकास विभाग प्रमुख,
श्रॉफ महाविद्यालय, चिंचणी,
ता. डहाणू, जि. पालघर

**लेखक :** : **प्रा. एम. जे. कडु**
३०१, एडन एन. एक्स.,
लक्ष्मी नारायण मंदिराजवळ,
मासोली, ता. डहाणू, जि.पालघर,

: **प्रा. नितिन खरात**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | भूप्रदुषण भाग - १ | ०१ |
| २) | भूप्रदुषण भाग - २ | १४ |
| ३) | ग्रामीण बेरोजगारी | २५ |
| ४) | शेतजमिनीवरील लोकसंख्येचा भार | ३७ |
| ५) | स्थलांतर - प्रकार, कारणे आणि उपाय | ४५ |
| ६) | ग्रामीण दारिद्र्य - १ | ६० |
| ७) | ग्रामीण दारिद्र्य - २ | ८३ |
| ८) | भारतीय अर्थव्यवस्था व नवीन आर्थिक धोरण - भाग १ | ९२ |
| ९) | जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण | १०४ |


❖❖❖❖

# ग्रामीण विकास
# पेपर क्रमांक आठ
# ग्रामीण विकासातील ज्वलंत समस्या
# सत्र- सहा
# Subject Code: UARD- 605

**घटक- ५) भू- प्रदूषण**

१. भू- प्रदूषणाची संकल्पना आणि विविध कारणे.
२. भू- प्रदूषणाचे परिणाम.
३. भू- प्रदूषणावर उपाययोजना.

**घटक- ६) शेतजमीनीवरील लोकसंख्येचा भार**

१. ग्रामीणबेरोजगारी - संकल्पना , प्रकार, आणिकारणे
२. शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण - कारणे आणि परिणाम
३. स्थलांतर- प्रकार, कारणे आणि उपाययोजना

**घटक- ७) ग्रामीण दारिद्रय**

१. दारिद्र्य - संकल्पना आणि प्रकार
२. दारिद्र्य - कारणे व परिणाम
३. दारिद्रय निर्मुलनासाठी उपाययोजना

**घटक- ८) नवीन आर्थिक धोरण आणि त्यांचे परिणाम**

१. नवीन आर्थिक धोरण- उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण.
२. नवीन आर्थिक धोरणांचा शेती आणि ग्रामीण कारागिरांवर झालेला परिणाम
३. ग्रामीण विभागात खाजगी बँका व बाजारपेठेत भांडवलदार वर्गाचा शिरकाव

❖❖❖❖

# १

## भूप्रदूषण – भाग १

**घटक रुपरेषा :**

१.० उद्देश

१.१ प्रस्तावना

१.२ प्रदुषण म्हणजे काय?

१.३ प्रदुषणाचे मुख्य प्रकार

१.४ भू-प्रदुषण म्हणजे काय?

१.५ जमीन प्रदुषणाची कारणे

१.५.१ नैसर्गिक कारणे

१.५.२ मानव निर्मित कारणे

१.५.३ सांड पाण्यातील वाढ व वाढती लोकसंख्या

१.६ सारांश

१.७ स्वाध्याय

१.८ संदर्भ ग्रंथ

## १.० उद्देश

१) जमीनीचे महत्व अभ्यासणे.

२) जमीनीच्या कार्याचा आढावा घेणे.

३) प्रदुषण आणि जमीन प्रदुषणाची संकल्पना अभ्यासणे.

४) शेती व्यवसायातील जमीनीचे महत्व अभ्यासणे

५) जमीन प्रदुषणाच्या कारणाचा आढावा घेणे.

## १.१ प्रस्तावना

मानवी विकासात नैसर्गिक साधन संपत्तीचे महत्व अनन्य साधारण आहे. मानवाचा विकास नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतो. मानवाने कितीही वैज्ञानिक प्रगती केली तरी निसर्ग नियमाच्या बाहेर जाऊन त्याला कोणतेच काम करता येत नाही. भारतासारख्या विकसनशील देशाला जमीन, पाणी, जंगल, हवा, वनस्पती प्राणी या नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता पुरेशा प्रमाणात झालेली आहे.तिचा सुयोग्य वापर केल्यास देशाच्या विकासाला गती मिळेल यात कोणतीही शंका नाही.

नैसर्गिक साधन-संपत्ती मध्ये जमीनीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. जमीन ही व्यापक संकल्पना आहे. जमीन या घटकामुळे मनुष्याचे जीवन सुसह्य झाले आहे. शुद्ध अन्न, पाणी, शुद्ध हवा जमिनीमुळेच उपलब्ध होते. आपल्या देशात आजही बहुसंख्य लोकसंख्या शेती पर्यायाने जमिन या घटकांवर अवलंबून आहे. निवारा, उद्योग व्यवसाय यासाठी देखील जमीन घटकाला पर्याय नाही. जमीन ह्या घटकांच्या बाबतीत महत्वाचे वैशिट्य म्हणजे,

१) जमीन हा घटक स्थीर आहे.

२) जमीन या घटकांचे स्थलांतर करता येत नाही.

३) जमीन या घटकांचे उत्पादन करता येत नाही.

४) जमीनीचे उपयोग भिन्न-भिन्न स्वरूपाचे असतात.

निसर्गात जमीन अनेक प्रकारची कार्य करत असते. जलसंधारण, उत्खनन, भरण प्रक्रिया, उत्पादन, जीव-जीवणूंचे वस्तीस्थान, सूर्याच्या उष्णतेचे शोधन व उत्सर्जन, वृक्षांना आधार देणे, मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी इंधन, सावली, ऑक्सीजन ज्या वृक्षामुळे उपलब्ध होते अशी वृक्ष केवळ जमीन या घटकामुळेच अस्थित्वात आहेत.

तथापी जमीन या घटकांच्या कार्यात तंत्रज्ञान व शोधाच्या नावाखाली मानवाचा हस्तक्षेप सातत्याने वाढत आहे. त्यामुळे जमिनीचे संरक्षण, संवर्धन व इष्ट उपाययोजन होण्यापेक्षा अवहेलना आणि असंधारणच मोठ्या प्रमाणात होत आहे.नागरीकरण, खाण उद्योग, दळणवळण, निवारा-निवास, उद्योग धंध्यांची उभारणी यांच्या नावाखाली जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. पर्यायाने कसदार आणि लागवडी खालील जमीन देखील बिगरशेती उपयोगात आणली जात आहे.

अनेक कारणाने जी अनिर्बंध वृक्षतोड होत आहे त्यामुळेच दऱ्या खोऱ्यातील, पठारे-मैदानावरील मातीचा बहुगुणी थर कमी होण्यास मदत होत आहे. जमिनीवरील हा मौल्यवान थर कमी झाल्यामुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. उत्पादन क्षमतेवर होणारा परिणाम पुर्ववत होण्यासाठी कित्येक दशकांचा अवधी लागणार आहे. देशातील दुष्काळी परिस्थितीला अनेकदा मृद आणि जलसंधारण कामाकडे झालेले दुर्लक्ष जबाबदार आहे.

जमिनीवरील मातीचा वरचा थर ही एक अजब किमया आहे. ज्यात अनेक खनिजे आणि जैवकांची रेलचेल आहे. पाणी साठवून धरण्याची आणि गरजेनुसार वनस्पतीला पुरविण्याचे कार्य मातीच्या उपजत गुणधर्मामुळे होते. जेवढा मातीचा कस चांगला तेवढा वनस्पती जीवन समृद्ध होण्यास मदत होते. ऊन, पाऊस, वारा, नद्या-नाले इ. मुळे खनन, वहन, भरण प्रक्रियांना मदत होते आणि कठीण खडकांचे मातीत रूपांतर होते. अशा जमिनीला संपत्तीचे रूप प्राप्त होते.

आज देशाची लोकसंख्या १२५ कोटी पर्यंत पोहचली आहे आणि भूप्रदेश मात्र आहे तेवढाच आहे. देशातील जवळ जवळ ५०% जमीन पडीक आणि खाजगी जमिन, ग्रामपंचायत व शासन वनविभाग, शिक्षणसंस्था, धर्मदायसंस्था, उद्योजक यांचे मालकीची आहे. मोठ्या प्रमाणात जमीनीचे उपयोजन असंतुलीत राहिल्यामुळे भूसंपत्तीचे नुकसान होत आहे. जमीनीच्या बाबतीत संवर्धन आणि व्यवस्थापन या दोनच क्रीया महत्वाच्या आहेत त्यामुळे तिच्या मालकीवर तिची निगा राखणे क्रमप्राप्त होते. जमीनीचा एकात्मिक विचार होणे हिताचे असेत परंतु तिच्या मालकीच्या बाबतीत असणाऱ्या विभाजनामुळे बऱ्याच वेळा उपयोगी निर्णय परस्पर विरोधी व क्वचित प्रसंगी घातक ही घेतले जातात. बऱ्याच वेळा अल्प आकाराची शेती धारण करणारे शेतकरी देखील मोठ्या आकाराची शेती धारण करणाऱ्या शेतकऱ्याचे अनुकरण करतात आणि आपल्या शेतात ऊसा सारख्या पिकाची लागवड करताना दिसतात. डोंगर उतारावरील खाचरात भात शेती करताना, खालच्या उतारावरील शेतकऱ्यांना दुसर्या कमी पाण्याची आवश्यकता असणाऱ्या पिकाला आसरा देता येत नाही. जमीनीच्या भूआकार संदर्भातील स्थितीच भू उपयोगाचे निर्णय ठरवीत असते. मानवाने आपल्या भौतिक गरजा भागविण्यासाठी विज्ञानाचा आधार घेतला.

विज्ञानाच्या अभूतपूर्व प्रगतीमुळे उद्योगधंद्याची जलद गतीने वाढ होत आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या जमिनीचे क्षेत्रफळ रोज वाढत आहे. त्याचबरोबर मानवनिर्मित कचर्याचे डोंगराएवढे ढीग जमिनीवर हातपाय पसरवीत आहेत. प्रगत राष्ट्रांकडून वारंवार घेतल्या जाणाऱ्या अण्वस्त्रांच्या चाचण्या, लढायांमध्ये वापरला जाणारा अमर्याद व भयानक दारूगोळा या पृथ्वीला विद्रूप जखमा करीत आहेत.त्यामुळे ही जमिनीच्या प्रदुषणाची व्याप्ती व गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच हवेच्या प्रदूषणाचे घटक कालांतराने जमिनीवर येतात. पावसामुळे ते जलद पृथ्वीवर येतात. पाण्याइतकेच ते जमिनीचे प्रदूषण करण्यास हातभार लावतात.

माणूस झपाट्याने जंगलाचा विनाश करीत आहे. त्यामुळे जमिनीचे संरक्षण कवचच नाहीसे झाले परिणामी पावसाने जमिनीच्या वरच्या थराची प्रचंड प्रमाणावर धूप होऊन वरचा उपजाऊ असलेला भागच नष्ट झाला आहे. डोंगरावरची माती, नद्या, तळी व धरणामध्ये जाऊन त्यांची खोली दिवसेंदिवस कमी होत आहे. नद्या आपले पात्र बदलत आहेत. नदीच्या मुखाजवळचा समुद्रकिनारा गाळ साचल्यामुळे उथळ होत असून जलवाहतूक करणाऱ्या बोटींना किनार्यापर्यंत ये-जा करणे अवघड होत आहे. या भागातल्या नैसर्गिक परिसंस्था नष्ट होत आहेत. मच्छीमारी करणाऱ्यांचे मासे नष्ट झाल्याने आर्थिक नुकसान होत आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलेली मोठाली धरणे गाळ साचत असल्याने

त्यांची पाणी साठवणूकीचे क्षमता घटत आहे. साधारणपणे २.५ सें.मीटर जमीन तयार व्हायला १००० वर्षे लागतात. परंतु तिची धूप व्हायला काही वर्षेच पुरेशी असतात.

सुजलाम सुफलाम असलेल्या भारतातल्या नद्या आपल्याबरोबर वाहून आणलेल्या गाळांमुळे जमिन सुपीक करीत असत. परंतु ते दिवस आता इतिहास जमा झाले आहेत.

आता नद्यांमधल्या पाण्यात आणि गाळात प्रदूषणकारी घटक असतात, त्यामुळे जमिनी सुपीक न होता प्रदूषणग्रस्त मात्र होत आहेत. भारतातील बहुतेक सर्वच नद्या माणसाने प्रदूषीत केल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण जमिन प्रदुषणाच्या कारणांचा अभ्यास करणार आहोत. परंतु या अगोदर प्रदुषण ही संकल्पना अभ्यासणे गरजेचे आहे.

## १.२ प्रदुषण म्हणजे काय ?

१) हवा, पाणी, जमीन इत्यादी पर्यावरणातील घटकांमध्ये इतर पदार्थ मिसळत असतात. त्यामुळे त्या घटकाच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांमध्ये बदल घडून येतो. या बदलांमुळे त्या घटकांचा किंवा त्या पदार्थाचा काही उपयोग होत नाही. शिवाय त्याचा प्राणिमात्राच्या आरोग्यालाही धोका पोहोचतो. अशावेळी हे झालेले परिणाम या दोघांनाही प्रदूषण म्हटले जाते ज्या पदार्थांपासून हे प्रदुषण होते त्यांना 'प्रदुषक' म्हणतात.

२) नको असलेल्या – अवाच्छित वस्तू – पदार्थांच्या मिसळण्यामुळे नैसर्गिक अथवा मानवी पर्यावरणावर जो परिणाम होतो त्याला प्रदुषण म्हणतात.

३) हवा, पाणी आणि जमिन त्यांच्या भौतिक, जैविक किंवा रासायनिक द्रव्यांमध्ये झालेल्या ज्या अनिष्ट परिवर्तनामुळे जीवमात्राचे आरोग्य, सुरक्षा आणि कल्याण यांना हानी पोहोचते, त्याला प्रदुषण म्हणतात.

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते कि, मानवाला जगण्यासाठी हवा, पाणी, जमीन जर शुद्ध स्वरूपात मिळणार नसेल तर मानवाला जगणे अशक्य आहे. प्रदुषण ही मानवानेच निर्माण केलेले आहे. हळू हळू आता त्यांचे स्वरूप भयावह होत आहे.

## १.३ प्रदुषणाचे मुख्य प्रकार

अ) हवा प्रदुषण

ब) जल प्रदुषण

क) भूमी प्रदुषण

ड) ध्वनी प्रदुषण

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण केवळ भूमी प्रदूषणाचे अध्ययन करणार आहोत.-

## १.४ भू-प्रदूषण म्हणजे काय?

नैसर्गिक घडामोडी मुळे भू प्रदूषण होत असते. या मध्ये प्रामुख्याने भूकंप, ज्वालामूखी अशा नैसर्गिक घडामोडींमुळे जमिनीमध्ये मोठे बदल होत असतात. नद्यांना आलेल्या पुरामुळे प्रतिवर्षी लाखो हेक्टर जमिनीवरचा थर वाहून जातो तर पावसाचे पाणी आणि वारा यांच्या सततच्या माऱ्यामुळे भूस्खलन होत असते. या सर्व घडामोडी निसर्गतःच घडत असतात. परंतु अशा कृत्यास अनेक वेळा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मानवच जबाबदार असतो. मानवी कृत्यामुळे होणारे भूप्रदुषण अतिशय भयावह आहे.



https://www.hindikidଌniya.com

भूमीच्या भौतिक, रासायनिक किंवा जैविक गुणधर्मात कोणत्याही तर्हेचे जे अनावश्यक परिवर्तन होते किंवा केले जाते आणि ज्या परिवर्तनाचा सजीवावर परिणाम घडून येतो किंवा त्या भूमीचे त्यामुळे नैसर्गिक गुणधर्म आणि उपयोग नष्ट होतात त्याला भू-प्रदूषण म्हणतात.

नैसर्गिक पर्यावरणात रासायनिक, भौतिक किंवा जैविक घटकांमुळे घडूण येणारा कोणताही जीवसृष्टीच्या दृष्टीने घातक बदल म्हणजे भूप्रदूषण होय. जमिनीवरील मृदेची झीज होणे यास मृदा धूप असे म्हणतात.

जमिनीचे सुटे कण दरवर्षी पावसाच्या पाण्याने सोसाट्याच्या वाऱ्यामुळे, एक ठिकाणावरून दुसर्या ठिकाणी वाहून नेला जातो त्यास जमिनीची धूप असे म्हणतात.

पाण्याचा प्रवाह, वारा, चुकीच्या पध्दतीने केली जाणारी शेत जमिनीची मशागत या मुळे शेतीतील अन्नद्रव्याचे प्रमाण घटत जाते. आणि जमिन निकृष्ट बनते यास जमिनीची धूप असे म्हणतात.

उष्ण कटिबंधीय प्रदेशात एखाद्या क्षेत्रात निर्वनीकरण झाले की तिथली माती मोकळी व उघडी पडते, याप्रदेशात पाऊसही खूप असल्याने मृदेची धूप वेगाने व मोठ्या प्रमाणावर होते. नैसर्गिक परिस्थितीही मृदेची धूप असते. परंतु हे प्रमाण अत्यल्प असते. उदाहरणार्थ, सॅन्हाना प्रदेशातील वनांत हेक्टरी ०.०५ ते १.२ टन मृदेची धूप प्रतिवर्षी होत असते. परंतु मानवी हस्तक्षेपामुळे हे प्रमाण वाढू शकते. जसे शेतीच्या विकासामुळे हे प्रमाण सरासरीने ५४ टन प्रतिहेक्टर एवढे असू शकते व काही ठिकाणी हे प्रमाण ३३४ टन एवढे प्रचंड असू शकते. डोंगराळ भागात जर वने मुबलक प्रमाणावर असतील तर मृदेची धूप केवळ ०.०३ टनावर मर्यादित असते, परंतु हे डोंगर जर बोडके झाले तर धुपेचे प्रमाण

प्रती हेक्टरी ९० टनापर्यंत जाऊ शकते. निर्वनीकरणामुळे होणारी मृदेची धूप किती प्रचंड आहे हे आपल्याला पुढील उदाहणावरून स्पष्ट होईल.

१) जावा बेटावर एका ५ महिन्यांच्या पावसाळी मोसमात ८ दशलक्ष क्यु.मी. माती समुद्रात वाहून गेली आहे.

२) भारतात ६००० दशलक्ष हेक्टर मातीची धूप दरवर्षी निर्वनीकरणामुळे होते, म्हणजेच हेक्टरी हे प्रमाण प्रतिवर्षी ३० टन इतके आहे.

३) जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतात धुपेमुळे मातीतील पोषक द्रव्यांचे होणारे नुकसान जर रासायनिक खतांच्या किमतीत मोजले त ती रक्कम ६ अब्ज यु.एस.डालर एवढी होईल.याशिवाय ही वाहून गेलेली माती धरणामध्ये जाऊन बसते व त्यामुळे जलविद्युत उर्जेच्या उत्पादन

क्षमतेत घट होते. अंदाजानुसार ही घट पुढील १५ वर्षात ३ अब्ज यू.एस. डॉलर एवढी असेल.

**आपली प्रगती तपासा :**

मृदा धूप म्हणजे काय ?

## १.५ जमीन प्रदूषणाची कारणे

जमीनीच्या र्हासाची जी विविध कारणे सांगीतली जातात त्यांचे दोन भागात वर्गीकरण करता येईल.

**१.५.१ नैसर्गिक कारणे :**

१) पावसाचे प्रमाण आणि तीव्रता

२) वाऱ्याचा वेग

३) भुस्तर ठेवण

४) जमिनीचे प्राकृतिक आणि रासायनिक गुणधर्म.

५) नैसर्गिक आपत्ती

**१.५.२ मानव निर्मित कारणे :**

१) जंगल तोड

२) अतिरिक्त रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा वापर

३) अतिरिक्त पाण्याचा वापर

४) जलसिंचन प्रकल्प

५) शेती कसण्याच्या अयोग्य पद्धती

६) बांध बंधीस्थीचा अभाव

७) अनियंत्रित चराई-चराऊ रानांचा नाश

८) जमिनीचा मालकी हक्क

९) औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या

१०) ग्रामीण व नागरी वस्त्यांमधून रोज गोळा होणारा कचरा.

**१.५.३ सांडपाण्यातील वाढ व वाढती लोकसंख्या :**

वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी औद्योगिकरणाचा वेग सातत्याने वाढत आहे. औद्योगिकरणासाठी आवश्यक लाकूड, कच्चा माल यासाठी बेसूमार होणाऱ्या जंगल तोडीतून जमिनीची धूप होत आहे. दुसऱ्या बाजूला औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारे टाकावू पदार्थ कचरा व विषारी द्रव्य अनेक कारणाने जमिनीत मिसळले जातात आणि जमिन नापीक होते. अशा विविध कारणामध्ये प्रामुख्याने पुढील मुद्याचा समावेश करता येईल.

अ) औषध निर्माण करण्याच्या कारखान्यातील कचरा

ब) खाणीमधून निघणारा टाकाऊ भाग

क) कोळसा शुद्ध करणारी केंद्रे

ड) औष्णिक वीज निर्मिती केंद्रे

इ) कारखान्यामधील विषारी वायु

ई) सूक्ष्म जंतूमुळे होणारे प्रदूषण

उ) किरणोत्सर्गी टाकाऊ पदार्थ

अशा विविध कारणाने सातत्याने जमिन प्रदुषणात वाढ होत आहे.

**जमिन प्रदुषणाची नैसर्गिक कारणे –**

**१) पावसाचे प्रमाण आणि तिव्रता व वाऱ्याचा वेग –** पाऊस हे सर्वात महत्वाचे धुपीचे कारण आहे. पावसाच्या पाण्याचा थेंबाचा जमीनीवर सरळ आघात झाल्याने शिंतोडे उडून मातीचे कण सैल होतात व पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जातात. मुसळधार पावसामुळे विरून जाण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही त्यामुळे जमिनीची धुप होते. पाणी वाहुन जाण्यामुळे जी धुप होते ती पावसाची तीव्रता किती प्रमाण आणि त्याची वारंवारता यावर अवलंबून असते. असे दिसुन आले आहे की

८० वोर मी.मी. पेक्षा जास्त पाऊस एक दिवसात पडला तर तो नेहमी वाहून धुपीचे कारण बनतो. याचा अर्थ ज्या विभागात अति पाऊस पडतो. तेथील सर्व प्रकारच्या जमिनीची धुप ही होत असते. यासाठी जमिनीवर आच्छादन असावे.

**२) वाऱ्याचा वेग –** वाऱ्यामुळे जमिनीची धुप होत असते. वाळवंटी प्रदेशात होणाऱ्या चक्री वादळामुळे धुळीचे कण दूर अंतरावर उडून जातात वाऱ्याचा जोर कमी झाला की वाळुचा थर सर्वत्र पसरतो. जमिनीचा वरचा थर नष्ट होऊन जमिन नापीक होते.

ज्या भुभागावर पुरेसे वनस्पतीचे आच्छादन नाही आणि जेथे पावसाचे प्रमाण कमी आहे, अशा प्रदेशात मार्च ते एप्रिल महिन्यात तुफानी वाऱ्यामुळे जमिनीच्या वरच्या थरामधील मातीचे कण अलग होतात आणि वाऱ्याबरोबर उडुन जातात आणि जमिनीचा मधला थर उघडा पडतो. त्यामुळेच जमिनीची धुप मोठ्या प्रमाणात होते.

**३) भुस्तर ठेवण –** जमिनीच्या ढाळामुळे पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढतो व त्यामुळे धुपीची गती वाढते. ढाळातील लहान फरकामुळे धुपीच्या नुकसानीत मोठा फरक पडतो. पाण्याच्या प्रवाहाच्या नियमाप्रमाणे ढाळ चारपट वाढवेल तर वाहत्या पाण्याचा वेग दुप्पट होतो. हा दुप्पट वेग धुपीचे प्रमाण चारपट वाढवितो. तर वाहुन नेण्याचे प्रमाण३२ पटीने वाढवितो. याचा अर्थ उताराच्या जमिनीची धुप अधिक होत असते. यावर उपाय म्हणून आडवे समपातळीत चर बांधणे व त्या चरावर व जमिनीवर झाडे किंवा गवत किंवा पिक घेणे जेणे करून वाहत्या पाण्याला अडथळा निर्माण होईल व त्यामुळे पाण्याचा वेग कमी होऊन पाणी जमिनीत मुरेल.

**४) जमिनीचे प्राकृतिक आणि रासायनिक गुणधर्म -** काही जमीनीची धुप त्याच परिस्थितीत इतर जमिनीच्या धुपीपेक्षा जास्त सहज होते. जमिनीच्या पोत- सेंद्रिय पदार्थ, चिकन कणांचा प्रकार आणि क्षारांचे प्रमाण याचा जमिनीच्या धुपीवर परिणाम होतो – रेताड मातीत क्षिरपण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे पाणी ताबडतोब शोषुन घेतले जाते. आणि म्हणून धुप कमी होते. सेंद्रिय पदार्थ जास्त असले तर जमिनीच्या कणीदार रचनेत सुधारणा होते व जमिनीची जलधारणा शक्ति वाढते.जसेजसे सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण कमी होत जाते तसतसे जमिनीतील धुपीचे प्रमाण वाढत जाते. बारीक पोताच्या आणि विम्ल जमिनीची धुप जास्त होत जाते.

**५) नैसर्गिक आपत्ती –** नैसर्गिक आपत्तीमुळे जमिनीची झीज मोठ्या प्रमाणा होऊ शकते. अतिवृष्टी पुर भुकंप इ. विविध कारणाने जमिनीची धुप मोठ्या प्रमाणात होऊन नैसगर्गीक संपत्तीला मोठ्या प्रमाणात हानी पोहचते.

**आपली प्रगती तपासा:**

जमीन प्रदुषणाची नैसर्गिक कारणे सांगा.

**मानव निर्मित कारणे.**

जमीनीचे प्रदुषण नैसर्गिक कारणाबरोबरच मानविय कारणाने देखील होत जाते. यातील प्रमुख कारणे पुढील प्रमाणे.

**१) जंगल तोड -** वाढती लोकसंख्या व औद्योगिक विकास या दोन कारणांमुळे जंगलाचे प्रमाण अतिशय वेगाने कमी होत आहे. जमिनीचे नैसर्गिक आच्छादन म्हणजे पाने, कुरणे, झाडांची मुळे मातीला घट्ट धरून ठेवतात. तसेच वरून पडणारा पाऊस झाडाच्या फांद्या पानावर पडुन मग जमिनीवर पडत असल्याने त्याचा वेग ही मंदावतो. त्यामुळे जमिनीची धुप कमी होते. जंगल नष्ट होत असल्याने ही नैसर्गिक धुप संरक्षण क्रिया कोलमडली त्यामुळे धुपीचे प्रमाण वाढले.

यासाठी देशातील जंगलाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. हे कार्य फक्त शासनाच्या माथी न लादता सर्व जनतेचे सहकार्य याला मिळायला हवे. तरच सरकारचे सामाजिक वनिकरण, वनशेती, फलोधान सारख्या योजना यशस्वी होऊ शकतील. जनतेने देखील वैयक्तिक मालकीच्या जमिनीत, बांधावर, घराच्या अवतीभवती वनीकरण केल्यास काही प्रमाणात जंगल वाढीस हातभार लावला जाईल.

**२) रासायनिक खताचा व किटक नाशकाचा अतिरिक्त वापर –** शेत जमिनीत अतिरिक्त रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर अलीकडे वाढत आहे. पिकांचे स्वरूप बहुउत्पादक झाले आहे. जास्त पिक घेण्यासाठी रासायनिक खतांचा प्रमाणाबाहेर उपयोग होत आहे. रोगराईवर विविध विषारी कीटकनाशकांचा वापर केल्याने जमिनीत ही त्याचा शिरकाव होतो. अशी जमिन दिवसेदिवस अधीक अनुत्पादक होत जाते. कारण त्यातील अन्नघटक सतत लागवडीमुळे व खतांमुळे कमी कमी होत जातात. परिणाम जमिन नापीक होते.

यासाठी रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा प्रमाणात वापर करावा.तसेच रासायनिक खतांपेक्षा सेंद्रिय खते – कंपोस्ट खते, हिरवळीचे खत या खतांचा वापर करावा. त्यामुळे जमिनीची रचना नैसर्गिक राहण्यास मदत होते. याशिवाय पिकांची केरपालट करत राहिल्यास जमिनीतील अन्न घटकांतील संतुलन साधले जाईल.

**३) अतिरिक्त पाण्याचा वापर –** बऱ्याच शेतकऱ्यांची अशी धारणा आहे की जास्त पाणी दिल्यास जास्त पिक येते. काही पिकाच्या बाबतीत हे खरे असले तरी जास्त पाणी लागणारे पिक सतत त्याच जमिनीवर होत राहिल्यास जमिनीची जल धारणा क्षमता कमी होते.त्यात पाण्याचा निचरा होत नाही त्यामुळे अशा जमिनीत पुढे क्षाराचे प्रमाण वाढते व या जमिनी अनुत्पादक होतात. सततपाणी देत राहिल्यामुळे जमिनीतील हवा खेळती राहु शकत नाही. पिकांच्या मुळांना देखिल जास्त पाण्याचा भार वाढतो. जमिनीचे तापमान खाली येते. माती पाणी आणि जिवाणु अनुत्पादक होतात. सतत पाणी देत राहिल्यामुळे जमिनीत हवा खेळती राहु शकत नाही. पिकांच्या मुळांना देखील जास्त पाण्याचा भार वाटतो. जमिनीचे तापमान खाली येते. माती पाणी आणि जिवाणु याचा समतोल ढळतो. परिणामी जमिनीत दिवसें दिवस उत्पादन घटते.

यावर उपाय म्हणजे ज्या पिकाला जितक्या पाण्याची गरज आहे तितकेच पाणी देणे. ऊसा सारख्या भरपुर पाणी लागणाऱ्या पिकापेक्षा कमी पाणी लागणारे दुसरे नगदी पिक घेतल्यास जमिन ही चांगली राहिल. पाण्याची देखिल बचत होईल व असे वाचवलेले पाणी इतर शेतकर्याला वापरता येऊ शकेल. ठिंबक सिंचन, तुषार सिंचन सारख्या जलसिंचनाच्या पद्धती वापरून देखिल हा प्रश्न सोडवता येऊ शकतो.

**४) जलसिंचन प्रकल्प –** अलीकडे पाणी उपलब्धेसाठी मोठी धरणे बांधली जात आहेत. या धरणाखाली कित्येक हेक्टर जमिन वाया जाते. जमिनीचा एक इंचाचा थर तयार होण्यासाठी ५०० वर्षे लागतात व अशी जमिन मोठ्या धरणामुळे पाण्याखाली जाते. त्याचे तिचा वापर करता येत नाही. ह्या दृष्टीने हा जमिनीचा र्हासच आहे.

**५) शेती कसण्याच्या अयोग्य पद्धती –** बऱ्याच वेळा शेतकर्याची पारंपारीक शेती करण्याची पद्धत धुपीला चालना देणारी ठरते. विशेषतः उताराच्या जमिनीवर लागवड करताना ती उभी केली जाते. त्यामुळे वाहत येणारे पाणी अडवले जाऊ शकत नाही हीच लागवड आडवी केली किंवा अति उताराच्या जमिनीत पट्ट्याच्या पायर्या करून शेती केली. वाहत येणाऱ्या पाण्याचा वेग कमी होतो. त्यामुळे त्या पाण्याबरोबर माती वाहुन जात नाही.



https://www.downtoearth.org.in

**६) बांधबंदिस्तीचा अभाव -** उताराच्या जमिनीवर जर बांध बंदिस्ती चांगल्या प्रकारे केली तर पावसामुळे जी जमिनीची हानी होते. ती थांबु शकेल. बांधामुळे वाहत येणाऱ्या पाण्याला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे गती मंद होते व वाहत आलेले पाणी बांधाजवळ अडवली जाते. त्यामुळे ज्या उताराच्या जमिनीवर बांध बंदिस्ती नसते अशा जमिनीची धुप जास्त होते. यासाठी मजबुत बांध बंदिस्त करणे गरजेचे आहे. हे बांध पक्के होण्यासाठी या बांधावर घायपात किंवा खस गवताची लागवड करावी.

**७) अनियंत्रित चराई -** कुरणे व गाय रानाच्या जमिनीची देखिल धुप होते.ही धुप विशेषतः अनियंत्रित चराई मुळे होते. वनात सतत गवत नसते. एकदा गवत संपले की त्याची जी धसकट जमिनी लगत असतात ती कुरतडून गुरे खातात. त्यामुळे जमिनीतील मातीचे कण सैल होतात. अशा गुरामध्ये भांडण झाले किंवा पळापळ झाली किंवा सतत त्यावर गुरे फिरतात ही माती अधिक सैल होते. मग ती वाऱ्यामुळे, पावसामुळे वाहुन जाते यावर उपाय म्हणजे घरातच गुरांना चारा घालणे किंवा ज्यावेळी गवत असेल त्याचवेळी त्या जमिनीत गुरे चारणे गुराची संख्या देखिल गायरानाच्या जमिनीच्या प्रमाणात असावी.

शेताच्या बांधावर किंवा पडीक जमीनीत गवताचे पिक घेतल्यास हा प्रश्न काही प्रमाणात सुटु शकेल.

**८) जमिनीचा मालकी हक्क -** जसजसा विकास होत आहे तसतशी आधुनिक संस्कृती देखिल आपल्यावर परिणाम करत आहे.त्यामुळे विभक्ती कुटुंब पद्धती ग्रामीण भागात वाढत आहे. शिक्षणामुळे, गावकीच्या भांडणामुळे ग्रामीण जनता हळुहळु शहराकडे स्थानिक होत आहे. त्यातच आपल्या देशात वारसा हक्क कायदा दृढ आहे. ह्या सर्व कारणांमुळे जमिनीचे छोट्या छोट्या तुकड्यात विभाजन होत आहे. ह्या विभाजनामुळे बांध बंदिस्ती करावी लागते. या बांधाखाली चांगली जमिन वाया जात आहे.

खाजगी मालकीच्या जमिनीचा ऱ्हास व्हायच कारण म्हणजे शेती हा आता तृतीय क्षेत्रातील व्यवसाय गणला जात आहे. शिक्षण घेऊन सरळ शहरात नोकरी करणे. नव्या पिढीला आवडु लागले आहे. परिणामी गावाकडच्या जमिनी विकुन टाकल्या जातात. औद्योगिक विकासाला ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात चालना देण्यासाठी अनेक प्रकारच्या सवलती दिल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील जमिनीला चांगले भाव यायला लागले. परिणामी जमिन विकुन व्याजावर जगण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. व ह्या जमिनीत मोठमोठे कारखाने वाढु लागले आहेत.

**९) औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या –** वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी औद्योगिकरणाचा वेगही वाढत आहे. औद्योगिकरणासाठी आवश्यक असणारे लाकुड, कच्चा माल यासाठी बेसुमार होणाऱ्या जंगल तोडीतुन जमिनीची धुप होत आहे. दुसर्या बाजुला औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतुन निर्माण होणारे टाकाऊ पदार्थ, कचरा व विषारी द्रव्य जमिनीत मिसळले जातात आणि जमिन नापीक होते.

**१०) ग्रामीण व नागरी वस्त्यांमधुन रोज गोळा होणारा कचरा –** प्रत्येक गावात फार मोठ्या प्रमाणावर विविध कचरा नित्य गोळा होत असतो. गाव जेवढे मोठे तेवढेच कचरा निर्माण होण्याचे प्रमाणही मोठे असते. माणसाच्या राहणीमानाचाही परिणाम कचरा निर्मितीवर होत असतो. लहान लहान गावामध्ये सुद्धा नित्य जमा होणारा कचरा कुठे नेऊन टाकावा ही नगरपालिका किंवा ग्रामपंचायतील या मोठ्या समस्या असतात. त्यांची विल्हेवाट लावणे आवश्यक असते. घरातील केर, भाजीपाला निवडल्यानंतर किंवा कापल्यावर उरलेला टाकाऊ भाग, कागदाचे तुकडे, कपडे, फाटलेले कपडे किंवा त्यांचा चिंध्या, काचेच्या फुटलेल्या वस्तु, निरुपयोगी पुठ्ठयांचे डबे, प्लास्टिकच्या निरुपयोगी वस्तु, प्लास्टिकच्या पिशव्या, फुटकी तुटकी खेळणी, लहान मुलांची कागदात गोळा केलेली विष्टा, झाडांचा पाला पाचोळा, घरातले खरकटे अन्न, मेलेली जनावरे इत्यादी. सर्वव्यापी प्लास्टिकच्या पिशव्यांची विल्हेवाट कशी लावावी हा एक गंभीर प्रश्न आहे.

रस्त्याची साफसफाई आणि गोळा झालेले कचर्याचे ढीग, नियमित जात नाही. अशा ढिगाऱ्यामध्ये मोकाट जनावरे, कुत्री, डुकरे, उंदीर, कावळे इत्यादी प्राणी आपले खाद्य शोधीत असतात. कचऱ्यातुन काही वस्तु मिळतात. या आशेने या वस्तु गोळा करणारी लहान मुले, बायका, माणसं हा कचरा सारखा चिरडत असतात व वाटेल तसा पसरवीत असतात. अशा अनेक कारणाने सातत्याने जमिन प्रदुषणाचे प्रमाण वाढत आहे.



**प्लास्टिक प्रदुषण :**

**१) सांडपाण्यातील गाळ –** घरोघरी नित्य सांडपाणी निर्माण होत असते. त्यात डीटर्जंट साबणाचे, आंघोळीच्या साबणाचे, भांडी घासण्याच्या साबणाचे पाणी अशा कितीतरी गोष्टी असतात. ग्रामीण भागात सांडपाणी वाहुन नेण्यासाठी पक्की गटारे नसतात. पाणी रस्त्याच्या उतारावरून दिशाहीन वाहत असते व शेवटी कुठेतरी खोलगट भागात जमा होते. त्यामुळे वरील सर्व घटकांमुळे जमिनीचे प्रदुषण होते. तर सांडपाण्यातील गाळाचा काही लोक शेतीत खत म्हणुन उपयोग करतात. या गाळात सोडियम, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, अमोनिया, क्लोराईड्स, नायट्रेटस, बायकारबोनेट, सल्फेट्स आणि फॉस्फरस यासारखी असेंद्रिय घटकांची कमी-जास्त प्रमाणात मिसळ झालेली असते. कारखान्यामधील घाऊक घटक जेव्हा सांडपाण्यात सोडले जातात, तेव्हा काही प्रमाणात जड धातु या गाळात आढळतात. सांडपाण्यातील गाळ शेतजमिनीत मिसळल्यामुळे त्यातील वर सांगितलेले घटक जमिनीत साहाजिकच जमिनीच्या रासायनिक घटकामध्ये अनिष्ट बदल होऊन तिचा पी एच बदलतो. याचा परिणाम असा होतो की, सुपीक शेतजमिनीला एक प्रकारचे आजारपण येते यालाच sewege sickness असे म्हणतात. जमिन प्रदुषणास अशा कारणांमुळे वाढ होत आहे.

## १.६ सारांश

प्रस्तुत प्रकणामध्ये प्रदुषण आणि जमिन प्रदुषण या संकल्पनाचा अभ्यास आपण केला आहे. सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्ये बरोबर मानवाच्या भौतिक गरजा देखील वाढत गेल्या. शिकारी अवस्थेतील मानव स्थिर झाला तो केवळ शेतीच्या शोधामुळे. शेतीसाठी सुरवातीला अरण्य तोडावी लागली. शहरीकरणा बरोबर घर बांधणी आणि कारखानदारी साठी जमिनीचा अतिरिक्त वापर होत आहे. खाण काम, धरण, कालवे अशा गरजा पुर्ण करण्यासाठी शेत जमिन वापरली जात आहे. खाणकाम व तेल विहिरींसाठी सातत्याने जमिनीचे उत्खनन होत आहे. यांत्रिक शेतीच्या नावाखाली किटकनाशके आणि रासायनिक खते यांचा अव्याहत् वापर होत आहे.

निसर्गनिर्मित कारणांमुळे जरी जमिनीचे प्रदूषण होत असले तरी मानवनिर्मित कारणे तेवढीच गंभीर स्वरूपाची आहेत. घरगुती व सर्वाजनिक कचरा, सांडपाणी, औद्योगिक

कचरा वापरलेली टाकाऊ रसायने, कृषी कचरा- खते, किटक नाशके जमिनीवर टाकली जातात आणि जमिनीची गुणवत्ता त्यामुळे सातत्याने खालावत आहे.

जमिन हा आपला अमूल्य ठेवा आहे. निसर्गाच्या व मानवाच्या अनेक क्रियेमुळे तिचा र्हास होत चालला आहे. हा अमुल्य ठेवा जतन करण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न करण्याची जशी गरज आहे तसेच प्रत्येक नागरिकाने प्रयत्न करणे देखील गरजेचे नव्हे तर अनिवार्य आहे. जमिन ही आपल्या जीवनाचा पाया आहे. तिच्या शिवाय आपण स्थीर उभे राहू शकणार नाही. त्यामुळेच जमिनीचा ऱ्हास थांबवणे म्हणजे आपला र्हास थांबवणे असे म्हणता येईल.

## १.७ स्वाध्याय

१) जमीन प्रदुषणे म्हणजे काय?

२) जमीनच्या प्रदुषणाची नैसर्गिक कारणे सांगा.

३) जमीन प्रदुषणाच्या मानव निर्मित कारणाचे वर्णन करा.

## १.८ संदर्भ ग्रंथ

१) वराट पाडवणकर – कृषि-भू विज्ञान – गाज प्रकाशन अहमदनगर

२) अरविंद पटवर्धन – पाणी अडवा-पाणी जिरवा- आरोग्य दक्षता मंडळ पुणे

३) दत्ताजी राव साळुंखे – आणि डिंगबरराव सत्रे- कृषी विस्तार सेवा – महात्मा फुले कृषी विदयापीठ राहुरी

४) व.आ. देशमुख - मृद विज्ञान महराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर-१

५) अशोक जैन – फाऊडेशन कोर्स पेपर – २ सेठ प्रकाशन मुंबई

६) सुरेश फुले – कृषी भूगोल विदयाभारती प्रकाशन, लातूर

७) टी.पी. पाटील – महाराष्ट्राचा भूगोल पिंपळापुरे ॲण्ड. क पब्लिशर्स. नागपूर

८) जयदीप निकम (संपादक) पर्यावरण अभ्यास - (EVS201) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ

❖❖❖❖

# २

# भूप्रदूषण – भाग २

**घटक रुपरेषा :**

२.० उद्देश

२.१ प्रस्तावना

२.२ जमिन प्रदुषणाचे परिणाम

२.३ जमिन प्रदुषण आणि प्रतिबंधात्मकउपाय

२.४ यांत्रिक पध्दती (अभियांत्रिकी पध्दत)

२.५ सारांश

२.६ स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्देश

१) जमिन प्रदुषणाच्या परिणामाचे अध्ययन करणे.

२) जमिन प्रदुषणाच्या मानवी जीवनावरील परिणामाचे अध्ययन करणे

३) जमिन प्रदुषणाचा शेत जमीनीवरील परिणामांचे अध्ययन करणे.

## २.१ प्रस्तावना

मागील प्रकरणामध्ये आपण जमिनीच्या प्रदुषणासाठी जबाबदार असलेल्या नैसर्गिक व मानविय कारणाचे अध्ययन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास मानवाने केलेल्या चूकांचे परिणाम मानवजमातीसह, प्राणी मात्रांना कसे भोगावे लागते यांचा अभ्यास करणार आहोत.

जमिनीची धुप हि कृषि व्यवसायाची गंभीर समस्या आहे. जमिनीवर कचरा साठत राहिल्याने तिथे प्रदूषण होऊन तिच्या गणवत्तेत फरक पडल्याने ती नापीक होते. जमिनीचे मूळचे कार्य संपुष्टात येते. अशा जमिनीतील पाण्याची पातळी कमी होत जाते. जमीनीतील वृक्ष वाढीवर देखील परिणाम संभवतात. शुध्द पाण्याचे स्त्रोत कमी होत जाते. वाळवंटीकरणाच्या प्रक्रियेचे मुळ कारण जमिनीचा ऱ्हास हे आहे.

जमिन ऱ्हासाचे परिणाम शेत जमिनी व्यक्तिरिक्त देखिल परिणाम संभवतात.नद्यांना वारंवार पुर येणे, तापमान पर्जन्यमानातील बदल, धरणाचे निकामी होणे इत्यादि परिणामा बरोबरच मानवी आरोग्य देखील धोक्यात येते.

देशात शेतजमिनीतून दरवर्षी ६०० कोटी टन माती व ५० लाख टन नत्र स्फुरद व पालाश तर महाराष्ट्रातील जमिनीतून ५०.५ कोटी टन माती व ४.५ लाख टन अन्नद्रव्ये, जमिनीवरून वाहणाऱ्या पाण्यामुळे व वाऱ्यामुळे वाहून जातात जमीन निकृष्ट बनून तिची उत्पादन क्षमता कमी होते. पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी फक्त १० ते १५ टक्के पाणी पिकास उपलब्ध होते. ६० टक्के पाणी बाष्पीभवनामुळे वाया जाते. उरलेले पाणी जमिनीत अथवा जमिनीवरून वाहून निघून जाते. परिणामी शेती व पिण्याचा पाण्याचा प्रश्न देखील गंभीर होत जातो. सातत्याने पडणारा दुष्काळ हे त्यांचे दृश्य स्वरुप आहे. जल प्रदुषण व अवर्षणामुळे येणारे महापूर हे आता नित्याचे बनले आहे. जमीनीच्या धुपेमुळे क्षारपड व दलदल युक्त जमीनीत वाढ होत आहे. वाळवंटीकरणाच्या प्रक्रियेचा वेग वाढून शेतजमिनीचे प्रमाणात घट होते.

## २.२ जमिन प्रदुषणाचे परिणाम

ऊन, वारा, पाऊस आणि मानवी हस्तक्षेपामुळे होणाऱ्या जमिनीच्या धुपेचे विविध परिणाम निसर्गातील अनेक घटकांवर पर्यायाने मनुष्य प्राण्यावर होत असतात. प्रस्तुत परिणामाचे विवेचन पुढील भागात केले आहे.

**२.२.१ जमिन लागवडी साठी निरूपयोगी ठरते :** ऊन, वारा, पाऊस आणि अन्य कारणांमुळे जमिनीचा वरचा थर निघून जातो. जमिनीच्या वरच्या थरात पिकांना आवश्यक असणारी अन्नद्रव्ये मिळतात. उदा.:

अ) प्राथमिक अन्न द्रव्ये – नत्र स्फुरद, पालाश

ब) दुय्यम अन्नद्रव्ये – कॅलशियम, मॅग्नेशियम, सल्फर

क) सूक्ष्म अन्नद्रव्ये - लोह जस्त, तांबे, मॅगेनिज, बोरान, क्लोरिन, मॉलिव्हनम, झिंक इ.

वरील सर्व अन्नद्रव्ये जमिनीच्या मगदुरा प्रमाणे उपलब्ध होतात. पिकाला वाढीसाठी आवश्यक घटक नसतील तर पिकाच्या वाढीस अडथळे निर्माण होतात. भुप्रदेशानुसार, हवामान, अतिपाऊस यानुसार जमिनीच्या मगदुरात फरक पडत जातो. प्रत्येक पिकासाठी वेगवेगळ्या प्रकारची माती आवश्यक असते. सुपिकतेच्या दृष्टीने विचार करताना विशिष्ट पिकासाठी उत्पादनक्षम असलेली जमिन इतर पिकांच्या दृष्टीने कमी उत्पादनक्षम असते.

शेतजमिनीच्या सुपिकतेला अनन्य साधारण महत्व आहे. जमिनीची धुप होताना सुपिकता झपाट्याने कमी होते. अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे अशा जमिनी पिकाच्या लागवडिस निरूपयोगी ठरतात. जमिनीची धुप सातत्याने होत राहिल्यास शेती करणे अशक्य होते. अर्थातच नापिक जमिनीच्या प्रमाणात वाढ होत जाते.

**२.२.२ जमिनीतील पाण्याची पातळी कमी होते –** पावसाचे पाणी, वनस्पती, गवत, जंगले यांचे आच्छादन असल्यास जमिनीत मुरण्याची प्रक्रिया वेगाने होऊ लागते. परंतु

सातत्याने होणाऱ्या जमिनीच्या धुपेमुळे जमीनीत पाणी टिकून धरण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. ओढे नाले नदी या द्वारे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते. जमिनीतील पाण्याची पातळी जसजशी खाली जाते, तसा शेती उत्पादनावर याचा विपरित परिणाम होतो. विहिरीची पाण्याची पातळी खाली जाते. सिंचन क्षेत्रात घट होऊन पाणी पिण्याची समस्या गंभीर बनत जाते.

**आपली प्रगती तपासा:**

पिकांना आवश्यक असणारी अन्न द्रव्य कोणती ?

**२.२.३ नदी-नाल्याच्या पूराच्या प्रमाणात वाढ :** नदी-नाले ज्या भागातून वाहातात तेथे मोठया प्रमाणात जंगल तोड झाल्यास नदिच्या प्रवाहाचा वेग वाढतो. नदिचे पाणी प्रवाह सोडून वाहण्याची भीती वाढते. परिणामतः मानवीय आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नूकसान संभवते. भारतासारख्या देशात दरवर्षी पूरामुळे निर्माण होणाऱ्या समस्या भेडसावतात. देशाला यामुळेच जीवीत आणि वित्त हानीला सामोरे जावे लागते.

**२.२.४ जमिनीतील क्षाराच्या प्रमाणात वाढ :** शेत जमिनीची धुप झाल्यामुळे शेतीतील सर्वच जमिन एकत्र पातळीवर राहत नाही. अशा भागात पाणी सांडून कालांतराने जमिनीत क्षाराचे प्रमाण वाढत जाते. अतिरिक्त रासायनिक खताचा व किटकनाशकाच्या वापराने सुरवातीला उत्पादन वाढत असले तरी कालांतराने उत्पादन वाढीवर मर्यादा येतात. खर्च अधिक व उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाल्याने शेतकर्यास शेती करणे परवडत नाही.

सातत्याने शेतजमिनीतील क्षाराचे प्रमाण वाढत गेल्याने अशा जमिनी लागवडीस अयोग्य ठरतात. लागवडी योग्य क्षेत्र कमी होऊन नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत जातो.

**२.२.५ तापमान व पर्जन्यमानातील बदल :** निसर्गात विविध प्रकारची नैसर्गिक चक्रे कार्यरत असतात. निसर्गातील विविध घटकांमध्ये संतुलन राखण्यासाठी या नैसर्गिक चक्राचा उपयोग होतो. उदा. ऑक्सिजन चक्र, कार्बनचक्र, नायट्रोजन चक्र, जलचक्र अशी नैसर्गिक चक्रे सतत कार्यरत ठेवण्यासाठी वनस्पती, पर्यायाने सुपीक जमीनीचा सहभाग मोठा असतो.

जमिनीची धूप होत असताना परिसरातील वनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत जातो. वनसंपत्तीच्या ऱ्हासातून जमिनीतील पाण्याची पातळी कमी होत जाते. या दृष्ट चक्रामुळे तपमानात वाढ होत जाते आणि पावसाचा अनियमितपणा सातत्याने वाढत जातो.

**२.२.६ धरण व तलावातील गाळाच्या प्रमाणात वाढ -** डोंगर उतारावरून वाहून येणाऱ्या पावसाच्या पाण्याबरोबर मोठ्या प्रमाणात माती वाहून येते ही सर्व माती तलावात साचली जाते. वेळच्या वेळी तलावातील गाळ काढला गेला नाही तर तलावाची साठवण क्षमता कमी होते. मोठ्या प्रमाणात खर्च करूनही अशा तलावाचा पुरेसा लाभ होऊ शकत नाही.

धरणामुळे नद्याचे वाहून जाणारे पाणी अडविले जाते. या पाण्याचा उपयोग शेती, कारखानदारी व पिण्याच्या पाण्यासाठी केला जातो. धरण बांधताना जंगलाची मोठ्या प्रमाणात हानी होते. वन्य पशु-पक्षी यांचे अस्तित्व देखील धोक्यात येते. पुर्नवसनासारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात. असे असताना जमिनीच्या ऱ्हासातून अशी धरणे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करीत नसतील तर मानवी विकासाची दिशाच चुकते असे म्हणावे लागेल. जमिनीच्या ऱ्हासातून तलाव व धरणातील गाळाचे प्रमाण सातत्याने वाढत जाते. सातत्याने अशी धरणे निकामी होतात.

**२.२.७ अवर्षण प्रमाणात वाढ :** अवर्षण ही नैसर्गिक आपत्ती आहे. अवर्षणाचा पर्जन्यमानाशी जवळचा संबंध आहे. पर्जन्य किती पडतो या पेक्षा तो कसा पडतो हे अधिक महत्वाचे आहे. हवामान व जलचक्र यांच्यातील बिघाड अवर्षणास कारणीभूत असतात. जंगलाचा अभाव व जंगलतोड ही दोन्ही कारणे अवर्षण निर्मितीस जबाबदार आहे. जमिनीची सुपीकता कमी होताना जंगल व जल या दोन्ही बाबींवर परिणाम संभवतात. पर्यायाने असे म्हणावे लागते. जमिनीचा ऱ्हास अवर्षणाला निमंत्रण देतो.

**२.२.८ भूमिपात :** जमिनीची घसरण, भूमिखच व भूस्सखल म्हणजे भूमिपात होय. नैसर्गिक कारणाबरोबरच मानवीकारणांमुळे देखील भूमिपात घडवून येतात. सातत्याने होणारी जंगलतोड, त्यामुळे मृदेचे कण ढीले होतात. जमिनीत पोकळ्या निर्माण होतात व त्यातून भूमिपात होतो. रस्तेबांधणी, रेल्वे मार्गासाठी खोदकाम, खाणकाम आणि त्याच बरोबर अतिरिक्त गुरांच्या खुरामुळे जमिनीची धूप होते आणि कालांतराने भूमिपात होतो.

**आपली प्रगती तपासा:**

अवर्षण वाढ का होते ?

भूमिपात म्हणजे काय ?

**२.२.९ वाळवंटीकरण :** जमिन काही कारणांमुळे वनस्पती हीन होऊन निरुत्पादक बनते त्यास वाळवंटीकरण असे म्हणतात. अशा जमिनीची उत्पादन क्षमता कमी झालेली असते. वाळवंटीकरणास मानवी कारणे मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत. भारतातील महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, राजस्थान, कर्नाटक आणि उत्तरेकडील काही प्रदेशास वाळंवटिकरणाचा अधिक धोका आहे. जंगल तोड व भूजलाचा अतिरेकी वापर वाळवंटीकरणास जबाबदार आहे. या दोन्ही घटकांमुळे जमिनीचा ऱ्हास होताना वाळवंटीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

**२.२.१० पाण्याच्या गुणनियंत्राची समस्या :** शेत जमिनीत अतिरिक्त रासायनिक खताचा व किटक नाशकाचा वापर या बरोबर कारखान्यातून खताचा व किटकनाशकाचा वापर, कारखान्यातून बाहेर पडणारी प्रदुषके जमिन प्रदुषणास जबाबदार आहे. पावसाच्या पाण्याबरोबर अशी प्रदुषके प्रवाही पाण्यात वहातात. जमिनीच्या ऱ्हासामुळे पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. प्रवाही पाण्याबरोबर माती देखील वाहात जाते. याच कारणाने पाणी प्रदुषित होऊन गुण नियंत्राची समस्या निर्माण होते.

वरील प्रमाणे जमिनीच्या धुपेचे विविध परिणाम संभवतात. या व्यतिरिक्त वनस्पतीचा ऱ्हास, शेतीव्यवसायाच्या समस्या, भूपृष्ठाच्या नैसर्गिक रचनेत बदल. इ. अनेक परिणामाचा संबंध नैसर्गिक पर्यावरणाशी असतो.

## २.३ जमिन प्रदूषण आणि प्रतिबंधात्मक उपाय

पर्यावरणाच्या संरक्षणातील सर्वात माठा धोका जमिनीची धूप हा आहे. जमिन काही क्षणात वाहून जात असली तरी ती तयार होण्यास अनेक वर्ष लागतात. भारतात ७० टक्के कोरडवाहू जमिन असून प्रत्यक्ष अन्नोत्पादनासाठी ४२ टक्के जमिन वापरात आहे. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी ही जमिन अपुरी आहे. या करिता अधिक जमिन लागवडी खाली आणणे, पडिक जमिनीचा विकास करणे अशा मृदसंधारण योजनाचा अवलंब करणे. ग्रामीण व शेती विकासासाठी अनिवार्य आहे.

जमिन प्रदुषणातील प्रतिबंधात्मक उपायाचा अभ्यास करताना भौगोलिक, प्रादेशिक वैशिट्ये शासकिय दृष्टिकोन, वैयक्तिक पातळीवरील प्रयत्न लोकसहभाग इ. घटक लक्षात घेणे आवश्यक आहे.

**जमिन धूप प्रतिबंधात्मक उपायामध्ये प्रामुख्याने दोन पध्दतीचा अवलंब केला जातो.**

अ) व्यवस्थापन पध्दती

ब) यांत्रिक पध्दती

**अ) व्यवस्थापन पध्दती :** जमिनीची धूप रोखण्यासाठी ज्या पद्धतीचा वापर करता येईल त्याचे विवेचन पुढील प्रमाणे –

### २.३.१ पट्टापेर पध्दती :

या पध्दतीत धूप करणारी व धूप होऊ न देणारी पिके रांगात आलटून पालटून पट्ट्यात लावली जातात. तृण वर्गीय कात द्विदल पिकाचे पट्टे टाकल्यास जमिनीची धूप थांबण्यास मदत होते. तुर, बाजरी, ज्वारी, मुग, भुईमुग, हरबरा, जवस, करडई इ. प्रचलीत पिक पट्टापेर पध्दतीने उताराला आडवी समापातळी रेषेवर लागवड केल्यास मातीची धूप थांबून जमिनीतील कस टिकवून धरण्याची क्षमता वाढत जाते.

### २.३.२ आच्छादन पध्दती :

पाला पाचोळा, सुकलेले गवत यांचे जमिनीच्या पृष्ठभागावरील आवरण म्हणजे आच्छादन होय. जमिनीच्या पृष्ठभागावर असणाऱ्या आच्छादनामुळे पावसाच्या पाण्याचा थेंब डायरेक्ट जमिनीवर पडत नाही यामुळे प्रवाही पाण्याबरोबर माती वाहून जाण्याची प्रक्रिया नियंत्रण होऊन जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

### २.३.३ पिकाची फेरपालट किंवा नियोजनः

दरवर्षी एकच पिक सातत्याने घेतल्यास जमिनीत विशिष्ट मूलद्रव्य संपुष्टात येण्याची शक्यता असते. यासाठी आलटून पालटून पिके घेण्याची योजना करणे आवश्यक आहे. अन्नधान्य पिकानंतर जलवर्गीय पिके घेतल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

### २.३.४ समपातळीतील मशागत :

शेतीमध्ये करावयाच्या कामामध्ये नांगरणी, वखरणी आणि आंतर मशागतीची कामे जमिनीच्या उताराला आडवी केल्यास पावसामुळे घळी पडून होणारी धूप थांबवण्यास मदत होते. पावसाचे पाणी जमिनीत रोखण्यात मदत होते. शेण- खताचा वापर या पध्दतीत केल्यास जमिनीचा पोत सुधारून पाणी टिकवून धरण्याची क्षमता वाढली जाते.

### २.३.५ गवताची लागवड :

लागवड अयोग्य, पडिक जमिनि वर उघड्या बोडक्या डोंगर उताराच्या जमिनीवर गवताची लागवड केल्यास जमिनीतील ओलाव्याचे प्रमाण टिकून राहते. गवताच्या आच्छादनामुळे प्रवाही पाण्याबरोबर माती वाहून जात नाही. आणि गवताच्या असंख्य मुळामुळे माती मुळांना घट्ट चिटकून राहू शकते. यामुळे जमिनीच्या धूप कमी होण्यास मदत होते.

### २.३.६ वृक्ष लागवड आणि संवर्धन :

भूपृष्ठावर वृक्षाचे प्रमाण अधिक असल्यास माती धरून ठेवण्याची क्षमता वाढते. वाहत्या पाण्याला वृक्षामुळे अडथळा निर्माण होतो. तर पाल्यामुळे जमिनीस सेंद्रिय खत मिळते. खुल्या क्षेत्रात पाण्यापासून संरक्षण मिळू शकते. मृद संधारणासाठी जास्तीत जास्त जमिन वृक्षच्छादित होण्याकरिता वृक्ष लागवड आणि संवर्धन ही आवश्यक बाब ठरते.

जमिनीची धूप रोखण्यासाठी केल्या जाणाऱ्या विविध व्यवस्थापकिय उपाय योजनांमध्ये वरील सर्व बाबी बरोबर चराऊ रानाचा विकास, शेती करण्याच्या पध्दतीचा सुधारणा (स्थलांतरीत शेतीला बंद) चराई बंदी. झाडाझुडपाना संरक्षण, कुऱ्हाड बंदी, पडित जमिनीवर लागवड, इ. विविध उपाय योजना करणे आवश्यक ठरते.

### २.३.७ सेंद्रिय खताचा वापर :

या पध्दतीमध्ये सैंद्रिय जैविक खताचा वापर करणे अपेक्षित आहे. रासायनिक खते वापरण्याचे प्रमाण अगदी कमी किंवा शुन्यावर आणणे उपयुक्त ठरले. या शिवाय कीटकनाशके व तणनाशकाचा अनावश्यक वापर टाळणे गरजेचे आहे.

### २.३.८ मोकाट गुरे चारण्यासाठी बंदी :

चराऊ कुरणामध्ये जनावरांना बंदी केली पाहिजे. जनावरांच्या अनिर्बंध वावरामुळे, कुरणामध्ये गवताचे व मृदेचे खूप नुकसान होते. मृदेवरील आच्छादन नाहीसे होते. यासाठी कुरणामध्ये जनावरांना बंदी करून कुरणामधील गवताची क्रमाक्रमाने कापणी करून चारा पुरवठा करावा.

### २.३.९ जल सिंचनाचे योग्य प्रमाण :

अतिजास्त प्रमाणात जलसिंचन केल्यास शेत जमिन खारट होते. हा सुध्दा एक प्रकारे मृदा विनाशच आहे. मृदेचा विनाश थांबविण्यासाठी आवश्यक असेल तेव्हाच व गरजे इतकेच जलसिंचन केले पाहिजे. अतिरिक्त जलसिंचनाचे दुष्परिणाम उत्पादकांना जाणवू लागले आहेत. सांगली, सोलापूर या जिल्ह्यात क्षारयुक्त जमिनी पिकांना निरुपयोगी ठरत आहेत.

### २.३.१० योग्य मशागत :

शेतीची नांगरणी उताराच्या दिशेने करताना उताराला लंबवत दिशेने करावी. जेणेकरून शेतात बांधासारखी रचना तयार होऊन वाहणाऱ्या पाण्याला अडथळे निर्माण होतात व मृदेची धूप थांबविता येते. अशा प्रकारे वरील विविध उपायांद्वारे मृदेची धूप थांबविता येते.

**आपली प्रगती तपासा.**

१) पट्टापेर पध्दती म्हणजे काय

२) पट्टापेर पध्दतीचे फायदे सांगा.

## २.४ यांत्रिक पध्दती (अभियांत्रिकी पध्दत)

मृदा धूप रोखण्यासाठी व्यवस्थापकिय पध्दती बरोबरच यांत्रिक पध्दतीचा वापर करणे आवश्यक आहे अशा पध्दतीमध्ये पुढील पध्दतीचा समावेश करता येईल.

### २.४.१ समपातळीत बांध घालणे :

सर्वसाधारणपणे ज्या शेतीना उतार असतो त्या शेतात पावसाचे पाणी उताराच्या दिशेने वाहत जाते. या वाहत्या पाण्याबरोबर मृदेचे कण सुध्दा वाहून जातात. उतार जेवढा तीव्र असेल तेवढे धुपेचे प्रमाण व गती अधिक असते. यासाठी शेतीचा उतार विचारात घेऊन शेतात ठिक ठिकाणी बांध घातल्यास वाहून जाणारे पाणी अडविले जाईल.त्याचबरोबर वाहून जाणारी मृदाही अडकली जाईल. तसेच शेतात पाणी मुरून शेतीला पुरेसे पाणी मिळू शकते. डोंगराळ भाग, टेकड्या व पर्वतीय प्रदेशातही या प्रकारे खाचरे खोदून पाणी अडवले जाईल. वाहत्या पाण्याचा वेग कमी होईल व धूप नियंत्रित करता यईल.

### २.४.२ नाला बांध बंदिस्ती :

पावसाच्या पाण्यात नाले वेगाने वाहून नदीला मिळतात मात्र नाल्याला पाणी असत नाही. यासाठी नाल्यामधून वहाणारे पाणी जागोजागी अडविले जाते. त्यामुळे साठविलेल पाणी जमिनीत जिरते व भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली जाते. शेती क्षेत्रात आणि लाभ क्षेत्रातील विहिरींना पाण्याचा साठा यामुळे उपलब्ध होऊ शकते. अशा नाला बांधबस्तीसाठी जागेची निवड करताना ओढ्याचा उतार आणि जमिनीची खोली इ. बाबीचा विचार केला जातो.

### २.४.३ नाला सरळीकरण :

काही वेळा पाण्याबरोबर वाहून येणाऱ्या मातीमुळे नाल्यात गाळ झाल्याने किंवा नाल्याचा पात्रात खडक, झाडे आल्याने नाल्याचा मार्ग बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे सभोवतालच्या क्षेत्रात पाणी जाऊन नुकसान होण्याची शक्यता असते. असे नुकसान टाळण्यासाठी नाल्यास असणारी वेडीवाकडी वळणे काढून नाल्यास योग्य आकार आणि उतार दिल्याने जमिनीची मोठ्या प्रमाणातील धूप रोखता येऊ शकते.

### २.४.४ पानथळ जमीन सुधारणा (चिभड जमिन सुधारणा) :

जमिनीच्या ज्या भागात पाणी सातत्याने साचले जाते तेथे पुरेसा पाण्याचा निचरा होत नाही. अशा जमिनी चिभड राहतात आणि जमिन पिक येऊ शकत नाही. अशा क्षेत्रात चर काढून देऊन जमिनीत असलेले जास्तीचे पाणी बाहेर काढून देण्याची व्यवस्था केल्यास या जमिनी उत्पादनक्षम करता येतात आणि जमिनीची धूप रोखता येते.

### २.४.५ घळीचे नियंत्रण :

लागवडी खालील क्षेत्राचे नुकसान होऊ नये म्हणून कायमचे किंवा तात्पुरते पाणी अडवणारे, पाणी ओसडून बांध बांधून घळी नियंत्रण केले जाते. यामुळे ओघळीमध्ये येणाऱ्या पाण्याची गती कमी होऊन पाणी अडविले जाते. ओघळीमुळे होणारी धूप थांबविली जाते.

### २.४.६ तारांचा दगडी बांध घालणे (गॅबियन बंधारे) :

नाल्याच्या पाण्याचा वेग ज्या ठिकाणी जास्त असतो त्या ठिकाणी कोणत्या ही प्रकारचे बांध टिकून राहत नाही. ठिक ठिकाणी तारेच्या जाळ्या तयार करून त्यामध्ये बांध घालावेत यामुळे त्या ठिकाणी लावण्यात आलेल्या बांधात दंगड वाहने जाणार नाहीत. दगड तारने बांधामुळे पक्के राहून वरील वेगाने येणाऱ्या पावसाच्या पाण्यास अडथळा निर्माण होऊन बांधाच्या आतिल बाजूस गाळ राहिल व पाण्याचा प्रवाह संथ होऊन पाणी अडविले जाईल आणि मातीची धूप कमी होईल.

### २.४.७ प्लॅट फॉर्म बेंच टेरेस :

या पध्दतीमध्ये डोंगर उताराची माती सोडून ती मागे ओढून कट्टा तयार केला जातो व या कट्ट्यावर लागवड केली जाते. एका आड एक असा कट्टा तयार केल्यास उतारावरून

वाहणारे पाणी टप्प्या-टप्प्याने कट्ट्यावर येते. त्यामध्ये ते पाणी मुरून झाडाची वाढ चांगली होईल व जमिनीची धूप रोखली जाईल.

मृदा संधारण्याच्या वरील विविध अभियांत्रिकी पध्दती बरोबरच भात खाचरे (टेरेसिंग), घळी नियंत्रण, जमिन सपाटीकरण इ. विविध प्रकारची कामे करता येतील. यामुळे जमिनीची धूप होण्यास प्रतिबंध होऊ पर्यावरण विविध समस्या मध्ये जमिन या नैसर्गिक साधन संपत्तीची हेडसांड मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम करते यासाठी जमिनीचा उपभोग घेत असाताना जमिन या महत्पूर्ण घटकाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

### २.४.८ पूर नियंत्रण :

नद्यांना मोठमोठे पूर आल्यास पुराच्या पाण्याबरोबर आजूबाजूची मृदा वाहून जाते. पुराची तीव्रता कमी व्हावी यासाठी नद्यांवर बांध घालावेत. धरणे बांधावीत, जेणेकरून पुराचे प्रमाण कमी होऊन मृदेची धूप थांबविता येईल.

**आपली प्रगती तपासा :**

गॅबीयन बंधाऱ्याचे महत्व सांगा.

प्लॅट फार्म बेंच टेरेसचे फायदे सांगा.

### २.४.९ पायऱ्या पायऱ्यांची शेती

पर्वतीय प्रदेशात पायऱ्या पायऱ्यांची शेती केली जावी. यामुळे पर्वत उतारावर खाचरे खोदून केल्या जातील. साहजिकच उतार कमी होऊन वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी होतो. त्यामुळे जमिनीची धूप नियंत्रित होऊ शकेल.

### २.४.१० रेती मिश्रीत खडी पसरविणे :

अतीशय कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात शेतांमध्ये रेती मिश्रीत खडीचा थर पसरवावा. यामुळे पावसाचे पाणी जमिनीत शोषले जाते. ओलावा रोखला जातो व जमिनीची धूप ही थांबते. या पध्दतीला अस (Pebble Mutch) म्हणतात. ओसाड प्रदेशात ही पध्दती महत्वाची ठरते.

मृदा संरक्षणासाठी वरील प्रकारच्या यांत्रिक पध्दती प्रभावी ठरू शकतात.

## २.५ सारांश

पर्यावरणाच्या संरक्षणातील सर्वात मोठा धोका जमिनीची धूप हा आहे. जमिन काही तासात वाहून जात असली तरी ती तयार होण्यास अनेक वर्ष लागतात. भारतात ७० टक्के कोरडवाहू जमिन असून प्रत्यक्ष अन्नोत्पादनात ४२ टक्के जमीन वापरात आहे. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी ही जमिन अपुरी आहे. या करीता जमिन वापर करताना जमिन प्रदुषणाच्या परिणामाचा गंभीर विचार करणे आवश्यक आहे.

जंगलतोडी मुळे मृदेची धूप होऊन जमिन नापीक बनते. भारतात दरवर्षी सुमारे ६००० दशलक्ष टन मृदा झीज होऊन नष्ट होत आहे. मृदा धूप होताना जमितील ओलावा कमी होत जातो याचा परिणाम भूजल पातळी खाली जाते. कारण पावसाचे पाणी जमिनीत न मुरता मोठ्या प्रमाणात वाहून जाते. आज भूजलपातळी २०० मीटरपर्यत खाली गेलेली आहे.

एकुणच मृदा धुपेच्या परिणामा मुळे मानवी जीवन अडचणीचे बनत आहे.

मानवाचे सर्व व्यवासाय प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कमी-अधिक प्रमाणात मृदेशी संबंधित आहेत. मृदा ही अत्यंत महत्वाची साधन संपदा आहे. मृदेची धूप मोठ्या प्रमाणात झाल्यास शेती योग्य जमिनीचा सकस पणा कमी होऊन उत्पादकता घटते. आज अनेक कराणांमुळे मृदेची धूप होत असून मृदा विनाश होत आहे. या समस्येने अलीकडे गंभीर स्वरूप धारण केलेले आहे. भविष्यात ही समस्या भीषण स्वरूप धारण करेल त्या आधीच मृदेची धूप थांबविणे अत्यंत गरजेचे आहे.

यासाठी मृदा संगोपन, संधारण व संवर्धन करणे महत्वाचे आहे. अन्यथा मृदेच्या धुपेचा गंभीर परिणाम शेती व्यवसायावर होईल. या दृष्टीने मृदा संवर्धन ही काळाची गरज आहे.

मृदेची धूप भौगोलिक व मानवी कारणामुळे होते. भूप्रदेशाचा सर्व साधारण उतार, पर्जन्य, हवामान, जंगलतोड, अतिचराई, भटकी शेती, मशागतीची अयोग्य पध्दत, अति जलसिंचन, सतत एकच पिक घेणे इत्यादी धुपेची प्रमुख कारणे आहेत.

जमिनीची धूप होणे ही एक महत्वाची समस्या मानली जाते. म्हणूनच जमिनीच्या धुपेला प्रतिबंध घालणे महत्वाचे असते. बांध घालणे, मृदेवर आच्छान निर्माण करणे, माती धरून ठेवणाऱ्या पिकांची लागवड करणे, वृक्षतोड थांबविणे, चराऊ कुरणामध्ये जनावरांना बंदी, पूर नियंत्रण करणे, पायऱ्या पायऱ्याची शेती करणे, रेतीमिश्रीत खडी पसरविणे, योग्य दिशेने मशागत करणे, जलसिंचनाचे योग्य प्रमाण ठेवणे. अशा विविध व्यवस्थापकिय आणि यांत्रिक पध्दतीचा वापर करणे आवश्यक आहे.

## २.६ स्वाध्याय

१) जमिनीच्या प्रदुषणाच्या विविध परिणामाची चर्चा करा.

२) जंगल जल व जमिन यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

३) भूमिपात व वाळवंटिकरण म्हणजे काय ?

४) जमिनीची धूप थांबण्यासाठीच्या व्यवस्थापकीय पध्दती सांगा.

५) जमिनीची धूप रोखण्यासाठी कोणत्या यांत्रिक पध्दतीचा वापर करता येईल.

## २.७ संर्भ ग्रंथ


१) वराट पाडवणकर - कृषी विज्ञान - गाज प्रकाशन - अहमदनगर

२) दत्ताजीराव साळुंखे - कृषी विस्तार सेवा - महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

३) व. आ. देशमुख - मृद विज्ञान - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर-१

४) कृषि दैनंदिनी – २०१६ – डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी ४१५७१२

५) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ डायरी – २०१६-१७

६) दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ ग्रामीण विकास अभ्यास पत्रिका (४ आक्टो.२०१२).

७) डॉ. जयदीप निकम (संपादक), यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, पर्यावरण अभ्यास (जून- २०१५).

८) व. आ. देशमुख - मृद विज्ञान - महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर-१.


❖❖❖❖

# ३

# ग्रामीण बेरोजगारी

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ ग्रामीण बेरोजगारी संकल्पना

३.३ बेरोजगारीचे प्रकार

३.४ ग्रामीण बेरोजगारीचे कारणे

३.५ ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाय

३.६ सारांश

३.७ स्वाध्याय

३.८ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्टये

- ग्रामीण बेरोजगारी संकल्पना समजून घेणे .
- ग्रामीण बेरोजगारीचे प्रकार जाणून घेणे .
- ग्रामीण बेरोजगारीचे कारणे कारणे जाणून घेणे.
- ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी उपायांची माहीती करुन घेणे .

## ३.१ प्रस्तावना

बेरोजगारी हा कोणत्याही देशाच्या विकासातील एक प्रमुख अडथळा आहे. भारतात ग्रामीण बेरोजगारी ही गंभीर समस्या आहे. भारतात ग्रामीण क्षेत्रातशेती व शेती संबधित उद्योग हेच एक रोजगाराचे एकमेव साधन तसेच माध्यम आहे.त्यामुळे सर्व ग्रामीण भागातील व्यक्ती शेती मध्येच रोजगार मिळविण्यासाठी प्रयत्न करत असतात. म्हणुन ग्रामीण भागातील अधिकांश कामगार/मजदुर शेती व्यवसायात काम करत असताना आपणास दिसुन येत असतात. म्हणजेच शेती व्यवसायात काम करत असलेल्या मजदुरांची संख्या ग्रामीण भागातील लोकांमध्ये अधिक असते.बेरोजगारी विविध कारणांमुळे उद्भवते, ज्यामध्ये शिक्षणाचा अभाव, नोकरीच्या संधींचा अभाव,औद्योगिक क्षेत्रांचा विकास फार अधिक झालेला नसतो.

एकीकडे औद्योगिकरणातील आधुनिकीकरणाच्या वाढत्या गतीमुळे रोजगारनिर्मिती पुरेशी होत नसल्याने औद्योगिक क्षेत्रांत पुरेशी रोजगारवाढ होत नाही. दुसरीकडे औद्योगिकीकरणाच्या अभावी शेतीव्यवसायातील लोकसंख्येचा बोजा वाढतो व ग्रामीण भागातील अर्धबेकारी व छुपी बेकारीही वाढते. ग्रामीण विभागातील अर्धबेकार वा छुपे बेकार रोजगाराच्या आशेने शहरांत स्थलांतर करतात आणि तेथेही पुरेसा रोजगार उपलब्ध नसल्याने पुन्हा नागरी विभागातील बेकारीत भर पडते. अशा रीतीने ग्रामीण बेकारी व नागरी बेकारी हे एकाच आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे दोन परिणाम प्रत्यक्षात अनुभवास येतात.

## ३.२ ग्रामीण बेरोजगारी संकल्पना

बेरोजगार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय, बेकारीचा अभ्यास करताना दोन बाबी आधी स्पष्ट झाल्या पाहिजेत, पहिली म्हणजे बेरोजगारीची व्याख्या कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच मर्यादीत ठेवावी लागते, लोकसंख्येतील ० ते १४ वयोगट व ज्येष्ठ नागरिक इ. घटक वजा केल्यावर जी उरते ती कार्यकारी लोकसंख्या होय. बेरोजगारी म्हणजे अशी स्थिती होय, की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो परंतु त्याला काम मिळत नसते. बेरोजगारीमुळे देशातील मानव साधनसंपत्तीचा अपव्यय होतो. बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यांमध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते आणि समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.


### व्याख्या :

“व्यक्तीस काम करण्याची इच्छा आहे, काम करण्याची शक्ती आहे, तरीही त्या व्यक्तीस काम मिळत नसेल, तर त्या व्यक्तीस बेकार म्हटले जाते.”

सर्वसामान्यपणे रोजगार क्षेत्रात चालू असलेल्या वेतनाचा दर स्वीकारून काम करण्याची तयारी असणाऱ्या सक्षम कामकऱ्याला जर काम मिळू शकले नाही, तर त्याची गणना ‘बेकार’ म्हणून करता येईल आणि अर्थव्यवस्थेतील अशा स्थितीला बेकारीची परिस्थिती म्हणता येईल.

## ३.३ बेरोजगारीचे प्रकार

भारतात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे.भारतात ग्रामीण व शहरी भागात बेरोजगारी आढळून येते.




### ३.३.१ ग्रामीण बेरोजगारीचे प्रकार :

- **i.** हंगामी बेरोजगारी भारतात बहुतेक शेतकरी लागवडी साठी पावसावर अवलंबून असतात. त्यामुळे वर्षातून एकदाच पीक घेता येते. यामुळे ग्रामीण शेतमजुरांना केवळ ४ ते ५ महिनेच काम प्राप्त होते व उर्वरित काळ ते बेकार राहतात म्हणून या प्रकाराला हंगामी बेकारी म्हणतात. ही बेकारी शहरी भागात सुद्धा आढळते.
- **ii.** उदा. पर्यटन क्षेत्रातील मार्गदर्शक, लग्नसमारंभातील वादक इत्यादी.

- **iii.** प्रच्छन्न बेरोजगारी (छुपी) अति लोकसंख्येच्या अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये प्रच्छन्न बेकारी ही एक मूलभूत स्वरूपाची समस्या आहे. या प्रकारच्या बेकारीत ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची गरज आहे तिथे गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात तेव्हा अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शुन्य राहते म्हणजेच अतिरिक्त लोक उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही व छुपी बेकारी निर्माण होते. उदा. एका कारखान्यात उत्पादन प्रकियेसाठी केवळ २० कामगारांची गरज असताना तेथे २५ कामगारांनी काम करणे. येथे अतिरिक्त ५ कामगार हे छुपे बेकार ठरतील व ते उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही. अशा अतिरिक्त कामगारांनी उत्पन्नाचे मूल्य विनाकारण वाढते.

- **iv.** **ग्रामीण सुशिक्षित बेरोजगारी** : 'ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल, अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी , बारावी पास झालेले, पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते. नोकरी-योग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात.अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते. शिक्षण घेणारे दिवसेंदिवस वाढत असले तरी त्यांच्या

शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देखील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे. सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवी अनुसार काम मिळाले पाहिजे, नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढची पिढी ही शिक्षणापासून वंचित राहील असा विचार ही दिसून् येतो.



https://www.lokmatnews.in

v. **ग्रामीण तांत्रिक बेरोजगारी :** उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने जी बेकारी निर्माण होते त्या बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. शहरी भागाप्रमाणे उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने ग्रामीण भागातदेखील श्रमिकांऐवजी यंत्रांना जास्त प्राधान्य दिल्यानेतांत्रिक बेकारीची समस्या निर्माण होत आहे. तंत्रात बदल झाल्याने उत्पादन खर्च कमी होतो, आणि नफा वाढतो, यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते.उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरून उत्पादन करणे यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. त्यामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते.

vi. **संघर्षात्मक बेरोजगारी (घर्षणात्मक बेकारी) :** या प्रकारच्या बेकारीमध्ये आर्थिक संघर्षामुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरूपात बेकार व्हावे लागते. शेती हंगामी तसेच बाजार विषयक स्थितीशी निगडित आहे.प्रतिकूल बाजार विषयक स्थिती,वीज टंचाई-कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. अशा स्थितीत श्रमिकांना एक काम सोडल्यापासून दुसरे काम स्वीकारेपर्यंत बेकार राहावे लागते, म्हणून त्याला घर्षणात्मक बेकारी म्हणतात. कारण या बेकारीच्या मधल्या काळात त्यांनी परिस्थितीशी संघर्ष केलेला असतो. ग्रामीणसंघर्षात्मक बेरोजगारी निर्माण होते.

vii. **ग्रामीण चक्रीय बेरोजगारी :** 'तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. 'हा बेकारीचा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो. मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक क्रिया मंदावतात त्यामुळे उद्योगांचे मालक उत्पादन कमी करतात. परिणामी कामगारांना कामावरून कमी केले जाते.

**viii.** संरचनात्मक बेरोजगारी जेव्हा अर्थव्यवस्थेत संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात तेव्हा ही बेकारी निर्माण होते. जेव्हा मागासलेल्या व परंपरागत अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होऊन ती आधुनिक व विकसित होत जाते तेव्हा मागणीमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल होतात. त्यातून संरचनात्मक बेकारी निर्माण होते. ही बेकारी एक दीर्घकालीन घटना होय.

उदा.ऑटो रिक्षांमुळे शहरातील घोडागाडी कालबाह्य झाली म्हणजेच त्यांना संरचनात्मक बेकारी सहन करावी लागली.

## ३.४ ग्रामीण बेरोजगारीचे कारणे

भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार राहावे लागते, हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेकार आहेत त्याचा अंदाज घेणे कठीण आहे. नियोजन मंडळ, जनगणनेचा अहवाल, तसेच मध्यवर्ती सांख्यिकी संस्था यांना या बाबतीत अचूक माहिती नाही. या बाबतीत काही अंदाज खालील प्रमाणे देता येतील-

यामागची काही मुख्य कारणे अशी आहेत –

**१) शेती हा मुख्य व्यवसाय –** भारतात शहरीकरण जरी वाढत असले तरी आजही भारत हा खेड्यांचाच देश आहे. भारतात १ लाख ३८ हजार खेडी १५ हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेली आहेत. भारतातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते. प्रदेश कोणताही असो या बहुसंख्य ग्रामीण जनतेच्या उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. शेती ही हंगामी असते. जेव्हा हंगाम असतो तेव्हा इतके काम असते की घरातले सर्व लोक अपुरे पडतात. पण हंगाम सरला की कोणाच्याच हाताला काहीच काम उरत नाही. शेतीच्या हंगामानुसार वर्षातले आठ किंवा चार महिने भारतातील शेतकऱ्यांवर बेकारीची वेळ येते.

**२) शेतीला पूरक असे व्यवसाय विकसित न होणे –** शेतीवर आधारित असे काही व्यवसाय असतात. उदा.पशुपालन, दुग्धोत्पादन, फळप्रक्रिया उद्योग वगैरे. बहुधा शेतीचा हंगाम संपला की पूरक उद्योगांचा काळ सुरू होतो. भारतात ते पुरेशा प्रमाणात विकसित झालेले नाहीत. त्यामुळे वर्षातला बराचसा काळ भारतीय शेतकरी बेरोजगारच राहतो.

**३) शेती निसर्गावर अवलंबून असणे –** सिंचन व्यवस्था व्यवस्थित विकसित झालेली नसल्याने भारतातील शेती ही अजूनही मोठ्या प्रमाणावर निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे.त्यामुळे भारतीय शेतकरी जास्तीत जास्त दोन पिके घेऊ शकतो. पंजाब व गंगा-यमुनेच्या खोऱ्यांचा प्रदेश सोडला तर सर्वत्र वर्षातले चार महिने असे असतात की त्या काळात शेतीतून कोणतेही उत्पन्न घेता येत नाही. शेतकऱ्यांना पावसाची वाट बघत नुसते बसून राहावे लागते.

**४) शेतीची साधने व तंत्र मागासलेले –** भारतात शेतीचे क्षेत्रफळ मोठे आहे पण त्यातून निघणारे धान्याचे उत्पादन तेवढ्याच क्षेत्रफळाच्या शेतीतून इतर देशांत निघणाऱ्या उत्पादनापेक्षा खूप कमी आहे. याचे कारण भारतात बहुतेक शेती ही पारंपरिक पद्धतीने केली जाते. तिच्या लागवडीचे, सिंचनाचे, रोगनिवारणाचे तंत्र कालबाह्य आहे. अलीकडे काही प्रमाणात भारतीय शेतकरी आधुनिक शेतीतंत्राकडे वळला आहे. पण तरी अजून बराच पल्ला गाठायचा बाकी आहे.उत्पन्न अपुरे असल्याने तिच्यावर अवलंबून असलेल्या लोकांना योग्य परतावा मिळत नाही. ही शेती मोठ्या लोकसंख्येला किफायतशीर रोजगार पुरवायला असमर्थ ठरते. भारतात लोकसंख्या जास्त असल्याने येथील शेतीतंत्र मानवी श्रमांचा जास्त उपयोग करणारे आहे. याच्या उलट अमेरिकेत गहू, मका, बार्ली या पिकांची शेती अत्याधुनिक तंत्राने केली जाते. त्यात मानवी श्रमांचा कमीत कमी वापर केला जातो. त्यामुळे ती शेतकऱ्यांना नफा देणारी ठरते तर भारतात शेती जेमतेम उत्पन्न देणारी ठरते वा निसर्गाची एखादी अवकृपा झाली तर तो आतबट्ट्याचा व्यवहार ठरतो.

**५) छोटी शेते**, **शेतीचे तुकडे –** भारतात लोकसंख्येची प्रमाणाबाहेर वाढ झाल्याने शेतीचे अगणित तुकडे झाले आहेत. पिढ्यान्पिढ्या शेतीचे एकक कमी कमीच होत जाते. बांध आणि सीमारेषा यांमुळे प्रत्यक्ष कसण्याजोग्या शेतीच्या क्षेत्रफळात घट होते. एकूण देशाचा विचार केला तर हजारो हेक्टर शेतजमीन बांधांच्या खाली आहे. तिचा वापर होत नाही.शेतजमिनीचे छोटे तुकडे झाल्याने तिच्या व्यवहार्यतेचा व कार्यक्षमतेचा प्रश्न उभा राहतो. यापुढची गोष्ट अशी की एका शेतकऱ्याच्या मालकीची जमीन एकाच जागी असते असे नव्हे. काही वेळा एका शेतकऱ्याची शेती दोन गावांमध्ये तुकड्या तुकड्याच्या स्वरूपात पसरलेली असते. ती सलग नसते. त्यावर शेतकरी आपले लक्ष केंद्रित करू शकत नाही. आधुनिक साधने वापरण्यासाठी शेती काही किमान आकाराची असावी लागते. ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर या तंत्रांचा वापर करायचा तर शेतीचे क्षेत्र सलग आणि विनाखंड असावे लागते. भारतातील शेतजमीन विस्कळित असल्याने तिच्यात बरीच आधुनिक साधने उदा. ट्रॅक्टर, ऊसतोडणी, धान्यकापणी मशिन वगैरे वापरता येत नाहीत. त्यामुळे जे उत्पादन येते ते त्यात काम करणाऱ्यांना नफा मिळवून देण्याइतके नसते.

**६) शिक्षण पद्ध-तीतले दोष –** हा केवळ ग्रामीणच नव्हे तर भारतातील एकूणच बेकारीचे प्रमाण वाढवणारा घटक आहे. शेती असो वा उद्योग, शहरी भाग असो वा ग्रामीण शिक्षण व्यवस्था त्यातील नागरिकांचा सहभाग निश्चित करत असते. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीच्या अंगी काही समाजोपयोगी कला, कौशल्य, उपयोगिता निर्माण व्हावी असे अभिप्रेत आहे. हे कौशल्यच ती व्यक्ती उपजिविकेसाठी वापरते. त्यातून ती आपले जीवन घडवते. त्याला आकार देते. ते संपन्न करते. त्याद्वारेच राष्ट्रीय उत्पन्नाला योगदान देते. भारतात ज्या प्रकारचे शिक्षण शालेय पातळीवर दिले जाते त्याचा जीवनाशी काही संबंध नसतो. शिक्षण पाठ्यपुस्तकीय स्वरूपाचे दिले जाते. ते रोजगाराभिमुख नसते. सुशिक्षित तरूण जेव्हा पदवीचे शिक्षण घेऊन बाहेर पडतात तेव्हा ते समाजाची कोणतीही गरज भागवण्यास समर्थ नसतात. त्याचा परिणाम म्हणजे त्यांना बेकारीला तोंड द्यावे लागते.

शिक्षण हे व्यवसायाभिमुख असले पाहिजे. जेव्हा एक तरूण त्याचे विहित शिक्षण घेऊन शालेय वातावरणाच्या बाहेर पडतो आणि समाजात आपले नवे अस्तित्व निर्माण करू पाहतो तेव्हा त्याच्या अंगात समाजाची एखादी गरज भागेल अशे कौशल्य असले पाहिजे. भारतातील शिक्षण व्यवस्था पाठ्यपुस्तकीय ज्ञानावर जास्त भर देते. तिच्यात रोजगारविषयक शिक्षणाचा अभाव आहे. छोटे व्यवसाय उदा. सुतारकाम, वेल्डींग, टर्नरकाम, गवंडीकाम-मिसनरीवर्क, कपडे शिलाई, वायरमन, प्लंबर, घरगुती उपकरणांची दुरूस्ती, सायकल-दुचाकी दुरूस्ती, संगणकज्ञान यांचे शिक्षण आठव्या इयत्तेपासूनच शाळेबरोबरच दिले गेले पाहिजे.

उच्च शिक्षण घेतलेला तरूण समाजाची कोणतीही गरज भागवायला सक्षम नसतो. त्याचप्रमाणे बरेचदा असे दिसून येते की एखाद्या क्षेत्रातले पूर्ण शिक्षण घेतलेला तरूण त्या क्षेत्रातल्या व्यवहारी ज्ञानापासून अनभिज्ञ असतो. त्यामुळे त्याने घेतलेले शिक्षण आणि त्या क्षेत्रात झालेले बदल यांच्यात मोठी तफावत पडते. पाठ्यपुस्तकीय ज्ञान व्यवहारी पातळीवर निरुपयोगी शाबित होते.केवळ ग्रामीणच नव्हे तर शहरी बेकारी वाढण्यासाठीही हे एक मोठे कारण आहे.

**७) सुशिक्षित वर्गाचा अंगकष्टाच्या कामांना नकार –** उच्च शिक्षण घेतलेल्या वर्गाची अपेक्षा असते की त्याला पांढरपेशा काम मिळावे. शारीरिक कष्टाचे काम करणे तो आपल्या पातळीच्या खालचे समजतो. त्यामुळे काही वेळा कामे असूनही ती करायला ग्रामीण सुशिक्षित तरूण तयार नसतात. त्यामुळे काही कामे उपलब्ध असूनही तरूण बेकार आहेत असे चित्र निर्माण होते.

**८) औद्योगिकीकरणाची धिमी गती–** ज्या प्रमाणात शिक्षणाचा प्रसार होत आहे किंवा ज्या प्रमाणात लोकसंख्येची वाढ होत आहे त्या प्रमाणात देशातील औद्योगिकीकरण वाढलेले नाही. याचे परिणाम शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांत दिसून येत आहेत. शिक्षणाचा अधिकार, सर्वशिक्षा अभियान, दुपारचे जेवण यांच्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार झाला परंतु ते शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेल्या तरूणांच्या हातांना रोजगार पुरवू शकेल इतक्या वेगाने भारताचे औद्योगिकीकरण झालेले नाही. लोकसंख्या वाढ इतक्या प्रमाणात होत आहे की औद्योगिकीकरणाचा वेग तिच्यापुढे हतबल ठरला आहे. एक नोकरी एकदाच उपलब्ध होते व ती घेणारा ती दीर्घकाळ करतो. त्यामागून येणाऱ्याला नोकरी पाहिजे असेल तर दुसरी संधी उपलब्ध करून द्यायला हवी. ती तेवढ्या सहजतेने उपलब्ध होत नाही. त्यामुळे ५०-६० वर्षांपूर्वीच्या तुलनेत औद्योगिकीकरण वाढलेले असूनही बेकारीचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. दरवर्षी मोठ्या संख्येने सुशिक्षित तरूण रोजगाराच्या बाजारात दाखल होत आहेत. औद्योगिकीकरणाचा वेग शिक्षण प्रसाराच्या वेगापेक्षा कमी आहे. त्यामुळे बेकारीची समस्या वाढते व अधिकाधिक क्लिष्ट होत जात आहे. हे ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील बेकारीच्या बाबतीत लागू आहे.

ग्रामीण भागात या समस्येचे गांभीर्य अधिकच वाढते कारण तिथे औद्योगिकीकरणासाठी अनुकूल वातावरण नसते. रस्ते, विद्युतपुरवठा, संचारसाधने या ज्या किमान गोष्टी

उद्योगांसाठी लागतात त्या ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात नसतात. त्यामुळे तिथे बेकारीची समस्या जास्त प्रमाणात भेडसावते. तेथील तरूणांना रोजगारासाठी शहरात येण्यावाचून काही पर्याय उरत नाही.

## ३.५ ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाय

ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. ही परिस्थिती दूर करायची असेल तर खालील उपाय केले पाहिजेत

*लोकसंख्येला आवर घालणे *शेतीला पूरक व्यवसाय वाढविणे *स्कील डेव्हलपमेंट *क्लस्टर डेव्हलपमेंट स्वरूपाची उद्योग उभारणी *सरकारी कामे हाती घेणे *नद्या व खोरे विकास महामंडळे *कृषी पर्यटनाला प्रोत्साहन *शिक्षण पद्ध-तीत बदल *श्रमाला प्रतिष्ठा

**१) लोकसंख्येला आवर घालणे** -

भारताची सगळी आर्थिक औद्योगिक प्रगती भयानक लोकसंख्यावाढीमुळे झाकोळून गेलेली आहे.बेकारीची समस्याही मुख्यतः या लोकसंख्यावाढीमुळेच उद्भवलेली आहे. पंचवार्षिक योजना, नियोजनबद्ध- विकास, सरकारी क्षेत्रातील मोठे उद्योग व सरकारी खाती यांच्याद्वारे देशाचे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले पण लोकसंख्येच्या वाढीपुढे ते तोकडे पडले आहे. शहरी असो वा ग्रामीण कोणत्याही क्षेत्रातल्या बेकारीला आवर घालायचा तर लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवले गेले पाहिजे. त्यासाठी समाजप्रबोधन घडवले पाहिजे. आणि संपर्काची सर्व साधने वापरली पाहिजेत.

**२) शेतीला पूरक व्यवसाय वाढविणे –**

शेती हा जरी मुख्य व्यवसाय असला तरी तो नेहमीच शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधरवायला अपुरा ठरतो.तेव्हा शेतीला पूरक असे व्यवसाय वाढण्यास उत्तेजन दिले पाहिजे. उदा.पशूपालन, दुग्धोत्पादन, स्थानिक वाहतूक वगैरे. त्यासाठी सरकारी आणि सामुदायिक सहकारी स्तरावर विशेष प्रयत्न झाले पाहिजेत. त्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी वित्तपुरवठा केला पाहिजे. शेतकऱ्यांनी या व्यवसायांकडे मोहरा वळवला तर त्यांचे उत्पन्न वाढू शकेल. त्यामुळे बेकारीची समस्या इतकी भेडसावणार नाही. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात तसेच गुजरातमध्ये दुग्धोत्पादन हा एक मोठा पूरक व्यवसाय आहे.

**३) कुटीरोद्योगांचे पुनरुज्जीवन –**

एके काळी भारतात अनेक प्रकारचे कुटीरोद्योग अस्तित्वात होते. भारतातील हातमागाच्या कापडाला जगभरात मागणी होती. काळाच्या ओघात अनेक कुटीरोद्योग नष्ट झालेले आहेत. हे कुटीरोद्योग म्हणजे भारतीय शेतकऱ्यांचे पूरक व्यवसायच होते. त्यांचे पुनरूज्जीवन केल्यास बेकारीच्या समस्येची मात्रा कमी होऊ शकेल.

### ३) स्कील डेव्हलपमेंट –

मूळात शिक्षण रोजगाराभिमुख नसल्याने बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. स्कील डेव्हलपमेंटच्या माध्यमातून काही कौशल्ये विकसित केल्यास तरूणांना रोजगार मिळणे सुलभ होईल. मोठ्या उद्योगांना विशिष्टरित्या प्रशिक्षित कामगार लागतात. त्यांना एकाच क्षेत्रात पूर्ण ज्ञान असलेले कामगार लागतात.



https://www.tatkalsamachar.com

जर तरूणांना कौशल्यविकास कार्यक्रमांतर्गत तसे प्रशिक्षण दिले तर मोठ्या कारखान्यांची गरजही भागेल आणि मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध होईल. जहाजबांधणी, समुद्रातून तेल काढणे, खाणकाम अशा अनेक उद्योगांत नेमके ज्ञान असलेले कुशल कामगार लागतात. त्या क्षेत्रांची माहिती तरूणांसाठी उपलब्ध करून दिली आणि त्याचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करून दिली तर बेकारीच्या समस्येची कडा कापली जाईल.

### ३) छोट्या उद्योगांना उत्तेजन –

छोट्या उद्योगांची कामगार सामावून घेण्याची क्षमता जास्त असते.त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी असतात. भारतात छोट्या उद्योगांना खूप मोठा वाव आहे. त्यांना वित्तपुरवठा करणाऱ्या अनेक संस्थाही आहेत. त्यांच्या माध्यमातून जर या उद्योगांना प्रोत्साहन दिले तर बेकारीला चाप बसेल. छोट्या उद्योगांना कमी व्याजदराने आणि जास्त मुदतीची कर्जे उपलब्ध करून दिली पाहिजेत. फळ प्रक्रिया, बेकरी, स्थानिक वाहतूक, कातडी कमावणे अशा स्वरूपाचे उद्योग कमी भांडवलात उभारले जाऊ शकतात. ते जागोजागी रोजगार उपलब्ध करून देऊ शकतात. त्यामुळे शहरांकडे येणारा बेरोजगारांचा लोंढा थांबू शकेल. बेकारीची समस्याही कमी होईल.

### ४) क्लस्टर डेव्हलपमेंट स्वरूपाची उद्योग उभारणी –

अनेक भौगोलिक स्थानांवर काही विशिष्ट प्रकारचे उद्योग एकवटलेले असतात. ते तिथल्या भौगोलिक परिस्थितीला अनुरूप असतात. उदा.महाराष्ट्रात कोकणात काजू प्रक्रिया, फळ प्रक्रिया उद्योग आहे. काही ठिकाणी हातमाग उद्योग एकवटलेला आहे. अशा प्रकारच्या उद्योगांना उत्तेजन दिल्यास तिथे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात

रोजगार निर्माण होऊ शकतो. सरकारने अशा एका जागी एकवटलेल्या उद्योगांना सामूहिक उत्तेजन देणाऱ्या उपाययोजना हाती घेतल्या पाहिजेत.

**५) सरकारी कामे हाती घेणे –**

कोणत्याही देशाच्या बेकारीच्या समस्येवरील उपाय हा सरकारने पुढाकार घेऊन काही कामे हाती घेणे हाच असतो. १९४० साली अमेरिकेत मंदी आली तेव्हा तेथील सरकारने हीच उपाययोजना केली होती. धरणे बांधणे, रस्ते बांधणे, डांबरीकरण, तलाव खोदणे, तलावांतील गाळ काढणे अशा स्वरूपाची कामे सरकारने हाती घेतली तर त्यांमुळे जनतेच्या हातांना काम मिळते. बेकारीची झळ कमी होते.सरकारद्वारे मजुरीच्या रुपात दिला गेलेला पैसा पुन्हा जीवनावश्यक गोष्टींच्या मागणीद्वारे चलनात येतो आणि एकूण मागणी वाढते. त्याद्वारे परत उद्योगांना चालना मिळते.

**६) नद्या व खोरे विकास महामंडळे –**

भारत सरकारने अनेक नद्या आणि त्यांच्या खोऱ्यांच्या विकासासाठी महामंडळे स्थापन केली आहेत. त्यांच्या माध्यमातून त्या त्या क्षेत्रांचा विकास केला जातो. ही महामंडळे त्या क्षेत्रातील एकंदरीत रोजगारवाढीसाठी प्रयत्न करतात. त्यामुळे त्या क्षेत्राचा विकास होतो. त्यामुळे मुख्यतः ग्रामीण बेकारी घटते.

**७) कृषी पर्यटनाला प्रोत्साहन –**

पर्यटन ही संकल्पना जुनीच आहे. तिचे नवे रूप कृषी पर्यटन या नावाने उदयाला आले आहे. शहरातील लोकांनी ग्रामीण जीवनाचा आनंद घेण्यासाठी खेड्यांमध्ये जायचे आणि शेतकऱ्यांनी त्यांचा सशुल्क पाहुणचार करायचा अशी कृषीपर्यटनामागची संकल्पना आहे. शहरात पैसा जास्त असतो पण शांतता, निसर्गसौंदर्य नसते. ग्रामीण भागात ते असते पण तिथे पैसा नसतो. कृषीपर्यटनाद्वारे या दोन्हींची सांगड घातली जाते. ग्रामीण भागातील बेकारीची समस्या सोडवण्यासाठी कृषीपर्यटन हा एक रामबाण उपाय आहे. पर्यटन हा व्यवसाय अलीकडे चांगला फोफावला आहे. पण त्यात काही ठरावीक पर्यटनस्थळांचा समावेश असतो. कृषीपर्यटन हे कुठेही घडू शकते. कल्पक शेतकरी यजमान आपल्या शेतीवाडीला पर्यटकांना आकर्षित करू शकेल असे विकसित करू शकतो. तसेच शेतीच्या माध्यमातून लहान मुलांना निसर्गसान्निध्याचे आणि सृष्टीचक्राचे धडे दिले जाऊ शकतात. पुण्यातील अलका टॉकीजचे मालक श्री. अनिल दामले यांची खामगाव तळ्याजवळ शेती आहे. तिथे त्यांची द्राक्षांची बाग आहे. पुण्यातील अनेक शाळा तिथे आपल्या मुलांना निसर्गसहवासासाठी नेतात. त्यातून मुलांना भुईमुग झाडाला कुठे लागतात, कापूस कुठे पिकतो अशा साध्या गोष्टी समजतात. तसेच मोठ्या माणसांसाठीही मासेमारी, बैलगाडी चालवणे असा ग्रामीण जीवनाचा अनुभव घेऊ शकतात. कृषीपर्यटनाच्या निमित्ताने स्थानिक वाहतूक, पशूपालन, स्थानिक कलाकुसरीच्या गोष्टी वगैरेंनाही चालना मिळते. एकूण कृषीपर्यटन हा ग्रामीण बेरोजगारीवरील एक उत्तम उपाय आहे. त्याची जाणीव शहरांत वाढवली पाहिजे.

**८) शिक्षण पद्धतीत बदल –**

बेकारीच्या समस्येवरील खात्रीशीर हमखास उपाय म्हणजे शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल. शिक्षण रोजगाराभिमुख केले पाहिजे. शालेय शिक्षणात व्यावसायिक कोर्सेसचा समावेश असला पाहिजे. छोट्या छोट्या कला उदा.केस कापणे, कपडे शिवणे, इलेक्ट्रिक काम, सुतारकाम या माणसाला स्वयंपूर्ण बनवू शकतात. त्यांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. शिक्षणाचा अर्धा भाग अभ्यासाचा व अर्धा भाग प्रात्यक्षिकांचा असला पहिाजे. किमान शिक्षण घेऊन जो बाहेर पडतो त्याच्या अंगात काही किमान कौशल्ये असली पाहिजेत. जेणेकरून तो समाजाची काही गरज भागवू शकेल आणि त्याला किमान स्वाभिमानाने जगण्यापुरता रोजगार मिळू शकेल.

**९) श्रमाला प्रतिष्ठा –**

शिक्षण म्हणजे पाढंरपेशे काम असा गैरसमज झाला आहे. सुशिक्षित लोक शारीरिक अंगकष्टाच्या कामांना तयार नसतात. त्यामुळे जे काम उपलब्ध आहे ते करायचे ते टाळतात. अर्थव्यवस्थेत सगळ्यांनाच ऑफिसस्टाफचे जॉब मिळणे शक्य नाही. त्यामुळे तरूणांनी शारीरिक अंगकष्टांच्या कामाबद्द्लची घृणा सोडून दिली पाहिजे.सर्व प्रकारच्या कामांना समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. व्हाईट कॉलर जॉब म्हणजे प्रतिष्ठा आणि कष्टाची कामे म्हणजे कमीपणा हे समीकरण समाजमनातून नाहीसे झाले पाहिजे.

## ३.६ सारांश

अविकसित देशांतून हंगामी स्वरूपाची बेकारी, घर्षणात्मक स्वरूपाची बेकारी विकसित देशांतीलबेकारीप्रमाणे अनुभवाला येते.त्याबरोबरच उत्पादन साधनांच्या उपलब्धतेमुळे मूळ असंतुलनामुळे तसेच उत्पादनतंत्रातील जलद बदलांमुळे उद्‌भवणारी संरचनात्मक बेकारीही अनुभवास येते. जागतिक मंदीच्या काळात, विकसित देशांतील बेकारीचे पडसाद आंतरराष्ट्रीय व्यापारातील अविकसित देशांतील निर्यातवस्तूंची मागणी कमी होऊन अविकसित देशांतही उमटतात. तसेच युद्धकालीन परिस्थितीत तात्पुरता फुगलेला रोजगार युद्धोत्तर काळात कोसळतो आणि बेकारीची कुऱ्हाड अविकसित देशांतील युद्धजन्य रोजगारातील कामकऱ्यांवरही कोसळते. थोडक्यात, अविकसित देशांमध्ये पूरक उत्पादन घटकांच्या अभावामुळे उद्‌भवणारी संरचनात्मक बेकारी ही स्थायी स्वरूपाची असते.हंगामी व घर्षणात्मक बेकारी ही देशातील एकूण बेकारीच्या परिस्थितीमध्ये विकसित देशातील अशा प्रकारच्या बेकारीपेक्षा अधिक काळ टिकणारी असते. त्याशिवाय, विकसित देशांशी आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे असणाऱ्या संलग्नतेमुळे आणि वासाहातिक आर्थिक संबंधांमुळे विकसित देशांतील रोजगाराच्या चढ-उतारांचे पडसादही अविकसित देशांतील रोजगार परिस्थितीवर अपरिहार्यपणे पडत असतात. तथापि ह्या उघड बेकारीबरोबर मोठ्या लोकसंख्या असलेल्या अविकसित देशांमध्ये बेकारीचे खालील दोन प्रमुख प्रकार अनुभवाला येतात:

## ३.७ स्वाध्याय

- ग्रामीण बेरोजगारी संकल्पना समजून घेणे .
- ग्रामीण बेरोजगारीचे प्रकार जाणून घेणे .
- ग्रामीण बेरोजगारीचे कारणे कारणे जाणून घेणे.
- ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी उपायांची माहीती करुन घेणे .

## ३.८ संदर्भ सूची


1) Rural Urban India-Imbalance in Growth Mr. M. L. Maurya, Shree Publishers and Distributers- 2008
2) Population and Poverty in Developing WorldMaunibal Singh2002.
3) The Economy of Maharashtra, Changing Structure and Emerging Issues Dr. B. L. Mungekar, Dr. Ambedkar Institute of Social and Economic Change, Mumbai.
4) Migration and Economy- Global and Local Dynamics- Edt. Lillian Targer. www.altamirapress.com
5) ग्रामीण अर्थशास्त्र एव सहकारिता सवलिया बिहारी वर्मा, विश्वकर्मा पब्लिकेशन्स, नव्वी दिल्ली.
6) जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव, खरे सीदिलीप राज प्रकाशन .प ., पुणे.
7) भारतातील ग्रामीण औद्योगीकरण, यशवंत पंडितराव, ग्रंथाली.


❖❖❖❖

# ४

# शेतजमीनीवरील लोकसंख्येचा भार

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण संकल्पना

४.३ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण करणे

४.४ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण परिणाम

४.५ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कमी करण्यासाठी उपाय

४.६ सारांश

४.७ स्वाध्याय

४.८ संदर्भ सूची

## ४.० उद्दिष्टे

- शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण संकल्पना
- शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कारणे
- शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण परिणाम
- शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कमीकरण्यासाठी उपाय

## ४.१ प्रस्तावना

लोकसंख्या वाढते, पण शेतीचा आकार मात्र स्थिर असतो. अर्थातच शेतीवर अवलंबून असलेले लोक जर, शेतीची उत्पादकता न घटता, कमी झाले तर शेतीतून तयार होणार संपत्ती कमी लोकात विभागली जाईल आणि त्या सर्वांच्याच आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. भारतातील ५८ टक्के शेतीवर अवलंबून आहेत. पण देशाच्या एकंदर संपती निर्मितीमध्ये त्यांचे योगदान १४ टक्केच आहे. ढोबळमानाने बोलायचे झाल्यास देशातील ५८ टक्के लोकांना देशाच्या एकंदर संपत्तीमधील १४ टक्केच संपत्तीचाच वाटा मिळतो. एवढी अफाट विषमता आहे. त्यामुळे शेतीमधील लोक झपाट्याने बिगरशेती क्षेत्रात गेले पाहिजेत. पण तसे होण्यासाठी अर्थातच औद्योगिक क्षेत्रातून श्रमाला मागणी वाढली पाहिजे. पण शेतीमधील बहुतांश मनुष्यबळ हे अकुशल आहे. म्हणजे औद्योगिक क्षेत्रामधे अकुशल श्रमाला मागणी वाढली पाहिजे आणि हे व्हायचे असेल तर औद्योगिक क्षेत्रात तयार होणाऱ्या उत्पादनाला मागणी वाढली पाहिजे. मात्र आपले औद्योगिक क्षेत्र निर्यातीभिमुख नसल्यामुळे

औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाला असलेली मागणी ही प्रामुख्याने देशातीलच लोकांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून आहे. त्यात देशातील बहुसंख्य लोक, जे शेतीवर अवलंबून आहेत, त्यांची क्रयशक्तीच इतकी कमी आहे की, औद्योगिक उत्पादनाच्या मागणीमध्ये वाढ होण्यामधील तो मोठा अडथळा ठरत आहे. तेव्हा जर शेतीमधून लोक औद्योगिक क्षेत्रात जायचे असतील तर शेतीमधील लोकांची क्रयशक्ती वाढली पाहिजे, तरच औद्योगिक क्षेत्रातील मालाला मागणी वाढेल. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात श्रमाला मागणी वाढेल आणि त्याचा परिणाम म्हणून शेतीमधील लोक औद्योगिक क्षेत्रात सामावले जातील. श्रीमंत माणसाच्या मिळकतीतील वाढ ही उच्च कौशल्याच्या मनुष्यबळाची मागणी वाढवते. (उदाहरणार्थ, तो पैसा ज्या उपाहार गृहात खर्च होईल तेथील वेटरना देखील इंग्रजी बोलता येत असते) पण गरीब माणसाच्या मिळकतीतील वाढ अकुशल श्रमाची मागणी वाढवते.

शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्याचा प्रभावी मार्ग शेती विकास हाच आहे. ही लोकसंख्या उद्योग क्षेत्रात वळवली जाण्यासाठी आवश्यक कौशल्ये लोकांना देण्याचा कार्यक्रमही तितकाच महत्त्वाचा. अमेरिका, कॅनडा, चीन यासारख्या देशांचा अनुभव हेच सांगतो. चीनमध्ये तर दारिद्र्य निर्मूलनातील जवळजवळ ८० टक्के वाटा हा शेती विकासाचा होता.

## ४.२ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण संकल्पना

### जमिनाचे विभाजन (Sundivision of Land)

मुळातच भारतीय शेतजमिनीची वाटणी विषम स्वरुपाची झाली आहे. सुमारे ५० टक्के कुटुंबाच्या वाटयाला एका हेक्टरपेक्षा कमी जमीन आली आहे. जमिनीचे लहान लहान तुकडे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या वाटयाला आले आहेत. शिवाय अशा तुकड्यांचेही आंतरविभाजन होत आहे. एकाच्या मालकीच्या जमिनीचे भिन्न लोकात जे विभाजन घटून येते त्याला विभाजन किनवा उपविभाजन (Subdivision) असे म्हणतात.

या प्रकारच्या विभाजनाची निरनिराळी कारणे सांगण्यात येतात.

### जमिनीचे अपखंडन (Fragmentation of Land)

वडिलोपार्जित जमीन वारसदारामध्ये वाटलीजाते, परंतु ही जमीन सारख्या सुपिकतेची नसते. काही जमीन जास्त सुपीक तर काही कमी सुपीक असते. काही जमीन बाजारपेठेजवळ तर काही दूर असते, काही जमीन रोडवर तर काही दूर डोंगराळ भागात असते. त्यामुळे प्रत्येक वारसदार चांगल्या आणि सोयीच्या जमिनीमध्ये हिस्सा मागतो. त्यामुळे एकाच्या मालकीची सलग जमीन न राहता ती तुकडया - तुकडयामध्ये निरनिराळ्या ठिकाणी विभागली जाते. एकाच व्यक्तीच्या जमिनीचे असे निरनिराळ्या ठिकाणी तुकडे पाडण्याच्या क्रियेला अपखंडन असे म्हणतात. विभाजनाप्रमाणेच अपखंडन ही देखील एक प्रक्रिया आहे. अपखंडनाच्या प्रक्रियेमध्ये एका व्यक्तीच्या मालकीची जमीन इतस्ततः विखुरलेली असते. या प्रक्रियेत जमिनीचे फारच लहानलहान तुकडे पडत असतात. अशा तुकड्यांवर मशागत करणेदेखील कठीण होऊन जाते. विभाजनापेक्षाही अपखंडनाचे जास्त विपरित परिणाम होत असतात.

## ४.३ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कारणे

आंतरविभाजन किंवा विभाजनाची कारणे :

**(१) लोकसंख्येची वाढ :**

मागील काही वर्षात देशाच्या लोकसंख्येत मोठया प्रमाणावर वाढ झाली. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढला. लहानशा जमिनीवर हक्क मागणाऱ्या वारसदारांची संख्या वाढत गेली आणि शेतीचे विभाजन होत गेले.

**(२) वारसा हक्काचा कायदा :**

देशातील लोकांसाठी वारसाहक्काचे कायदे प्रचलित आहेत. अशा कायद्यानुसार वडिलांची संपत्ती सर्व मुलाबाळांना सारख्या प्रमाणात मिळत असते. या कायद्यामुळे वडिलोपार्जित जमिनीचे विभाजन वारसदारांमध्ये होत असते.

**(३) वैयक्तिक स्वातंत्र्याची वृत्ती :**

इंग्रजांच्या काळात खाजगी मालमत्ता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यावर भर देण्यात आला. त्यामुळे कुटुंबात बाहेर पडून स्वतंत्र होण्याची प्रवृत्ती वाढू लागली. भारतामधील संयुक्त कुटुंबपध्दती (Joint Family System) मोडकळीस आली. प्रत्येक वारसदार जमिनीवर हक्क सांगू लागला आणि वेगळे होण्याची भाषा बोलू लागला.परिणामतः शेतीचे लहान लहान तुकड्यांमध्ये विभाजन होऊ लागले. शेताचा आकार लहान होण्यासाठी विभाजन हे एक प्रमुख कारण होय.

**(४) हस्तव्यवसायाचा ऱ्हास :**

ब्रिटिश काळात हस्तव्यवसाय व ग्रामोद्योगाचा ऱ्हास होत गेला. हस्तव्यवसायातील मालाला कारखान्यात तयार झालेल्या मालाशी स्पर्धा करावी लागली. स्पर्धेमध्ये हस्तउद्योग टिकाव धरू शकले नाहीत. त्यामुळे हस्तउद्योग बंद पडून बेकारी निर्माण झाली. सरतेशेवटी असे रोजगारविहीन लोक शेतीकडे वळले आणि त्यामुळे शेतीचे विभाजन होत गेले.

**(५) औद्योगीकरणाचा अभाव :**

जमिनीच्या विभाजनाचे आणखी एक कारण म्हणजे ग्रामीण भागात औद्योगीकरणाचा अभाव होय. देशामध्ये मोठया प्रमाणावर औद्योगिकरण झाले असते तर असंख्य शेतकरी कुटुंबियांना उद्योगधंद्यात रोजगार मिळाला असता. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी झाला असता आणि विभाजनाच्या प्रक्रियेला आळा बसला असतो.

**(६) जमिनीचे आकर्षण :**

आपल्या देशात जमीन हा केवळ संपत्तीचा विषय नसून सामाजिक प्रतिष्ठेचा विषय होय. ज्याच्यांजवळ जास्त जमीन त्यांची प्रतिष्ठा वाढत असे आणि आणि भूमीहिनांची अप्रतिष्ठा केली जाई. त्यामुळे आपल्या मालकीची थोडी तरी जमीन असावी असे प्रत्येकाला वाटू लागले. लोक जमिनीचा लहानमोठा तुकडा विकत घेऊ लागले. जमिनीच्या जबरदस्त आकर्षणामधून विभाजन वाढत गेले.

**(७) शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणा :**

भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जात मरण पावतो असे म्हटले जाते. कित्येकदा कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला आपल्या जमिनीचा तुकडा विकावा लागतो किंवा गहाण ठेवावा लागतो. कावेबाज सावकारांनी शेतकऱ्यांना फसवून त्यांच्या जमिनीचा काही भाग गिळंकृत केला शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे विभाजनाची प्रक्रिया वाढत जाते.

**(८) कौंटुंबिक जबाबदारी :**

शेतकरी कुटुंबप्रमुखावर अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात. जसे मुलामुलीचे शिक्षण, लग्नकार्य, कुटुंबातील घटकांचे आरोग्य इत्यादी. कुटुंबावर काही प्रसंगी अपघात, मृत्यू यासारखी संकटे ओढवतात. तेव्हा संकटांना तोंड देण्यासाठी तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी फार मोठया रकमेची गरज असते. अशावेळी शेतकरी आपल्या जमिनीचा काही हिस्सा दुसऱ्यास विकून आपली गरज भागवितो. त्यामुळे विभाजनाची प्रक्रिया वाढीस लागते.

## ४.४ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण परिणाम

**विभाजन व अपखंडनाचे दुष्यपरिणाम :**

**शेतीचे विभाजन अपखंडन प्रक्रियांचे अनेक दुष्यपरिणाम भोगावे लागतात.**

(१) **लागवडीच्या खर्चात वाढ :** एकाच्या मालकीच्या जमिनीचे तुकडे निरनिराळ्या भागांत विखुरलेले असतात. त्यामुळे लागवडीच्या खर्च जास्त होतो. प्रत्येक तुकड्यावर बैल, अवजारे, श्रमिक व इतर सामग्री त्याची लागते. त्यासाठी वेळ लागतो आणि खर्च वाढतो. निरनिराळ्या तुकड्यांवर मशागत करणे व देखरेख ठेवणे कठीण होऊन जाते.

(२) **जमिनीची अपव्यय :** शेतजमिनीचे विभाजन आणि अपखंडन यामुळे जमिनीचा अपव्यय होत असतो. प्रत्येक शेताच्या तुकडयाभोवती कुंपण घालणे, पायवाटा आणि रस्ते यासाठी जागा सोडणे आवश्यक असते. त्यामध्ये जमीन वाया जाते. लगतच्या दोन तुकड्यांमध्ये कुंपण आणि पायवाटा नसतील तर संबंधित शेतकऱ्यामध्ये नेहमी भांडणे होत असतात. विभाजन आणि अपखंडनामुळे सुंमारे २० टक्के जमिनीचा अपव्यय होत असावा असा अंदाज आहे.

(३) **श्रमभांडवलाचा अपुरा वापर :** प्रत्येक शेतकऱ्याला शेती वाहण्यासाठी स्वतः काम करावे लागते तसेच किमान दोन बैल ठेवावे लागतात. एक शेतकरी आणि दोन बैल यांच्या शक्तीचा पुरेपूर वापर घ्यावयाचा झाल्यास कोरडवाहूची सुंमारे २० एकर सलग जमीन सलग जमीन हवी, यापेक्षाही कमी जमीन असेल तर श्रमशक्तींचा व बैलांचा पुरेपूर वापर करता येणार नाही. अशावेळी श्रमभांडवलाचा वापर कमी होईल. तात्पर्य. विभाजन आणि अपखंडनामुळे श्रम, बैल, अवजारे, इत्यादींचा योग्य वापर करता येत नाही.

(४) **आधुनिक सुधारणा अशक्य :** जमिनीची लहानसहान तुकड्यात विभागणी झाल्यामुळे विहिरी बांधणे, कालवे काढणे, ट्रॅक्टर व इतर यंत्राचा वापर करणे, नवीन बी-बियाण्यांचा वापर करणे इत्यादी गोष्टी शक्य होत नाही. शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर करता येत नाही. त्यामुळे उत्पादकतेवर विपरित परिणाम होत असतो.

## ४.५ शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कमी करण्यासाठी उपाय

**विभाजन व अपखंडनावर उपाययोजना :**

विभाजन व अपखंडनाचे दुष्यपरिणाम टाळण्यासाठी खालील उपाय सुचविण्यात येतात.

(१) **वारसा हक्क कायद्यात बदल करणे :** वडिलोपार्जित जमीन सर्व अपत्यांना सारखी वाटावी असे वारसाहक्क कायदा सांगतो. या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी आणि वडिलांची जमीन फक्त जेष्ठ मुलाला देण्यात यावी. असे झाले तर विभाजन व अपखंडनाला आपोआप आळा बसेल. हातपाय कितीही चांगला असला तरी भारतामधील प्रचलित सामाजिक आणि राजकीय प्रणालीला तो मान्य होईल असे वाटत नाही.

(२) **संयुक्त लागवड पद्धती :** वारसा हक्कानुसार जमिनीची विभागणी कागदोपत्री वारसदारामध्ये व्हावी परंतु जमीन कसण्याच्या दृष्टीने ती एकत्र राहील अशी कायद्याद्वारे तरतूद करावी. अशी तरतुदीमुळे एका कुटुंबांची जमीन सलग राहील आणि सर्व वारसदार संयुक्तरीत्या ती जमीन वाहतील. संयुक्त लागवडीचा उपाय तत्वतः चांगला आहे; परंतु एका कुटुंबातील वारसदार गुण्यागोविंदाने वडिलोपार्जित शेती करतील याची सुतराम शक्यता नाही. भावाभावांत द्वेष, हेवेदावे, मतभेद व गैरविश्वास असताना संयुक्त लागवड कदापि यशस्वी होणार नाही.

(३) **शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण :** विभाजन व अपखंडन यावर एक जालीम उपाय आहे आणि तो म्हणजे संपूर्ण शेतीचे राष्ट्रयीकरण झाले म्हणजे विभाजन आणि अपखंडनाचा प्रश्नच उद्भवणार नाही. राष्ट्रीयीकरणानंतर सामुहिक शेतीचा अवलंब करता येईल. परंतु भारतात शेतीच्या राष्ट्रयीकरणाला तीव्र विरोध आहे.

(४) **सहकारी शेती :** सार्वजनिक शेती आणि व्यक्तिगत शेती यांचा सुवर्णमध्य म्हणजे सहकारी शेती होय. ज्या शेतकऱ्यांची शेती लागून आहे. अशा ठराविक क्षेत्रफळाच्या लोकांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर शेती करावी, म्हणजे जमिनीचे तुकडे पडण्याच्या प्रश्नच निर्माण होणार नाही. यामध्ये कागदोपत्री व सरकारी दप्तरी प्रत्येकाची जमीन त्याच्या नावावर दाखविली जाते; हा उपाय अतिशय चांगला आहे; सहकारात दप्तरी प्रत्येकाची जमीन त्याच्या नावावर दाखविली जाते; हा उपाय अतिशय चांगला आहे; सहकारात सचोटी, प्रामाणिकपणा, सलोखा, सामंजस्य व परस्परांवर विश्वास या सदगुणांचा अभाव भारतीय लोकांमध्ये आढळून येतो त्यामुळे केले सहकारी शेतीचा प्रयोग फसला आहे.

(५) **जमिनीचे एकत्रीकरण किंवा तुकडेबंदी (Consolidation of Holdings) :** एकाच्या मालकीची किंवा वाहिवाटीखाली असलेली इतस्ततः पसरलेली जमीन एका ठिकाणी आणण्याचा उपक्रमाला तुकडेजोड, एकत्रीकरण असे म्हणतात. हे एकत्रीकरण किंवा संघटन शक्तीने, कायद्याद्वारे, स्वच्छेने अथवा सहकारी तत्वावर होऊ शकते. याला काही ठिकाणी चकबंदी असेही म्हणतात. एका शेतकऱ्याच्या मालकीची विविध ठिकाणची जमीन एका ठिकाणी आणता येत नाही, परंतु एकमेकांच्या शेतालगतच्या तुकड्याची स्वच्छेने अदलाबदल करण्याची अन्यथा भूधारकाची तयारी असेल तर जमिनीचे एकत्रीकरण सहज आणि सुलभ होते. सरकार कायद्याच्या माध्यमातून असे एकत्रीकरण सक्तीने घडवून आणू शकते. एकत्रीकरणाच्या बाबतीत पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि बडोदे संस्थान या प्रदेशात एकत्रीकरण मोठया प्रमाणावर सफल झाले आहे.

(६) **तुकडेजोड** : तुकडेजोडीचा कार्यक्रम दोन प्रकारांनी हाती घेतला जातो. पंजाब व उत्तर प्रदेश या राज्यांत प्रत्येक गावच्या जमिनीची फेरआखणी करण्याची पद्धती स्वीकारण्यात आली आहे. खेड्याच्या सर्व जमिनीची सर्वकष पाहणी करावयाची, नंतर सरासरी एका एकराचे चौकोन पाडायचे व ते खातेदारांना द्यावयाचे; ज्यांना पूर्वीपेक्षा कमी जमीन मिळेल त्यांना नुकसान भरपाई द्यावयाची, असा हा कार्यक्रम आहे. हा अतिशय खर्चिक आहे. तरी पंजाबात या कार्यक्रमाची खूपच प्रगती आहे. दुसरी पद्धती म्हणजे, आहे त्याच तुकड्यांचे एकत्रीकरण करावयाचे व त्या दृष्टीने आवश्यक तेवढी मालकी हक्काची अदलाबदल करावयाची. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश वगैरे बहुतेक राज्यांत हीच पद्धती अंगिकारण्यात आलेली आहे. जमिनीची प्रतवारी कमीअधिक असल्याने तुकड्यांची अदलाबदल करताना काही खातेदारांचे नुकसान होते. त्यांना नुकसानभरपाई देण्याची तरतूद सर्व राज्यांत आहे. तुकडेजोडीच्या कार्यक्रमाचा दर एकरी खर्च बिहारमध्ये सरासरी रू. २३.१५, तर कर्नाटक मध्ये सरासरी रू. १.६० आला. सुरूवातीच्या काळात खर्च जास्त होता, नंतर तो कमी होऊ लागला.

**बडोदे संस्थान :**

एकत्रीकरण किंवा संघटनाचा पहिला प्रयत्न १९२७ मध्ये बडोदे संस्थानमध्ये कायद्याद्वारे करण्यात आला. पंजाब : सहकारी तत्वावर जमिनीच्या एकत्रीकरणाचा प्रयोग पंजाबमध्ये यशस्वी ठरला. कारण या प्रदेशात त्यासाठी अनुकूल वातावरण होते. या प्रदेशात एकत्रीकरणाचा कायदा १९३६ मध्ये मंजूर करण्यात आला. अवघ्या तीन वर्षात ३ कोटी एकर जमिनीपैकी १ कोटी एकर क्षेत्रफळाच्या तुकड्याचे एकत्रीकरण करण्यात आले. पंजाब आणि हरियाणा या प्रदेशात एकत्रीकरणाचे कार्य आता जवळपास पूर्ण होत आहे. मध्यप्रदेशमध्ये १९२८ मध्ये चकबंदी किंवा तुकडेजोड कायदा पास करण्यात आला. मध्यप्रदेशमध्ये चकबंदीची योजना फारच यशस्वी झाली आहे. सन १९७२ पावेतो ३० लाख १८ हजार जमिनीचे एकत्रीकरण करण्यात आले. महाराष्ट्र : मुंबई राज्यात एकत्रीकरणाचा कायदा १९२७ मध्ये पास करण्यात आला. या कायद्यानुसार शेताचा योग्य आकार ठरविण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला. सध्याच्या महाराष्ट्र राज्यात मार्च १८८५ पावेतो १.७५ कोटी हेक्टर जमिनीचे एकत्रीकरण करण्यात आले.

(७) **लोकसंख्या उद्योगक्षेत्रात वळवणे :** शेतजमिनीवरील वाढता भार कमी करावयाचा असेल तर शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या इतर उद्योग क्षेत्रात वळविणे गरजेचे आहे. आज अनेक ग्रामीण उद्योग सुरू करण्यास वाव आहे. ग्रामीण भागात संस्थात्मक पतपुरवठ्याची साधने उपलब्ध आहेत. याखेरीज स्वतंत्र पणे शेती पूरक व्यवसाय करणे देखील सोयीचे आहे.

(८) **समूह / गट शेती :** जमिनीचे सातत्याने होत असलेले विभाजन/तुकडे लोकसंख्यावाढी बरोबरच शेतीची धारणक्षमता दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे. कृषिगणनेच्या प्रकाशित केलेल्या सन २०१०-११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात सन १९७०-१९७१ या वर्षी असलेले ४.२८ हेक्टरची धारण क्षमता सातत्याने कमी होऊन सन २०१०-२०११ मध्ये ती १.४४ हेक्टर प्रति खातेदार इतकी कमी आहे. काही ठिकाणी तर ती ११ ते १५ गुंठे इतक्या कमी आकारावर शेती कसण्यासाठी सलग क्षेत्र शिल्लक राहिलेले आहे. अशा परिस्थितीत एवढ्या छोट्या क्षेत्रावर शेती करुन व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर उत्पादन घेणे अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. या सर्व समस्यांवर सामुहीक शेतीपध्दतीद्वारे व एकत्र केल्या जाणा-या क्षेत्रामुळे गटांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान देणे सोईचे ठरते.



**महिला गट शेती**

**https://www.agrowon.com**

## ४.६ सारांश

भूधारण क्षेत्राचे फार लहान तुकडे झाल्याने उत्पादनात अडथळा येतो. म्हणून तुकडे आहेत त्यापेक्षा लहान होऊ नयेत, या दृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना करणे व आहे, त्या तुकड्यांचे शक्य तितके एकत्रीकरण करून प्रत्येक तुकड्याचे सरासरी क्षेत्रफळ वाढविणे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी तुकडेबंदी व तुकडेजोडीचे कायदे मुंबई, पंजाब, मध्य प्रदेश, हैदराबाद व संयुक्त प्रांत या प्रांतात होते. पहिल्या योजनेनंतर ओरिसा, पश्चिम बंगाल, राजस्थान, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, आसाम, जम्मू व काश्मीर या राज्यांत कायदे झाले. जेथे जुने कायदे होते, त्या राज्यांतही संबंधित कायद्यांत खूप सुधारणा झाल्या. तरी खरेदी विक्री, गहाणवट, कूळे व हिंदू एकत्र कुटूंबातील संपत्तीची विभागणी या कारणांमुळे परत तुकडीकरण वाढते असे दिसते.

## ४.७ स्वाध्याय

१) लोकसंख्या वाढमुळे शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कसे होते ते सविस्तर लिहा.
२) शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कारणे सविस्तर लिहा.
३) शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण परिणामाची आढावा घ्या.
४) शेतजमिनीचे उपविभाजन आणि तुकडीकरण कमीकरण्यासाठी उपाय सुचविणे

## ४.८ संदर्भसूची


1. Rural Urban India-Imbalance in Growth Mr. M. L. Maurya, Shree Publishers and Distributers- 2008
2. Population and Poverty in Developing WorldMaunibal Singh2002.
3. The Economy of Maharashtra, Changing Structure and Emerging Issues Dr. B. L. Mungekar, Dr. Ambedkar Institute of Social and Economic Change, Mumbai.
4. Migration and Economy- Global and Local Dynamics- Edt. Lillian Targer. www.altamirapress.com
5. ग्रामीण अर्थशास्त्र एव सहकारिता सवलिया बिहारी वर्मा, विश्वकर्मा पब्लिकेशन्स, नव्वी दिल्ली.
6. जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव, खरे सी. प. दिलीप राज प्रकाशन, पुणे.
7. भारतातील ग्रामीण औद्योगीकरण, यशवंत पंडितराव, ग्रंथाली.


❖❖❖❖

# ५

# स्थलांतर - प्रकार, कारणे आणि उपाय

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ स्थलांतराच्या व्याख्या

५.३ स्थलांतराचे प्रकार

५.४ स्थलांतराची कारणे

५.५ स्थलांतराचे परिणाम

५.६ स्थलांतर थांबविण्यासाठी उपाय

५.७ सारांश

५.८ स्वाध्याय

५.९ संदर्भसूची

## ५.० उद्दिष्टे

- स्थलांतर संकल्पना समजून घेणे.
- स्थलांतराच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
- स्थलांतराची कारणे जाणून घेणे.
- स्थलांतराचे परिणाम अभ्यासणे आणि स्थलांतर उपायांची माहीती करुन घेणे.

## ५.१ प्रस्तावना

विविध कारणास्तव नागरिक आपले राहाते घर आपला प्रदेश आणि प्रसंगी आपला देशही सोडून इतर परक्या प्रदेशामध्ये वास्तव्यास जातात. ही स्थिती मनुष्य प्राण्यांमध्ये अगदी इतिहास काळापासून प्रचलित आहे. या प्रकाराला स्थलांतर असे म्हणतात. काही प्रदेशामध्ये बाहेरुन माणसे त्या प्रदेशात येतात तर काही प्रदेशातून माणसे इतरत्र बाहेर जातात. ज्या प्रदेशातून माणसे बाहेर जातात त्या प्रदेशात रोजगार किंवा सामाजिक राजकीय प्रश्न निर्माण झालेले असतात किंवा शिक्षणासाठी नागरिक इतरत्र जात असतात.

ज्या प्रदेशात लोक बाहेरुन येतात त्या प्रदेशाच्या बाबतीत विचार करावयाचा झाल्यास तेथे एकतर रोजगार संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेल्या असतात तसेच शैक्षणिक संशोधन संस्थांची वाढ उत्तम झालेली असते. नागरी सुविधाही बहुतांश उत्तम प्रकारे किंवा चांगल्या प्रमाणात उपलब्ध झालेल्या असतात.

लोकसंख्येची वाढ किंवा लोकसंख्या कमी होणे हीसुद्धा स्थलांतरासाठी कारणीभूत होऊ शकते. उदा. लोकसंख्येची नैसर्गिक वाढ असेल तर स्थलांतर बहुधा होणार नाही. परंतु लोकसंख्येची वाढ भरमसाठ असेल तर वाढत्या लोकसंख्येत निवारा, रोजगार अशा समस्यांना सामोरे जावे लागते, यातून लोकसंख्येचे स्थलांतर होत असते. अशाप्रकारे लोकसंख्येचे स्थलांतर सातत्याने सुरु असते.

## ५.२ स्थलांतराच्या व्याख्या

**१)** स्थलांतर म्हणजे एका जागेवरुन दुसऱ्या जागेत इतर कोणत्याही ठिकाणी जाणे होय.

**२) संयुक्त राष्ट्र संघ :**

एका भौगोलिक ठिकाणापासून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणापर्यंत केलेली हालचाल म्हणजे स्थलांतर. मूळ ठिकाणापासून इतरत्र ठिकाणी हलविलेले मुक्काम याला स्थलांतर म्हणता येईल.

**३) केनेथ कोमेथेर :**

एका भौगोलिक विभागामधून दुसऱ्या भौगोलिक विभागात दीर्घकाळ किंवा अल्प काळाकरिता निवास करण्याच्या हेतूने व्यक्ती अथवा मानवी समूह जातो अथवा त्याची हालचाल होते त्याला स्थलांतर असे म्हणतात.

**४) लोकसंख्या शास्त्र :**

लोक जेव्हा एका प्रदेशातील वास्तव्य सोडून दुसऱ्या प्रदेशात दीर्घकाळ किंवा कायम निवासाकरिता जातात त्याला स्थलांतर असे म्हटले जाते.

अशाप्रकारे मानव वैयक्तिक पातळीवर अथवा सामूहिक पातळीवर आपले जीवनमान अधिक आनंदी-सुखकर बनविण्यासाठी स्थलांतर करत असतो. आपले जीवनमान जेथे सुखाने घालवता येईल त्या जागेत तो वास्तव्याला प्राधान्यक्रम देतो. बऱ्याचवेळा रोजगारासाठी मानव स्थलांतर करत असतो. अशा वेळी तो बहुतकरुन शहरांचा आधार घेण्याचा प्रयत्न करतो. शहरात राहाताना त्याचे जीवन सुखी होईलच असे नाही. फक्त त्याला जगण्यासाठीच्या उत्पन्नाची हमी मिळते ही त्याच्या दृष्टीने महत्त्वाची सुरक्षितता असते.

काही वेळा नोकरी निमित्त स्थलांतर घडते हे स्थलांतर ग्रामीण आणि शहरी अशा स्वरुपात असू शकते. नोकरी किंवा धंदा हे जगण्यासाठीच्या आर्थिकतेचे महत्त्वाचे साधन असते. त्यामुळे व्यक्तीला जेथे नोकरीची संधी उपलब्ध असते तेथे जावे लागते.

## ५.३ स्थलांतराचे प्रकार

स्थलांतर हे प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कारणांनी होत असते. या संदर्भात स्थलांतराचे प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### ५.३.१ एका देशातून दुसऱ्या देशात होणारे स्थलांतर :

एका देशातून दुसऱ्या देशात होणारे स्थलांतर प्रामुख्याने रोजगारासाठी असते किंवा त्या देशात वास्तव्य करण्याच्या उद्देशाने असू शकते. उच्च राहणीमानासाठी काही लोक परदेशात स्थलांतर करतात. उदा. भारतातील काही उच्च उत्पन्न गटांचे नागरिक उच्च जीवनमानाचा अनुभव घेण्यासाठी किंवा उच्च राहणीमानात जीवन जगण्यासाठी अमेरिका, इंग्लंड, फ्रांस या देशात जाऊ वास्तव्य करतात. याला एका देशातून दुसऱ्या देशात होणारी स्थलांतर म्हणता येईल.

### ५.३.२ एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणारे स्थलांतर :

देशांतर्गत होणारे हे स्थलांतर असते. नागरिक आपला प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात वास्तव्यास किंवा रोजगारास जातात त्याला एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणारे स्थलांतर असे म्हणतात. उदा. बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यातून बहुसंख्य मजूरवर्ग रोजगारासाठी महाराष्ट्र राज्यात आलेला दिसतो. तेथे पुरेशा रोजगाराची सोय नसल्यामुळे हे नागरिक देशांतर्गत स्थलांतर करताना दिसतात.

या स्थलांतराला राजकीय आणि सामाजिक कारणे देखील असू शकतात. सध्या काश्मिर सारख्या प्रदेशात अशांतता आहे. नागरिकांचे जीवनमान प्रभावित झाले आहे. या कारणांमुळे नागरिक आपल्या सुरक्षित जगण्याचा प्रामुख्याने विचार करतात.

### ५.३.३ नैसर्गिक आपत्तीत होणारे स्थलांतर :

एखाद्या प्रदेशात सातत्याने नैसर्गिक आपत्ती येत असतील तर नागरिकांना आपले जीवन सुरक्षित वाटत नाही. अचानक भूकंप आला तरीही नागरिक भयभीत होऊन आपला परिसर सोडून इतरत्र जाण्याचा प्रयत्न करतात. या स्थलांतराला प्राथमिक स्थलांतर असेही म्हटले जाते. पूर, भूकंप, ओला आणि कोरडा दुष्काळ, भूस्खलन, पाणी टंचाई ही काही नैसर्गिक आपत्तीची महत्त्वाची उदाहरणे आहेत.



https://hindivivek.org

### ५.३.४ सक्तीचे स्थलांतर :

बऱ्याचवेळा सरकार विकासासाठी अनेक प्रकल्पांचे नियोजन करते. अशावेळी भू-संपादन करावे लागते. हे भूसंपादन करताना सदर जमिनीवरील मानवी वस्ती सक्तीने हटवली जाते. त्याला सक्तीचे स्थलांतर असे म्हणतात. राजकीय कारणे ही या स्थलांतराची प्रमुख कारणे असतात.

एखाद्या देशाच्या सरकारने हद्दपार करणे, गुलाम करण्यासाठी पकडून नेणे ही सुद्धा सक्तीच्या स्थलांतराची उदाहरणे आहेत.

सरकार जेव्हा विकासाचे प्रकल्प घेते तेव्हा नागरिकांना सक्तीचे स्थलांतर करायला लावते. उदा. गुजरात राज्यात नर्मदा सागर प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पामुळे गुजरात, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या तीन राज्यातील लाखो आदिवासी बांधवांना स्थलांतर करावे लागले. महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील नागरिकांना सक्तीचे स्थलांतर करावे लागले होते.

### ५.३.५ मुक्त किंवा ऐच्छिक स्थलांतर :

बऱ्याचदा व्यक्ती नावीन्याची ओढ म्हणून किंवा साहस म्हणून स्थलांतर करतात त्याला मुक्त किंवा ऐच्छिक स्थलांतर असे म्हणतात. अशा स्वरुपाचे स्थलांतर करणाऱ्या व्यक्ती एखादे साहस किंवा छंद जोपासण्यासाठी एका देशातून दुसऱ्या देशात किंवा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात वास्तव्यास जातात व तेथे तात्पुरते अथवा कायम स्वरुपी निवासस्थान करतात त्याला मुक्त किंवा ऐच्छिक स्थलांतर असे म्हटले जाते.

### ५.३.६ सामूहिक स्थलांतर :

अशा स्वरुपाचे स्थलांतर हे ग्रामीण भागात प्रामुख्याने आढळते. शेती हंगाम संपल्यानंतर नागरिक ज्या ठिकाणी कामाची उपलब्धता असते अशा परिसरात स्थलांतर करतात. पुन्हा शेतीची कामे सुरु झाली की गावात परत येतात.



**https://marathi.abplive.com**

काही वेळा दुष्काळसदृश परिस्थितीत दुष्काळाची समस्या कमी होईपर्यंत लोक इतरत्र स्थलांतर करतात याला हंगामी स्थलांतर असे म्हणतात. उदा. नगर जिल्ह्यात अथवा पश्चिम महाराष्ट्रात ऊसकापणीच्या हंगामापुरते लोक इतर जिल्ह्यातून येतात. एका अप्रगत

प्रदेशातून मोठ्या संख्येने प्रगत प्रदेशात स्थलांतर होते त्यास सामूहिक स्थलांतर असे म्हणतात.

### ५.३.७ साखळी स्थलांतर :

काहीवेळा टप्प्याटप्प्याने स्थलांतराचा ओघ विशिष्ट दिशेने सरकताना आढळतो, त्याला साखळी स्थलांतर असे म्हणता येते. उदा. एखाद्या खेड्यातून तालुक्याच्या गावी तेथून जिल्हा केंद्रापर्यंत, तेथून प्रांताची राजधानी अशी साखळी दिसून येते. तसेच या साखळीत प्रथम काही लोक स्थंलातर करतात ते मित्र व नातेवाईकांना स्थलांतरास उद्युक्त करतात. अशाप्रकारे अनेकांचे साखळी स्थलांतर होत असते.

### ५.३.८ ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर :

भारतासारख्या शेती अर्थव्यवस्था असलेल्या देशाच्या ग्रामीण भागात सर्वच ठिकाणी शेतीला अनुकूल परिस्थिती नसते काही ठिकाणी प्रतिकूल परिस्थितीही असते. उदा. पाण्याची व्यवस्था ज्या परिसरात असते त्या परिसरात शेतीला अनुकूल परिस्थिती असते त्या परिसरात इतर ग्रामीण भागातील नागरिक शेतीच्या कामासाठी स्थलांतर करतात त्याला ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर असे म्हणतात.

### ५.३.९ ग्रामीण ते शहरी स्थलांतर :

ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध नसल्याने नागरिक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतात त्याला ग्रामीण ते शहरी स्थलांतर असे म्हणतात. कोकणातील नागरिकांना स्थानिक ठिकाणी रोजगार नसल्यामुळे त्यांनी मुंबई शहरात रोजगारासाठी स्थलांतर केले. तेथे त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली त्यामुळे त्यांच्या जीवनास स्थैर्य मिळण्यास मदत झाली.

### ५.३.१० स्थानिक स्थलांतर :

हे स्थानिक पातळीवर होणारे स्थलांतर असते. उदा. एका गावातून दुसऱ्या गावात होणारे स्थलांतर. उदा. गावातून तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहावयास जातात. मानवाची आर्थिक उन्नती झाली की त्याची राहणीमान सुधारते. त्याच्या राहाणीमानानुसार त्याला गावात नागरी सुविधा उपलब्ध होत नाहीत त्यामुळे ही मंडळी आपल्या गावापासून जवळ असणार्या तालुक्याच्या गावी निवासासाठीची व्यवस्था करतात यालाच स्थानिक स्थलांतर असे म्हणतात.

### ५.३.११ नागरी ते नागरी स्थलांतर :

साधारणपणे नागरी ते नागरी स्थलांतर या प्रकारात नागरिक लहान शहराकडून मोठ्या शहराकडे स्थलांतर करतात. नोकरीतील बढती, नागरी सुविधांची उपलब्धता त्याचबरोबर शहरीभागात करिअरच्या मिळणाऱ्या चांगल्या संधी उत्पन्न वाढ जीवन अधिक समृद्ध करण्याच्या अपेक्षा यामुळे लोक छोट्या शहराकडून मोठ्या शहराकडे निवासासाठी आकर्षित होतात. शिवाय मोठ्या शहरांमध्ये जीवन जगण्यासाठीच्या सर्व सुविधा सहज उपलब्ध असतात.

### ५.३.१२ आदिवासी भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर :

आदिवासी बांधव दर्याखोऱ्यात वास्तव्य करतात. त्यांचे जीवन निसर्गावर अवलंबून असते. नागरी सुविधांचा अभाव असतो. निसर्गाच्या प्रकोपामुळे त्यांचे जीवन सातत्याने प्रभावित होत असते. आदिवासी नागरिकांना यामुळे खडतर जीवन जगावे लागते. या समाजात होणार्या शिक्षणाच्या प्रसारामुळे त्यांना आपले जीवन अधिक समृद्ध करावे अशा स्वरुपाच्या जाणिवांचा विकास होण्यास मदत होत असल्याने आपला दुर्गम विभाग सोडून ते शहराकडे आपले जीवनमान अधिक समृद्ध करण्यासाठी स्थलांतरित होतात. यामुळे त्यांच्या समाजाच्या विकासाबाबतीतही सकारात्मक परिणाम झालेला दिसतो.

अशाप्रकारे स्थलांतराचे प्रकार वरील प्रमाणे आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) स्थलांतर संकल्पना स्पष्ट करा आणि स्थलांतराचे प्रकार सविस्तर लिहा.

## ५.४ स्थलांतराची कारणे

स्थलांतराचे प्रकार पाहिल्यानंतर स्थलांतरास कोणकोणती कारणे कारणीभूत होतात याचे विशदीकरण पुढीलप्रमाणे आहे.

### ५.४.१ रोजगाराच्या संधी :

स्थलांतराचे हे महत्त्वाचे कारण आहे. नागरिकांना आपले जीवनमान अधिक सुखकर करण्यासाठी रोजगाराची आवश्यकता असते. हा रोजगार कायम स्वरुपी आणि पुरेसा असावा लागतो. ज्या ठिकाणी पुरेसा रोजगार असतो त्या परिसरात नागरिक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करत असतात. यात नोकरी आणि व्यवसाया निमित्त स्थलांतर होत असते.

भारत देशाचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास जास्तीतजास्त रोजगारासाठी होणारे स्थलांतर हे मुंबई शहरात आणि देशातील अन्य कलकत्ता, चेन्नई, हैद्राबाद अशा शहरांमध्ये होताना दिसते. येथे रोजगार उपलब्ध होईल अशी लोकांची खात्री असते.

जागतिकीकरणाबरोबर मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशात आल्या. त्या माध्यमातून बीपीओच्या द्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. उच्चशिक्षित नागरिकांना यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. शिक्षित लोक यामुळे शहराकडे रोजगारासाठी अधिक आकर्षित झाले.

### ५.४.२ उच्च शिक्षण आणि संशोधन :

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. विविध क्षेत्रात शैक्षणिक आणि संशोधनासाठीच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील बौद्धिक पात्रता असणारा युवा वर्ग उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या संधीचा लाभ घेण्यासाठी आपल्या परिसरातून ज्या परिसरात या संधी उपलब्ध आहेत त्या परिसरात स्थलांतर करतात. विशेषत: अलिकडे माहिती

तंत्रज्ञान क्षेत्र, आरोग्य, शेतबियाणी, अवकाश, सागर संशोधन अशी कितीतरी संशोधनाची क्षेत्रे युवा वर्गाला त्याच्या करिअर डेव्हलमेंटसाठी साद घालत आहेत, आणि युवा वर्ग सुद्धा याला सकारात्मक प्रतिसाद देत आहे.

### ५.४.३ पर्यावरणीय घटक :



**https://mr.quora.com**

देशात पर्यावरणीय घटक स्थलांतराला सातत्याने कारणीभूत ठरु लागले आहेत. आपल्याकडे कायम स्वरुपी पावसाची अनिश्चितता असते. त्यामुळे शेती उद्योगावर याचा विपरित परिणाम होतो. नागरिक सातत्याने त्रस्त असतात. जनावरांच्या जीवनावरही याचा वाईट परिणाम होत असतो. काहीवेळा पाऊस जास्त पडतो. त्यामुळे पिके कुजून आणि वाहून जातात. महापुरामुळे ग्रामीण भागातील जनजीवन प्रभावित होत असते. भूकंपामुळे जनजीवन विस्कळीत होते. त्याचवेळा आर्थिक अरिष्टही येते यामुळे नागरिकांना जेथे जीवन जगणे सुलभ असते त्या परिसरात स्थलांतरीत व्हावे असे वाटते.

### ५.४.४ दारिद्र्य :

ग्रामीण भागातील नागरिकांना सातत्याने दारिद्र्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. निसर्गाची साथ नेहमीच सकारात्मक मिळते असे नाही. सरकार दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयत्न करते. परंतु या उपक्रमांना पुरेसे यश मिळतेच असे नाही. शिवाय स्थानिक ठिकाणी पुरेसा रोजगार उपलब्ध नसतो. लोकसंख्या वाढीबरोबर रोजगार संधी जर वाढल्या नाही तर दारिद्र्य वाढत राहाते. शेवटी नागरिकांना खात्रीशीर रोजगार ज्या ठिकाणी उपलब्ध होणार असतो तेथे स्थलांतरित व्हावे अशी त्यांची भावना होते. त्यांच्यादृष्टीने जगणे ही महत्त्वाची असते. दारिद्र्य माणसाला जगण्यासाठीच रोजगाराची संधी ज्या ठिकाणी उपलब्ध आहे त्या ठिकाणी जाण्यास भाग पडते.

### ५.४.५ राजकीय घटक :

ज्या परिसरात राजकीय अस्थिरता असते. शासनाची गृहखात्याची यंत्रणा कोलमडलेली असते अशा परिसरातील नागरिक सुरक्षित जीवनासाठी इतरत्र स्थलांतर करतात. यात नागरिक देशांतर्गत आणि देशाबाहेरही स्थलांतर करतात. एखाद्या राष्ट्रात जर युद्ध सदृश परिस्थिती असेल अथवा युद्ध ओढवले असेल आणि युद्धाला आळा घालण्यास शासन अपयशी ठरत असेल तर नागरिकांना आपली सुरक्षा महत्त्वाची वाटते. एखाद्या देशात

अंतर्गत बंडाळी माजली असेल आणि राजकीय अस्थैर्य असेल अशावेळी जनता ज्या परिसरात शांतता आहे त्या परिसरात स्थलांतरित होतो.

१९७१ साली पूर्व पाकिस्तानात जी राजकीय बंडाळी झाली तेव्हा तेथील हजारो निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे भारतात दाखल झाले. एखाद्या देशात हुकूमशाही असेल तर त्या हुकूमशाहीच्या जुलमी राज्यव्यवस्थेला कंटाळून नागरिक इतरत्र स्थलांतर करतात. जातीय दंगली निर्माण झाल्या असतील तरीही नागरिक स्थलांतराचा मार्ग अवलंबतात कारण त्यांना आपल्या जीवनाची सुरक्षितता महत्त्वाची वाटते.

आपल्याकडे जमातवाद, प्रदेशवाद, भाषिक वाद, दहशतवाद अशा स्वरुपाचे वाद सातत्याने पाहायला मिळतात. या वादांशी सर्वसामान्य जनतेला काहीही देणे घेणे नसते. सर्व सामान्य जनतेला आपण आनंदी जीवन जगावेसे वाटते. म्हणून अशा स्वरुपाच्या परिस्थितीत सर्व सामान्य जनता सुरक्षितेचे ठिकाण जगण्यासाठी शोधत असते.

**५.४.६ आरोग्य विषयक कारणे :**

प्रत्येक व्यक्तीला आपले आरोग्य सुदृढ राहावे असे सातत्याने वाटत असते. शहरी भागात सातत्याने प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे याचा आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. ग्रामीण भागात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध नसेल तर नागरिकांना असंख्य संसर्गजन्य आजारांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत आरोग्य विषयक चांगल्या सुविधा ज्या परिसरात उपलब्ध असतात त्या परिसरात नागरिक स्थलांतर करतात.

अलिकडे शहरातील नागरिक शहरातील प्रदूषणामुळे ग्रामीण भागात निवासासाठी स्थलांतर करु लागले आहेत. ग्रामीण भागात झाडांचे प्रमाण मोठे असते. त्यामुळे हवा शुद्ध राहते. द. कोकण भागात नागरिकांनी जंगलांचे संरक्षण करुन वनांचे प्रमाण बऱ्यापैकी राखले आहे. या परिसरातील हवामानही शुद्ध आहे. येथे कारखान्यांचे प्रमाण अगदी नगण्य आहे. त्यामुळे हवा पालटण्यासाठी शहरातील नागरिक ग्रामीण भागात येतात. शुद्ध हवा मिळाल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम झालेला जाणवतो.

**५.४.७ सामाजिक घटक :**

स्थलांतरासाठी सामाजिक कारणे सुद्धा कारणीभूत होतात. मुले नोकरी व्यवसायानिमित्त, शिक्षणासाठी, लग्न झाल्यामुळे इतरत्र राहाण्यासाठी जातात. मुलांच्या सुखासाठी आईवडिलांनाही आपले राहाते ठिकाण अथवा गाव सोडून मुले ज्या ठिकाणी वास्तव्यास जातील त्या ठिकाणी जावे लागते.

लग्न झाल्यानंतर मुलगी ज्या ठिकाणी तिला सासर मिळेल तेथे स्थलांतरित होते. मुला-मुलींना शिक्षण आणि रोजगारासाठी देशांतर्गत किंवा परदेशातही स्थलांतर करावे लागते.

**५.४.८ विदेशी प्रवास :**

व्यक्तीची आर्थिक परिस्थिती सक्षम झाली की तिला परदेशात जावेसे वाटायला लागते. इतर देशातील राहाणीमान, तेथील विविध परंपरा, स्वभाव वैशिष्ट्ये, खाद्यसवयी समजून घ्याव्या

असे वाटायला लागते. काही मंडळी पर्यटन म्हणून जातात. काही अभ्यास करण्यासाठी जातात. शिवाय रोजगारासाठी सुद्धा नागरिक परदेशात स्थलांतरित होतात.

### ५.४.९ व्यापाराचा विस्तार :

व्यावसायिक मंडळी आपला व्यवसाय आपल्या देशात स्थिर झाल्यानंतर आजच्या ग्लोबलायझेशनचा फायदा उठवत आपल्या व्यापार अथवा व्यवसायाचा विस्तार परदेशात सुद्धा करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक सेवा उद्योगात सहभागी होतात. उदा. हॉटेल व्यवसाय, पर्यटन, वाहतूक, बँकिंग, विमा, बांधकाम क्षेत्र, विविध विषयासंबंधीचा सल्ला, सेवा विषयक मदत केंद्रे, वैद्यकीय व्यवसाय या निमित्ताने व्यावसायाच्या विस्ताराकरिता स्थलांतरित होत असतात.

### ५.४.१० धार्मिक कारणे :

काही देशांमध्ये अनेक धर्माचे नागरिक एकत्र राहातात. राजकीय कारणांमुळे त्यांच्यात अनेकवेळा मतभेद होत असतात. प्रसंगी राजकीय दंगली, त्यातून निर्माण होणारा हिंसाचार यामुळे नागरिकांचे जीवन असुरक्षित होते. अशावेळी अल्प संख्यांक नागरिकांना याचा जास्त त्रास सहन करावा लागतो. अल्पसंख्यांक नागरिक आपल्या सुरक्षेसाठी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करतात.

काही वेळा ग्रामीण भागात दलित सवर्ण वाद उद्भवतात. अशावेळी दलित समाजाला जीव धोक्यात आल्याचे सातत्याने जाणवत राहाते. हा समाज यामुळे गाव सोडून शहरांकडे स्थलांतर करतो.

### आपली प्रगती तपासा

१) स्थलांतर संकल्पना स्पष्ट करा व स्थलांतराची कारणे लिहा.

## ५.५ स्थलांतराचे परिणाम

स्थलांतराचे अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही स्वरुपाचे परिणाम होत असतात.

### अ) अनुकूल परिणाम :

### १) आर्थिक उत्पन्नात वाढ :

ज्या भागात रोजगाराची शाश्वती असते अशा भागात नागरिक स्थलांतर करत असतात. त्या परिसरात त्यांना रोजगार मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. आपल्या गावातील नातेवाईकांना त्यांच्याकडून पैसे पाठवले जातात. त्यांच्याही जीवनमानावर याचा सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसते.

### २) उद्योगधंद्याच्या वाढीस चालना :

उद्योगधंद्याच्या वाढीसाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. काही भागात कुशल मजूर असतात, पण उद्योगधंदे उपलब्ध नसतात. ज्या परिसरात उद्योगधंदे सुरु करण्यास

अनुकूल परिस्थिती असते त्या प्रदेशात उद्योग सुरु करताना इतर ठिकाणाहून कुशल मजुरांचा पुरवठा झाल्यास त्याचा फायदा सदर उद्योगाला होतो. त्यामुळे त्या परिसराची औद्योगिक दृष्टीने वाढ व्हायला चांगली मदत होऊ शकते.

**३) जन्मदरात घट होण्यास मदत** :

ज्यावेळी रोजगारासाठी स्थलांतर होते त्यावेळी त्यात तरुण पुरुषांचे प्रमाण जास्त असते. नोकरीसाठी तरुण पुरुष जेव्हा स्थलांतर करतात तेव्हा ते आपले कुटुंब गावी ठेवून जातात. याचा परिणाम जन्मदरावर जास्त प्रमाणात होतो. जन्मदर यामुळे घटण्यास मदत होते.

**४) नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरास चालना :**

काही भाग नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असतो. परंतु तेथे लोकसंख्या कमी असते. अशा प्रदेशात नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता पुरेशी असूनही नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करता येत नाही. या भागात बाहेरुन स्थलांतर होऊन कुशल मनुष्यबळ आल्यास त्यामुळे त्या परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करुन घेता येतो. याचा एकंदर परिणाम त्या परिसराचे उत्पन्न वाढते. नागरिकांचे राहाणीमान वाढण्यासाठी मदत होते. देशाच्या सुद्धा राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीला चालना मिळू शकते.

**५) तांत्रिक ज्ञानाचा विकास होण्यास मदत :**

ज्या ठिकाणी रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात. अशा प्रदेशात कुशल मनुष्यबळ स्थलांतर करत असते. यात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञाचाही समावेश असतो. कुशल कारागीर मंडळी या परिसरात जातात. त्याचबरोबर तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचाही विकास होतो. यामुळे तंत्रज्ञानाच्या प्रगतीला चांगली चालना मिळते. याचा एकंदर सकारात्मक परिणाम देशाच्या विकासावर होतो.

**६) विविध संस्कृतींचा मिलाफ :**

स्थलांतराचा हा एक चांगला सकारात्मक परिणाम आहे. यामुळे विविध संस्कृतीची मंडळी एकत्र येतात. एकमेकांच्या संस्कृतीची एकमेकांत देवाणघेवाण करतात. त्यामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध होण्यास चांगली मदत होते. नागरिकांचे आपापसातील मतभेद, एकमेकांच्या संस्कृतीविषयीचे न्यूनगंड कमी होतात. एकमेकांच्या संस्कृतीमधील चांगल्या गोष्टीची ओळख होते.

**७) परकीय चलन निधी :**

जेव्हा आपल्या देशातील नागरिक इतर देशात रोजगारासाठी स्थलांतर करतात, तेव्हा ते तेथून आपल्या घरच्या मंडळीना पैसे पाठवतात. त्यामुळे आपल्या देशात परकीय चलन येण्यास चांगली मदत होते. देशातील परकीय चलनाची गंगाजळी वाढते. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी हा महत्त्वाचा सकारात्मक घटक म्हणून नोंद करता येईल.

**ब) प्रतिकूल परिणाम :**

**१) बुद्धिमंतांचे देशाटन :**

देशात तांत्रिक, वैज्ञानिक आणि इतर स्वरुपाचे कौशल्य आलेल्या व्यक्तींच्या गुणवत्तेप्रमाणे त्यांना करिअरच्या संधी उपलब्ध होत नसतील तर बुद्धिमान लोक परदेशी स्थलांतर करतात. यामुळे आपल्या देशातील कुशल मनुष्यबळ परदेशात जाते याला Brain Drain असेही म्हणतात. ही मंडळी ज्या देशात जातात त्या देशाच्या फायदा होतो. त्यांच्या मायदेशाचे नुकसान होत असते.

**२) सामाजिक समस्या वाढण्यास चालना :**

स्थलांतरामुळे नागरिक इतरत्र जातात ते ज्या परिसरात जातात त्या परिसरात सामाजिक समस्या वाढायला चालना मिळते. त्या परिसराची लोकसंख्या वाढते. नागरी सुविधांवर याचा मोठा ताण पडतो. लोकसंख्या वाढल्यामुळे झोपडपट्यात वाढ होते. गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. विविध स्वरुपाच्या आजारांना आमंत्रण मिळते. अंमली पदार्थाची तस्करी व सेवन वाढते. अनैतिक धंदे वाढतात. यामुळे सामाजिक समस्या वाढतात. शहरातील झोपडपट्टीत बकालपणा वाढतो. मानवाला सुखी जीवन मिळण्याची शाश्वती राहात नाही. स्थलांतरामुळे त्याने सुखाने जगण्याची धरलेली मनिषा फोल ठरते. असे चित्र बर्याच ठिकाणी पाहायला मिळते.

**३) मानसशास्त्रीय समस्या निर्माण होतात :**

जेव्हा व्यक्ती स्थलांतर करत असते तेव्हा तिला आपले कुटुंब, आपला परिसर सोडून नवीन वातावरणात जावे लागते. नवीन वातावरणात बर्याचवेळा जीवन सुरक्षित वाटत नाही. एकटेपणा जाणवतो. कुटुंबाची आठवण येत राहाते. अशा स्वरुपाच्या मानसशास्त्रीय समस्यांना सामोरे जावे लागते.

**४) पायाभूत सुविधांवर ताण येतो :**

स्थलांतरामुळे लोकसंख्या वाढते. ज्या भागात स्थलांतर होते त्या भागातील पायाभूत सुविधांवर मोठा ताण पडतो. नागरिकांना नागरी सुविधांपासून वंचित राहाण्याची वेळ येते. काही शहरी भागात झोपडपट्टी वाढते. कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, मलनिस्सारणाचा प्रश्न अधिक तीव्र होतो. नागरिकांना पुरेसे शुद्ध पाणी मिळत नाही.

**५) स्थलांतरितांच्या विषयी स्थानिकांना शत्रुत्वाची भावना :**

विशेषत: शहरात बाहेरुन नागरिक रोजगारासाठी येत असतात. त्यांच्या येण्यामुळे स्थानिकांच्या रोजगारावर फारसा विरोधी परिणाम होतोच असे नाही. काहीवेळा बाहेरुन येणार्या मंडळीच्यामुळे बऱ्याचशा कामात चांगला फायदाच होतो. परंतु स्थानिकांना त्यांच्याविषयी राग निर्माण होतो. स्थानिकांना ही मंडळी आपला रोजगार हिरावून घेतात असे वाटते. यामुळे स्थानिक आणि स्थलांतरित असा वाद निर्माण होतो.

मुंबई शहरात स्थानिक आणि युपीमधून आलेले भैया लोक असा वाद सातत्याने होताना दिसतो. अशाप्रकारे या नागरिकांमध्ये भाषेवरुन, सांस्कृतिक कारणांवरुन आणि धार्मिक कारणांवरुन वाद निर्माण होताना दिसतात. एकाच देशातील असूनही नागरिकांच्यात शत्रुत्व निर्माण होते. स्थानिक नागरिक स्थलांतरितांना योग्य वागणूक देत नाहीत. सामाजिक तणाव वाढीस चालना मिळते. राजकीय मंडळी राजकारण करण्यास पुढे येतात.

**६) भाषावाद उफाळून येतो :**

उच्च शिक्षणाच्या संधी आणि त्यातून मिळणारा रोजगार यामुळे नागरिक त्यांना ज्या ठिकाणी त्याच्या योग्यतेचा रोजगार मिळणार असतो त्या ठिकाणी जात असतात. तेथे वेगवेगळ्या धर्माचे आणि भाषेचे नागरिक एकत्र येत असतात. यातून भाषावाद, प्रांतवादाला चालना मिळण्याची शक्यता निर्माण होते. भारत देशात दक्षिण भारतातील नागरिक आणि उत्तर भारतातील नागरिक यांच्यात सातत्याने हिंदी आणि इंग्रजी भाषेवरुन वाद होत असतोच. महाराष्ट्रात तर मराठी आणि उत्तरप्रदेशीय असा वाद सातत्याने रंगताना दिसून येतो.

**७) आरोग्य आणि नागरी सेवांवर ताण पडतो :**

लोकसंख्या वाढीमुळे आरोग्याच्या सोयी सर्व नागरिकांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देता येत नाहीत. नागरी सुविधांवरही प्रचंड ताण पडतो. यातून त्या त्या परिसरातील नागरिकांच्यामध्ये आरोग्य बिघडण्याची समस्या निर्माण होते. आरोग्य रक्षणाच्या सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांना या सर्वांचा रोष सहन करावा लागतो.

वरीलप्रमाणे स्थलांतराचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) स्थलांतराचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम लिहा.

## ५.६ स्थलांतर थांबविण्यासाठी उपाय

स्थलांतर व स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या समस्या कमी करण्यासाठी पुढील उपायांचा विचार करावा लागेल.

**१) स्थानिक ठिकाणी रोजगार संधी :**

बहुतेकरुन लोक केवळ रोजगाराच्या उद्देशाने स्थलांतर करतात. कारण रोजगाराच्या शाश्वतीवर त्यांच्या जीवनाची शाश्वती अवलंबून असते. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या पुरेशा संधी निर्माण केल्यास स्थलांतराला मोठ्या प्रमाणात आळा बसण्यास मदत होऊ शकेल.

उदा. दक्षिण कोकणातील तरुण मुले ७ वी अथवा दहावी झाल्यानंतर रोजगारासाठी मुंबई शहराकडे स्थलांतरित होत होती. परंतु गेल्या १०-१५ वर्षात येथे फळप्रक्रियेच्या व

पर्यटनाच्या व्यवसायाची चांगली वाढ झाल्यामुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणात थांबले आहे. पश्चिम महाराष्ट्रात गावागावातूनच दूध सोसायट्या, शेती संशोधन आणि विस्तार, गावागावाला छोटे छोटे तांत्रिक उद्योगधंदे निर्माण झाले. शिवाय महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मार्फत (MIDC) ग्रामीण भागात उद्योगाचे स्थलांतर करण्यास चालना दिल्याने शहराकडे होणारे स्थलांतर कमी कमी होऊ लागले आहे.

ग्रामीण भागात शाश्वत रोजगार संधी निर्माण होणे गरजेचे आहे.

### २) गुणवत्तेनुसार रोजगार उपलब्ध करुन देणे :

आपल्याकडे गुणवत्तेनुसार रोजगाराचा अभाव आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे प्रचलित शिक्षणातून व्यावसायिक गुणवत्ता वाढ म्हणावी तेवढी होत नाही. ती होणे गरजेचे आहे व त्यानुसार रोजगार देणे आवश्यक आहे.

नवीन पिढीच्या कलाचा विचार करुन त्यांची कौशल्य वृद्धी करण्यासाठी शासनाने, स्थानिक संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा. गुणवत्तेनुसार स्थानिक ठिकाणी रोजगार संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

### ३) ग्रामीण भागात पुरेशा नागरी सुविधांची उपलब्धता करणे आवश्यक :

समाजाची जशी आर्थिक प्रगती होत जाते, तसतसे या प्रगतीतील नागरी सुविधांची समाज अपेक्षा करतो. नागरी सुविधा ग्रामीण भागात प्रभावीपणे निर्माण करायला हव्यात. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था व्हायला हवी. सार्वजनिक स्वच्छता, पुरेसे रस्ते, बाजार, चित्रपट गृह, वाचनालये ग्रामीण भागात सुरु केल्यास त्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनता ग्रामीण भागातच थांबण्याचा विचार करेल स्थलांतर थांबण्यास मदत होऊ शकेल.

### ४) सामाजिक ऐक्य जपण्याचा प्रयत्न करायला हवा :

ग्रामीण भागातील विशेषत: शिक्षित नागरिकांचा वर्ग सामाजिक समतेची अपेक्षा करतो. उच्च नीच भेद त्यांना नको असतात. जाती व्यवस्थेची बंधने नको असतात. त्यांना हवी असते केवळ समता. ही समता ग्रामीण भागात निर्माण व्हायला हवी. माणसाच्या कुवतीनुसार त्यांना सन्मान मिळायला हवा. शहरात हा सन्मान सर्व व्यक्तींना समान मिळतो. येथे जात-धर्म अशा स्वरुपाची बंधने नसतात. त्यामुळे शिक्षितांना त्यांच्या दर्जानुसार सन्मान मिळतो, अथवा वागणूक मिळते. प्रत्येक व्यक्तीला आपला सन्मान जपायला संधी मिळेल असे ऐक्य ग्रामीण समाजात निर्माण करण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

### ५) नागरिकांचे कमीत कमी विस्थापन होईल असेच प्रकल्प राबवावेत :

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. या जागतिकीकरणाच्या युगात मोठे उद्योग निर्मितीवर जास्त भर दिला जात आहे. तसेच मोठी धरणे, मोठ मोठे गृहबांधणी प्रकल्प राबविली जात आहेत. रस्ते आणि रेल्वेचे प्रकल्पही राबविले जात आहेत. या प्रकल्पात जमिनीचे संपादन मोठ्या प्रमाणात होत आहे. 'सेझ'साठी जमिनीचे संपादन केले जात आहे. यामुळे नागरिकांचे विस्थापन वाढले आहे. शासनाने या बाबीच्या गांभीर्याने विचार करुन

कमीत कमी विस्थापन होईल याचा विचार करुन प्रकल्प राबवावीत. त्याचबरोबर ज्यांचे विस्थापन होईल त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केल्यास नागरिकांचे स्थलांतर थांबवता येईल. विस्थापन झाल्यानंतर नागरिकांचे योग्य पुनर्वसन न झाल्यामुळे नागरिकांनी ज्या ठिकाणी त्यांना जगण्यासाठी सुरक्षित जागा मिळाल्या त्या ठिकाणी निवास करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्या त्या भागात लोकसंख्या वाढली. नागरी सुविधांवर परिणाम झाला या बाबीचा गांभीर्याने विचार शासनाने करावा. कमीत कमी विस्थापन होईल हे पहावे

**६) नागरिकांना आरोग्य-रक्षणाच्या पुरेशा सोयी निर्माण कराव्यात :**

नागरिकांना आरोग्य रक्षणाच्या पुरेशा सोयी मिळाल्या तर ते आपला गाव सोडून इतरत्र जाणार नाहीत. परिसरात आरोग्य रक्षणाच्या सोयी नागरिकांना उपलब्ध व्हायला हव्यात. शासनाने याकरिता पुढाकार घ्यायला हवा. पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था ग्रामीण भागात व्हायला हवी.

**७) ग्रामीण भागात उद्योगांचे स्थलांतर करणे :**

नागरिक रोजगारासाठी शहराकडे किंवा ज्या भागात रोजगार मिळतो. त्या भागात स्थलांतर करतात. ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरु केल्यास हे स्थलांतर थांबवता येणे शक्य आहे. त्यासाठी संरचनात्मक सोयीसुविधांचा विकाससुद्धा व्हायला हवा. जेणेकरुन ग्रामीण भागात उद्योगधंदे येण्यास अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल.

## ५.७ सारांश

विविध कारणांत्सव नागरिक आपले राहाते घर, आपला प्रदेश सोडून, प्रसंगी आपला देशही सोडून इतर परक्या प्रदेशात वास्तव्यास जातात त्याला स्थलांतर असे म्हणतात. स्थलांतर म्हणजे एक जागेवरुन दुसऱ्या जागेत इतर कोणत्याही ठिकाणचे जाणे होय. संयुक्त राष्ट्र संघाने केलेली स्थलांतराची व्याख्या - एका भौगोलिक ठिकाणापासून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणापर्यंत केलेली हालचाल म्हणजे स्थलांतर किंवा मूळ ठिकाणापासून इतरत्र ठिकाणी हलविलेले मुक्काम याला स्थलांतर म्हणतात.

एका देशातून दुसऱ्या देशात होणारे स्थलांतर, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणारे स्थलांतर, नैसर्गिक आपत्तीत होणारे स्थलांतर, सक्तीचे स्थलांतर, मुक्त किंवा ऐच्छिक स्थलांतर, सामूहिक स्थलांतर, साखळी स्थलांतर, ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर, ग्रामीण ते शहरी स्थलांतर, स्थानिक स्थलांतर, नागरी ते नागरी स्थलांतर, आदिवासी भागातून ग्रामीण भागात होणारे स्थलांतर इत्यादी स्थलांतराचे प्रकार आहेत.

रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षण आणि संशोधन, पर्यावरणीय घटक, दारिद्र्य, आरोग्य विषयक कारणे, सामाजिक घटक, विदेशी प्रवास, व्यापाराचा विस्तार, धार्मिक कारणे इत्यादी स्थलांतराची कारणे आहेत.

स्थलांतराच्या परिणामांबाबत विचार करता स्थलांतराचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम होतात. आर्थिक उत्पन्नात वाढ, उद्योगधंद्याच्या वाढीस चालना, जन्मदरात घट होण्यास

मदत, नैसर्गिक साधन संपत्तीच्या योग्य वापरास चालना, तांत्रिक ज्ञानाचा विकास होण्यास मदत, विविध संस्कृतीचा मिलाफ, परकीय चलन निधी इत्यादी स्थलांतराचे अनुकूल परिणाम होतात.

बुद्धिमंतांचे देशाटन, सामाजिक समस्या वाढण्यास चालना, मानसशास्त्रीय समस्या, पायाभूत सुविधांवर ताण, स्थलांतरितांविषयी शत्रुत्वाची भावना भाषावाद उफाळून येतो, आरोग्य आणि नागरी सेवांवर ताण इत्यादी प्रतिकूल परिणाम होतात.

स्थलांतर कमी करता येणे शक्य आहे. याकरिता स्थानिक ठिकाणी रोजगार संधी निर्माण कराव्या लागतील, गुणवत्तेनुसार रोजगार उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागात पुरेशा नागरी सुविधांची उपलब्धता करणे, नागरिकांसाठी आरोग्य रक्षणाच्या पुरेशा सोयी निर्माण करणे आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या पुरेशा सोयी निर्माण करणे इत्यादी उपायांच्या माध्यमातून स्थलांतर थांबवणे शक्य होऊ शकेल.

## ५.८ स्वाध्याय

१) स्थलांतर संकल्पना स्पष्ट करा व स्थलांतराचे प्रकार सविस्तर लिहा.

२) स्थलांतराचे स्वरुप लिहा व स्थलांतराच्या परिणामांची चर्चा करा.

३) स्थलांतर म्हणजे काय? स्थलांतराची कारणे आणि परिणाम लिहा.

४) स्थलांतरातराची कारणे स्पष्ट करा व स्थलांतर कमी करण्यासाठी उपाय सुचवा.

५) स्थलांतराचे प्रकार, कारणे आणि परिणाम सविस्तर विशद करा.

## ५.९ संदर्भसूची

१) मराठी विश्वकोश, खंड - १३, साहित्य आणि संस्कृति मंडळ महाराष्ट्रा राज्य, मराठी विश्वकोश.

२) दैनिक लोकसत्ता, १२ डिसेंबर २०१५.

३) www.maharashtratimes.com

४) www.esakalglobal.com

❖ ❖ ❖ ❖

# ६

# ग्रामीण दारिद्रय-१

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टये

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय विवेचन

६.३ भारतातील दारिद्रयाची समस्या

६.४ दारिद्रयाचा अर्थ व संकल्पना

६.५ ग्रामीण दारिद्रयाची कारणे

६.६ ग्रामीण दारिद्रय समस्येचे परिणाम

६.७ ग्रामीण दारिद्रय निर्मुलनासाठी उपाय योजना

६.८ भारतातील योजना काळातील दारिद्रय निर्मूलनाचे कार्यक्रम

६.९ सारांश

६.१० स्वयंअध्ययन प्रश्न

६.११ सरावासाठी प्रश्न

६.१२ संदर्भ पुस्तके

## ६.० उद्दिष्टये

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) दारिद्रयाचा अर्थ आणि संकल्पना लक्षात येईल.

२) भारतातील दारिद्रयाचे प्रकार याचे आकलन होईल.

३) दारिद्रयाची कारणे, परिणाम व उपाय यांची माहिती होईल.

## ६.१ प्रास्ताविक

दारिद्रयाची समस्या भारतापुरती मर्यादित न राहता या समस्येचे वैश्विक रूप धारण केल्याचे दिसते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र संघाने २००० या वर्षी २१ व्या शतकातील विकासातील

ध्येय निश्चित करताना दारिद्रय आणि उपासमारीचे प्रमाण निम्यावर आणण्याचे निश्चित केले होते. सांप्रत काळात भारतीय ग्रामीण समाजात दारिद्रय आणि उपासमार हा ज्वलंत समस्येचे मुददा बनला आहे. ग्रामीण दारिद्रयाची संकल्पना ही केवळ आर्थिक नसून ती सामाजिक आहे. उदरनिर्वाहाची किमान साधने उपलब्ध नसणे किंवा तुटपूंजी असणे या बाबी आर्थिक दारिद्रयामध्ये मोडतात. कोणतीही आर्थिक प्रक्रिया कधीच सुटी व स्वायत्त नसते. व्यक्तीच्या अस्तित्वाला आर्थिककतेसोबत सामाजिक राजकीय असे अनेकविध पैलू चिकटलेले असतात. वेगळ्या शब्दात समाजाची सर्व अंगे आणि त्या अंगांमध्ये घडून येणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया व्यक्तीच्या अस्तित्वात सामाविष्ट झालेल्या असतात. या अर्थाने दारिद्रयाला सामाजिक पदर आहे. ग्रामीण भारतीय संदर्भात दारिद्रयाची मुळे जात, वर्ग, प्रदेश, लिंग, भाषा, शिक्षण, व आरोग्य इ सामाजिक घटकांमध्ये सापडतात. म्हणूनच दारिद्रयाची कारणे सामाजिक घटकांच्या परस्पर प्रक्रियेत शोधावी लागतात. आपण भारतातील दारिद्रय, त्याचा अर्थ आणि संकल्पना, दारिद्रयाची कारणे व उपाययोजनांचा यांचा अभ्यास या घटकात करणार आहोत. भारतीय ग्रामीणअर्थव्यवस्थेला वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, आर्थिक व सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल, वाढती गुन्हेगारी, यासारख्या महत्त्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या मागे महत्वाचे कारण दारिद्रय आहे. या समस्यांमुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. देशाचा विकास जर जलद गतीने व्हावयाचा असेल तर भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रयाची ज्वलंत समस्या सोडवावी लागेल. कारण गाव म्हणजे देशाचा नकाशा. गावावरून देशाची परिक्षा. गावची भंगता अवदशा. येईल देशा. हाच विचार समोर ठेवून यासाठी भारत सरकार व घटकराज्ये प्रयत्नशील आहेत. तरीही या समस्यांची तीव्रता कमी नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्वीकार केला आहे.

## ६.२ विषय विवेचन

सदर घटकामध्ये आपण भारतातील दारिद्रयाचा अर्थ, संकल्पना, कारणे, परिणाम व उपाय या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## ६.३ भारतातील दारिद्रयाची समस्या

ग्रामीण भारताच्या अनेक प्रमुख समस्यापैकी दारिद्रय ही एक ज्वलंत समस्या मानली जाते. भारतात सार्वत्रिक दारिद्रय आढळते. देशाच्या विकासामध्ये दारिद्रयामुळे अडथळा निर्माण होतो आहे. ग्रामीण भारतातील वाढती लोकसंख्या, बेकारीचे मोठे प्रमाण, आर्थिक विषमता, खाजगीकरण, शेतीप्रधान अर्थव्यवस्था अशा अनेक कारणामुळे ग्रामीण भारतात दारिद्रय व्यापक प्रमाणात आढळते. ग्रामीण भारतात दारिद्रय निवारण्यासाठी नियोजन काळात अनेक उपाययोजना आखण्यात आल्या. त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. परंतु भारतात आजही मोठया प्रमाणात दारिद्रय आढळून येते. भारतीय नियोजनाला मानवी चेहरा देण्याच्या दृष्टीने डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्रय निर्मुलनाच्या कार्यक्रमावर भर देवून सामाजिक सशक्तता वाढविण्यावर भर देण्याचे सुचविले आहे.

## ६.४ दारिद्रयाचा संकल्पना व अर्थ

**दारिद्रयाची संकल्पना :**

मानवी जीवनातील संक्रमण विकासाबरोबर उद्भवलेली दारिद्रय ही एक आर्थिक व सामाजिक संकल्पना आहे. दारिद्रयाचे मोजमाप करणे कठीण काम आहे. दारिद्रयाची संकल्पना देशानुसार व समाजानुसार वेगवेगळी आढळते. भारत व इतर देशातील दारिद्रयाचा संकल्पनेत मुलभूत स्वरूपाचा फरक आढळतो. दारिद्रयामध्ये निरपेक्ष दारिद्रय व सापेक्ष दारिद्रय या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत. दारिद्रय ही संकल्पना फार जुनी संकल्पना ही समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांचा उपभोग खर्च व उत्पन्न पातळी यांच्या तुलनेवर आधारलेली आहे. एकाच समाजातील श्रीमंती लोकांची उत्पन्न व उपभोग पातळी व गरीब लोकांची उत्पन्न व उपभोग पातळी यांची तुलना केली असता सापेक्ष दारिद्रय दिसून येते. अर्थशास्त्रामध्ये दारिद्रयाची संकल्पना संदिग्ध आहे. दरडोई उत्पन्न व उपभोग खर्च हे दारिद्रयाचे निर्देशांक असल्यामुळे वेगवेगळ्या देशामध्ये दारिद्रयाची पातळी वेगवेगळी असते म्हणून सापेक्ष दारिद्रय असे दारिद्रयाचे असे दारिद्रयाचे दोन प्रकार केले जातात.

**१) निरपेक्ष दारिद्रय : (Absulate Poverty)**

दारिद्रयाच्या निरपेक्ष संकल्पनेनुसार निर्वाहासाठी अत्यावश्यक असे एक निरपेक्ष मानक किंवा प्रमाण असते. म्हणजेच जीवन जगण्यासाठी अन्नधान्य, कपडालत्ता आणि निवारा यांची किमान वास्तव परिमाणे असतात. या परिमाणांचे चालू किंमतीनुसार पैशात रुपांतर केले जाते. आणि अशा रितीने दरडोई किमान उपभोगाचा पैशातील आकडा ठरविला जातो. किमान आवश्यक गरजा भागविण्यासाठी क्षमता नसणे म्हणजे निरपेक्ष दारिद्रय होय. या व्याख्येच्या आधारे ज्या लोकांच्या उत्पन्नाची किंवा खर्चाची पातळी पैसःत व्यक्त केलेल्या किमान आवश्यक उपभोगा पेक्षा कमी असते असे लोक दारिद्रयरेषेखाली आहेत असे मानले जाते.

**२) सापेक्ष दारिद्रय : (Relative Poverty)**

लोकांचे सरासरी राहणीमान निरनिराळ्या देशात निरनिराळे असते. उदा. अमेरिकेसारख्या उच्च श्रीमंत देशातील सरासरी राहणीमान भारतातील सरासरी राहणीमानाशी तुलना करता फार उच्च पातळीवर आहे. अमेरिकेत जे लोक सरासरी राहणीमानापेक्षा खालच्या पातळीवरील जीवन जगतात असे लोक तेथे गरीब मानले जातील. श्रीमंत देशातील गरीब लोक भारतातील किंवा गरीब देशातील परिस्थितीच्या दृष्टीने श्रीमंत असू शकतात. भारताचा विचार केला तर जे लोक शहरी भागात गरीब मानले जातात त्यापैकी काही लोक देशाच्या ग्रामीण व आदिवासी भागातील जे लोक गरीब लोकांशी तुलना करता श्रीमंत ठरू शकतात. तसेच ग्रामीण भागातील जे लोक गरीब समजले जातात त्यापैकी काही लोक भारतातील अन्य जाती-जमातीतील लोकांशी तुलना करता श्रीमंत मानता येतील. देशाच्या सरासरी राहणीमानाच्या तुलनेत दारिद्रयाची व्याख्या केली जाते. सरासरी राहणीमान पातळी देशपरत्वे बदलते म्हणून एखाद्या विशिष्ठ देशातील गरीब व्यक्ती इतर देशात श्रीमंती मानली जाते. तसेच भारतासारख्या देशातील श्रीमंतापैकी काही लोक श्रीमंती देशात गरीब

मानले जाऊ शकतात. सापेक्षा दारिद्र्य हे उत्पन्नातील विषमतेमुळे उद्भवते. सापेक्ष दारिद्र्य या संकल्पनेत किंवा उपभोगाच्या आधारावर दोन गटांमध्ये किंवा वर्गामध्ये तुलना करते. लोकांचे उत्पन्नानुसार गट करून त्या गटांमध्ये किंवा वर्गामध्ये तुलना करते. लोकांचे उत्पन्नानुसार गट करून त्या गटांमध्ये कमी उत्पन्न किंवा उपभोगाच्या आधारावर दोन गटांमध्ये किंवा वर्गामध्ये तुलना करते. लोकांचे उत्पन्नानुसार गट करून त्या गटांमध्ये कमी उत्पन्न किंवा उपभोगाच्या आधारावर दोन गटांमध्ये किंवा वर्गामध्ये तुलना करते. लोकांचे उत्पन्नानुसार गट करून त्या गटांमध्ये कमी उत्पन्न असणारा गट म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय. म्हणजेच समाजाच्या उपभोगतील किंवा उत्पन्नातील अंतर म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय. म्हणजेच समाजाच्या उपभोगातील किंवा उत्पन्नातील अंतर म्हणजे सापेक्ष दारिद्र्य असे म्हणता येईल.

**दारिद्र्याचा अर्थ :**

दारिद्र्याच्या समस्येचे स्वरूप समजून घेण्यासाठी सर्वप्रथम दारिद्र्य या संज्ञेचा निश्चित अर्थ ठरवावा लागतो. दरिद्री लोकांच्या जीवनस्थितीचे वर्णन करणे सोपे आहे परंतू दारिद्र्य या संज्ञेचा निश्चित अथवा काटेकोर स्वरूपाचा अर्थ सांगणे कठीण आहे. कारण एखाद्या जवळ 'काय आहे' आणि काय असावयास पाहिजे' यामध्ये फरक दर्शविणारी स्थिती म्हणजे दारिद्र्य होय. आपल्या जवळ काय असले पाहिजे हा प्रत्येकाच्या व्यक्तिगत मनोधारणेचा भाग आहे. यामुळे दारिद्र्यासंबंधी प्रत्येकाची भावना आणि अनुभव वेगळेपणा असणे स्वाभाविक ठरते. उदा. ग्रामीण भागात भूमिहीन शेतमजुराची दारिद्र्यासंबंधी भावना आणि अनुभव एकर दोनएकर शेती असणाऱ्या अल्पभूधारकांपेक्षा वेगळी असणार. या दारिद्र्याची सरळ व्याख्या करणे तसे फारसे सोपे नाही. कारण दारिद्र्य ठरविताना कोणते मोजमाप वापरावयाचे हा प्रश्न आहे. काही विचारवंतांनी दारिद्र्याची व्याख्या ही अर्थशास्त्रीय अर्थात निकष विचारात घेऊन केली आहे तर काही विचारवंतांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्याख्या केल्या आहेत.

आर्थिक दृष्टीकोनातून दारिद्र्याच्या व्याख्या : प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी कमीतकमी किती पैसा लागतो किंवा एका व्यक्तीला सर्व प्रकारच्या शारीरिक हालचाली करण्यसाठी किमान किती उष्मांकांची (Calories) गरज आहे हा निकष आर्थिक स्वरूपाचा आहे. या आर्थिक निकषाचा आधार घेऊन दारिद्र्याची व्याख्या केली जाते ती पुढीलप्रमाणे

**आर्थिक किंवा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून दारिद्र्याची व्याख्या :**

१) **श्री. ओझा :** "माणसाला दररोज आहारातून किमान २२५० उष्मांकाची गरज असते. व्यक्तीलात्यांच्या आहारातून २२५० उष्मांक (Calories) पेक्षा कमी उष्मांक मिळाल्यास त्याला दारिद्र्य किंवा गरीब समजावे."

२) **गिलिन आणि गिलिन :** "दारिद्र्य ही अशी अवस्था आहे की ज्यामध्ये व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नात असो या अयोग्य खर्चामुळे असो. ज्या समाजात ती व्यक्ती राहते तेथील राहणीमानचा दर्जा गाठू शकत नाही की जी त्याची शारिरिक व मानसिक कार्यक्षमता वाढविते."

३) **जागतिक बँक :** "दर माणसी दर दिवशी एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती होय."

४) **जागतिक विकास अहवाल :** "दारिद्र्य म्हणजे योग्य पद्धतीने अन्न व निवारा यांचा अभाव ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पद्धतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य, शिक्षण सुविधा व पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही. थोडक्यात सर्व प्रकारच्या सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचीत असणे म्हणजे दारिद्र्य होय.

५) **प्रा. अमर्त्य सेन :** "एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय."

६) **गोगार्ड :** "दारिद्र्य म्हणजे स्वतःवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे पालन करण्यासाठी तसेच निरोगी उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरुरीच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा होय."

७) भारतीय योजना आयोगाने ग्रामीण भागाकरिता प्रतिव्यक्ती दररोज २४०० कॅलरीज देणाऱ्या अन्नाची खरेदी करण्याची क्रयशक्तीचा अभाव म्हणजे दारिद्र्य अशी व्याख्या केली आहे.

सामाजिक किंवा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दारिद्र्याची व्याख्या : सामाजिक दृष्टिकोनातून दारिद्र्याची व्याख्या करतांना वंचितता, असमानता आणि तुलनात्मक्ता या तीन घटकांवर भर दिला जातो. निम्न आर्थिक परिस्थितीत राहणाऱ्या लोकांची समाजातील अन्य लोकांशी तुलना केली जाते. या दृष्टिने 'दारिद्र्य म्हणजे प्रत्येक समाजाला अनुरूप अशा किमान राहणीमानाच्या दर्जापेक्षा निम्न स्थितीत राहाणे होय" मिलर आणि रोवी यांच्या मते "सामाजिक दृष्टिकोनातून दारिद्र्य म्हणजे स्पष्ट स्वरुपात असणारी असमानता होय". दारिद्र्य लोकांची जीवन स्थिती व जीवंत राहण्याची संभाव्यता यावर उत्पन्नातील विषमतेमुळे प्रभाव पडतो हे सामाजिक दृष्टिकोनातून मांडलेल्या अर्थातून स्पष्ट होते. मायकेल हॅरिंग्टन यांनी दारिद्र्याची व्याख्या वंचिततेच्या संदर्भात केली आहे. त्यांच्या मते "दारिद्र्य म्हणजे अन्न, निवारा, आरोग्य, शिक्षण व मनोरंजन यांच्या एका किमान स्तरापासून वंचित असण्याची स्थिती होय".

समाजशास्त्रीय दृष्टिने दारिद्र्य हे एक दृष्टचक्र आहे. दारिद्र्यामुळे त्या व्यक्तीला गलिच्छ वस्तीतच राहावे लागते. अपुरे शिक्षण, विशेष कौशल्याचा अभाव म्हणून तो अकुशल कामगार त्याचा परिणाम म्हणून त्या व्यक्तीचे मासिक उत्पन्न कमी असते. परिणामी ती व्यक्ती आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही यामुळे दरिद्री व्यक्तीचा मुलगाही अकुशल कामगार होतो. त्याचेही उत्पन्न कमीच राहते. दारिद्र्याच्या स्थितीतून त्यांची सुटकाच होत नाही म्हणून दारिद्र्य हे दृष्टचक्र आहे असे अर्थतज्ञप्रो. रेग्नर नर्क्स यांनी म्हटले आहे. या चकातून स्वतःची सुटका करून घेणे एका व्यक्तीच्या दृष्टने फारच अवघड असते. समाजाने मदतीचा हात दिला आणि या चकातून बाहेर पडण्याचे प्रयत्न व्यक्तीनेही केले तरच दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते.

**दारिद्र्य रेषा संकल्पना :**

दारिद्र्याची संकल्पना नेमकी स्पष्ट होण्यसाठी कोणाला दरिद्री म्हणता येईल व कोणाला म्हणता येणार नाही हे समजण्यासाठी दारिद्र्यरेषेचा वापर केला जातो. "ज्या खर्चाच्या पातळीस पोषणासाठी असलेले किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक अखाद्य वस्तू व सेवा उपलब्ध होऊ शकतात. ती खर्चाची पातळी म्हणजे दारिद्र्य रेषा होय" सांप्रत काळात किमान आवश्यक गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शुद्ध पेयजल, स्वच्छतेच्या सुविधा, शिक्षण इ. बाबींचा समावेश केला जातो. म्हणून राहणीमानाच्या ज्या पातळीला केवळ अन्न वस्त्र व निवारा व इतर मूलभूत गरजा भागविता येतात. त्या पातळीला दारिद्र्य रेषा असे म्हणतात. भारतीय उष्ण हवामानात नागरी भागात प्रत्येक व्यक्तीला किमान २१०० उष्मांकाची तर ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला किमान २४०० उष्मांकाची गरज असते. यानुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्या मिळणाऱ्या उत्पन्नातून दररोज वरिल प्रमाणात उष्मांक मिळवून देईल ऐवढया उपभोग्य वस्तू खरेदी करणेही शक्य नसते त्यास दारिद्र्य मानले जाते व त्यालाच दारिद्र्य रेषेखालील जीवन असे मानले जाते. या रेषेच्या खालचे राहणीमान म्हणजे निकृष्ठ राहणीमान होय. तेव्हा निकृष्ठ राहणीमानामध्ये राहणाऱ्या लोकांना दारिद्र्य किंवा गरीब म्हणता येईल. निरक्षता, कमी उत्पन्न, बेकारी, उपासमार, कुपोषण, आजारपण, कमी आयुर्मान हे दारिद्र्याचे दर्शक आहेत. बकाल वस्त्यामध्ये राहणे, रोज योग्य पोटभर अन्न न मिळणे, पिण्याच्या पाण्याचा अभाव, अर्धनग्नता या अवस्थेत जगणे, वैद्यकीय सुविधा, शिक्षण व करमणूक यांचा अभाव असे दुःखी जीवनाचे चित्र म्हणजे दारिद्र्य होय. जागतिक दारिद्र्यरेषेनुसार दरडोई दर दिवशी १.२५ डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असणारी व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती म्हणून ओळखली जाते. त्यानुसार भारतातील ४०% लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. जागतिक बँकेच्या सन २०११ च्या अहवालात भारतातील ३२.७०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

जागतिक बहूआयामी दारिद्र्य स्थिती गरिबी मोजण्यासाठी केवळ उत्पन्न हा निकष महत्वाचा नसून पोषण बालमृत्यू, शालेय शिक्षण, शाळेची उपस्थिती, स्वयंपाक इंधन स्वच्छता, पिण्याचे पानी, वीज, गृहनिर्माण व घरगुती मालमत्ता अशा १० निकषांच्या आधारे गणना केली जाते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०२० च्या जागतिक बहूआयामी गरिबी निर्देशांकानुसार (MPI) १०७ विकसनशील देशांमधील सुमारे १.३ अब्ज लोक दारिद्र्यामध्ये असल्याचे दिसते.

भारतात दारिद्र्याची समस्या दिर्घकाळापासून अस्तित्वात आहे. दारिद्र्य हे आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतील मोठा अडसर आहे. प्रा. नर्क्स यांच्या मते दरिद्री आहे कारण तो दारिद्र्यात आहे. हे दारिद्र्याचे दृष्टचक्र फिरत राहते. भारताच्या कमी विकासाचे दारिद्र्य हे मुख्य कारणही आहे व परिणामही आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने राबविलेल्या दारिद्र्य निर्मुलन योजनाचा परिणाम म्हणून दारिद्र्याचे प्रमाण कमी होत असले तरी दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता कायम आहे. भारत सरकारच्या नियोजन आयोगाने प्रसिध्द केलेल्या अहवालांमध्ये भारतातील एकूण दारिद्र्याचे प्रमाण तसेच ग्रामीण व शहरी दारिद्र्याचे प्रमाण दिलेले आहे. पुढील तक्त्यावरून त्याचा आडवा घेता येईल.

**तक्ता क्र. ७.१**

**भारतातील शहरी व ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण**

| अ क्र. | वर्ष | ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषा दरडोई दरमहा (रुपये) | ग्रामीण भागातील दारिद्र्य रेष खालील लोकांचे प्रमाण (टक्के) | शहरी भागातील दारिद्र्य रेष दरडोई दरमहा (रुपये) | शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या प्रमाण | एकंदर भारतातील दारिद्र्य रेषेखालील प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९७३ | ४६.३३ | ५६.४० | ५६.७६ | ४९.०० | ५४.९० |
| २ | १९७७ | ५६.८४ | ५३.१० | ७०.३३ | ४५.२० | ५१.३० |
| ३ | १९८३ | ८९.५० | ४७.७० | ११५.६५ | ४०.८० | ४४.५० |
| ४ | १९८७ | ११५.२० | ३९.१० | १६२.१६ | ३८.२० | ३८.९० |
| ५ | १९९३ | २०५.८४ | ३७.३० | २८१.३५ | ३२.३० | ३६.०० |
| ६ | २००० | ३२७.५६ | २७.१० | ४५४.११ | २३.६० | २६.१० |
| ७ | २००४ | ३५६.३० | २८.३० | ५३८.६० | २५.७० | २७.५० |

**(स्त्रोत : उगले सुनिल, योजना, ऑगस्ट २०१२)**

वरील तक्त्यात ग्रामीण शहरी व एकूण दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण दर्शविले आहे. १९७३ - ७४ मध्ये भारतात एकूण दारिद्र्याचे प्रमाण ५४.९० टक्के आहे. ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण ५६.४० टक्के तर शहरी दारिद्र्याचे प्रमाण ४९ टक्के होते. तेच २००९ -१० मध्ये ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण ३३.८० टक्के, शहरी दारिद्र्याचे प्रमाण २०.९० टक्के तर एकूण दारिद्र्याचे प्रमाण २९.८० टक्के इतके कमी झाल्याचे दिसते. २००४-०५ ते २००९-१० या काळात भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण २८.३० टक्के वरून ३३.८० टक्क्यांपर्यंत वाढले. याच काळात शहरी दारिद्र्याचे प्रमाण २५.७० टक्यावरून २९.८० टक्क्यांपर्यंत वाढले. १९९३ - ९४ नंतर भारतातील शहरी दारिद्र्यात सतत घट झाली असल्याचे दिसून येते. कारण १९९१ नंतर जागतिकीकरणामुळे विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण वाढले. त्यापाठोपाठ परकीय कंपन्या वाढल्या. देशातील उद्योगाला पोषक वातावरण तयार झाले. त्यामुळे शहरी भागात रोजगाराच्या जास्त संधी निर्माण झाल्या. परिणामी शहरी दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली. याच काळात ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने विविध रोजगार योजना, आवास योजना, अंत्योदय योजना यांची अंमलबजावणी केली. परंतु या योजना ग्रामीण दारिद्र्य कमी करण्यात प्रभावी ठरल्या नाहीत असे दिसते.

**तक्ता क्र. ७.२**

**भारतातील राज्यनिहाय दारिद्र्य रेषेखालील लोकांचा मागील दरडोई उपभोग खर्च**

| अ. क्र. | राज्य | ग्रामीण | नागरी | शिरगणती गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | ८६० | १००९ | ०२ |
| २ | बिहार | ७७८ | ९२३ | ३३.७ |
| ३ | गुजरात | ९३२ | ११५२ | १६.६ |
| ४ | कर्नाटक | ९०२ | १०८९ | २०.९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | केरळ | १०१८ | ९८७ | ७.१ |
| ६ | मध्यप्रदेश | ७७१ | ८९७ | ३१.७ |
| ७ | महाराष्ट्र | ९६७ | ११२६ | १७.४ |
| ८ | पंजाब | १०५४ | ११५५ | ८.३ |
| ९ | राजस्थान | ९०५ | १००२ | १४.७ |
| १० | तामिळनाडू | ८८० | ९३७ | ११.३ |
| ११ | उत्तर प्रदेश | ७६८ | ९४१ | २९.४ |
| १२ | पश्चिम बंगाल | ७८३ | ९८१ | २०.० |
| १३ | अखिल - भारत | ८१६ | १००० | २१.९ |

**(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७ -१८, पृ. क्र. २१५)**

वरील तक्त्यावरून असे म्हणता येते की, भारतामध्ये सन २०११-१२ मध्ये ग्रामीण भागात ८१६ रुपये तर शहरी भागात १००० रुपये मासिक खर्च आपल्या किमान गरजा भागविण्यासाठी व्यक्तीला लागला आहे. या उत्पन्नपातळीच्या खालची सर्व जनता दारिद्रयरेषेखाली होती. भारतातील प्रत्येक राज्याचा विचार केला तर आंध्रप्रदेशात ग्रामीण भागात ८६० रुपये तर शहरी भागासाठी १००९ रुपये कमी उत्पन्न असणारे सर्व दारिद्रयरेषेखाली होते. म्हणजेच आंध्रप्रदेशात ९.२ टक्के महाराष्ट्रात १७.४ टक्के तर भारतात २१.९ टक्के लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली असल्याचे दिसून येते.

**भारतातील दारिद्रयाचे प्रमाण :**

**तक्ता क्रमांक - ७.३**

**भारतातील दारिद्रयाचे प्रमाण**

| **वर्ष** | **१९७३-७४** | **१९८३** | **१९९३-९४** | **१९९९-२०००** | **२००४-०५** | **२००९-१०** |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५६.४ | ४५.७ | ३७.३ | २७.१ | २८.३ | ३३.८ |
| नागरी | ५९.० | ४०.८ | ३२.४ | २३.६ | २५.७ | २०.९ |
| एकूण | ५४.९ | ४४.५ | ३६.० | २६.१ | २७.१ | २९.८ |

तक्ता क्र. ७.३ असे दिसून येते की भारतातील दारिद्रयात १९७३-७४ ते १९९९-२००० पर्यंत घट (५६% वरून २६.११%) होत गेल्याचे दिसते. मात्र २००४-०५ नंतर (२७.१% ते ३३.८%) पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. २०११ मध्ये योजना आयोगाने सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागासाठी ३२ रुपये व ग्रामीण भागासाठी २६ रुपये ही दरडोई दरदिवशी गरिबीची रेषा दिली आहे. २००९-१० मध्ये योजना आयोगाच्या मतानुसार ३५.५ कोटी लोक दारिद्रयरेषेखाली होते. वाढत्या गरिबीबाबत नेहमीच आंतरराष्ट्रीय स्तरावर विकसित राष्ट्रांकडून लक्ष्य होणाऱ्या भारतासाठी एक आनंदाची बातमी आहे. भारतातील दारिद्रयाचे प्रमाण २०११ ते २०१९ या आठ वर्षात १२.३ टक्क्यांनी कमी झाल्याचे वर्ल्ड बँकेच्या एका अहवालातून समोर आले आहे. २०११ मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण २२.५ टक्के होते ते २०१९ मध्ये १०.२ टक्के इतके खाली आले आहे.

या आठ वर्षात ग्रामीण आणि शहरी भागातील गरिबी कमी झाल्याचे वर्ल्ड बँकेने म्हटले आहे. करोना संकट काळात गरिबी आणि विषमतांमधील आर्थिक विषमतेची दरी वाढत असल्याचे दिसून आले आहे. केंद्र आणि राज्य पातळीवर दारिद्रय निर्मुलनासाठी प्रभावी अंमलबजावणी योजना राबवल्याने हा परिणाम दिसून आला आहे.

**भारतीय दारिद्रयाचे मोजमाप :**

भारतामध्ये सद्यस्थितीत निती आयोगाकडून दारिद्रयाचे मोजमाप केले जाते. जे नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस यांच्याकडून उपलब्ध झालेल्या सांख्यिकी आकडेवारीवर आधारित असते. भारतामध्ये दारिद्रयरेषेचे मोजमाप उत्पन्न पातळीवर आधारित नसून ते उपभोग खर्चावर आधारित आहे. दारिद्रयाचे प्रमाण मोजण्यासाठी एकूण लोकसंख्येच्या किती प्रमाणात गरीब लोक राहतात यावर आधारित असते. भारतातील दारिद्रय मोजण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या जसे लकडावाला समिती १९९३, तेंडुलकर समिती २००९, रंगराजन समिती २०१२ इत्यादी. २०१४ मध्ये रंगराजन समितीने दिलेल्या अहवालानुसार दारिद्रयाचे मोजमाप हे मासिक दरडोई खर्चावर केले गेले. जसे १४०७ रुपये शहरी भागात आणि ९७२ रुपये ग्रामीण भागात उत्पन्न असल्यास त्या व्यक्तीला गरीब समजण्यात येईल.

## ६.५ दारिद्रयाची कारणे

दारिद्रयाची करणे अनेक व नाना प्रकारची आहेत दारिद्रयाच्या कारणाचे विवेचन प्राचीन व आधुनिक दृष्टीकोनानुसार दारिद्रय हे व्यक्तीच्या नशिबाचा किंवा दैवाचा भाग आहे. ते व्यक्तीच्या गत कर्माचेच पापकृत्याचे फळ आहे तर दरिद्री व्यक्तीमध्ये काम करण्याच्या क्षमतेची उणीव असते. व्यक्तीने स्वतः कष्ट केल्याशिवाय ती धनवान होऊ शकत नाही. परंतू कष्ट किंवा काम करण्याबाबतच्या प्रेरणेचाच व्यक्तीमध्ये अभाव असतो यामुळे ती निर्धन असते. असे दुसरे मत मांडले जाते. सांप्रत काळात दारिद्रयाच्या कारणांचे विवेचन करणारी ही दोन्ही मते कालविसंगत ठरली आहेत. दारिद्रयाच्या कारणाचा शोध घेत असताना आधुनिक दृष्टिकोनातून विचार करावा लागतो.

**१) व्यक्ती :** दारिद्रयाची कारणमिमांसा व्यक्तीवादी सिद्धांतानुसार व्यक्तीचा संदर्भात केली जाते व्यक्तीचे यश किंवा अपयश हा व्यक्तीमधील गुण अवगुणांचा परिणाम आहे. उदा. आळशीपणा मंदबुद्धी यासारख्या अवगुणांमुळे व्यक्ती निर्धन असते.

**२) लोकसंख्या वाढ :** २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२५ कोटी आहे. ही लोकसंख्या जगाच्या एकूण लेकसंख्येच्या १७.५ टक्के आहे. लोकसंख्यावाढीचे व्याख्या सोप्या शब्दात सांगायची तर जेव्हा देशातील मृत्यू दारात कमी येते व जन्मदर वाढतो तेव्हा मोठया प्रमाणात लोकसंख्येत वृद्धी होते या स्थितीला 'लोकसंख्या विस्पोट' देखील म्हटले जाते. लोकसंख्या वाढीची अनेक कारणे असली तरी भारतातील खेडयात निरक्षताचे प्रमाण अधिक आहे. कुटुंबनियोजनाचे योग्य ज्ञान नसल्याने खेडयातील लोक २ पेक्षा जास्त अपत्य जन्माला घालतात. उत्पन्नाची साधने कमी व खाणारी तोंडे जास्त अशी परिस्थिती ग्रामीण भागात आहे. राष्ट्रीय उत्पन्नवाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल तर दारिद्रय वाढते. भारतातील लोकसंख्येच्या

वृद्धीदरात अलिकडील काळात काही प्रमाणात घट झाली असली तरी वृद्धी दर अजूनही जास्त आहे. सन १९७१ ते १९८१ या कालावधीत भारताची लोकसंख्या २.५ टक्के वार्षिक दराने वाढत गेली. लोकसंख्या वाढीमुळे सर्वच साधनसामुग्रीवर ताण पडतो. लोकसंख्या वाढीमुळे अन्न,सोयीसुविधा, रोजगार म्हणजेच काम मागणाऱ्यांची संख्या वाढते. लोकसंख्यावाढीमुळे दरडोई उपभोग खर्च कमी राहून दारिद्रय मोठया प्रमाणात वाढत जाते.

### ३) शेतीची कमी उत्पादकता :

ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतीत काम करणाऱ्या श्रमिकांची उत्पादकता कमी आहे. शेती व्यवसाय निसर्गाच्या पर्जन्यावर आधारित आहे. पर्जन्याची अनिश्चितता, शेतीचा लहान आकार, भांडवलाचा अभाव, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे भारतीय शेतीची दरहेक्टरी व दर श्रमिक उत्पादकता अल्प आहे. पावसाची अनिश्चितता व वारंवार पडणारे दुष्काळ बहुतांशी शेतीचे स्वरूप हंगामी व ती मान्सूनवर अवलंबुन असल्याने शेती तोटयात असल्याने शेती व्यवसायातील संबंधित शेतकरी व शेतमजूर कर्जबाजारी व दरिद्री आहेत.

### ४) वाढती बेकारी :

भारतात ग्रामीण भागात अर्धबेरोजगारी आणि छूपी बेरोजगारी मोठया प्रमाणात आढळून येते. औद्योगिकरणची प्रक्रिया शहरी भागातच केंद्रित झालेली आहे. ग्रामीण भागात मांड औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगतीची धीमी गती, यामुळे रोजगार मागणीच्या तुलनेत रोजगार संधी कमी असल्याने दारिद्रयाच्या समस्येतवाढ होत आहे.

### ५) मंद आर्थिक विकास :

रोजगाराची वाढ ही आर्थिक वृद्धीवर आधारित असते. गेल्या दोन दशकामध्ये देशाच्या विकासाचा वार्षिक दर ४९% पेक्षा अधिक राहिलेला असला तरी १९५१ ते १९९० पर्यंत हा दर केवळ सरासरी ३.५ % इतकाच होता. वाढती लोकसंख्या ही विकासातील अडसर वनल्याने देशात अजूनही आर्थिक विकासाचा वेग मंदच आहे. त्यामुळे दारिद्रय अधिक आहे.

### ६) शिक्षण व कौशल्याचा अभाव :

देशात आज शिक्षणावर वाढत असला तरी ग्रामीण निरक्षरता अधिक आहे. देशात भांडवलाचा अभाव, संयोजन कौशल्याचा अभाव, व्यवसाय शिक्षणाचा अभाव, प्रशिक्षण व कौशल्याचा अभाव यामुळे भारतात दारिद्रयाचे प्रमाण मोठे आढळते. निकृष्ट गुणवत्तेच्या लोकसंख्येतून फार मोठया प्रमाणात उत्कृष्ट तंत्राचा उद्योजक मिळत नाहीत. मुळातच गरिबीमुळे मोठया प्रमाणात शाळेला न जाण्याचे प्रमाण भारतात ग्रामीण भागात जास्त आहे. शिक्षणाचा व विकासाचा निकटचा संबंध आहे. याचे एक आदर्श उदाहरण म्हणजे केरळ राज्याचे आहे. तेथे स्त्रीशिक्षणाचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे भारतातील इतर राज्यांशी तुलना करता केरळमधील ग्रामीण भागातील स्त्रियांनी बचत गट निर्माण करून विविध त्या ग्रामीण उद्योगात सक्रिय आहेत.

**७) निकृष्ट प्रतिचे  राहणीमान :**

निकृष्ट प्रतीच्या राहणीमानाची पिढयानपिढया जडलेली सवय ही लेकांतील प्रगतीची प्रेरणा नाहीशी करतो. अशा लोकांमध्ये भूमीहीन शेतमजूर वेठबिगार यांचा समावेश होतो. वर्षाचे सर्व दिवस या लोकांनाकाम उपलब्ध होत नाही. किमान वेतनविषयक कायदाचे पालन होत नाही. मिळेल त्या रोजंदारीवर  उपजिविका करावी लागते.



**https://prahaar.in**

**८) आर्थिक विषमता व भ्रष्टाचार :**

भारतात मिश्र अर्थव्यवस्था आहे. सध्या त्यामुळे नागरिकांना संपत्ती धारण करणाऱ्या व वारसा हक्काने आपल्या मुलांना देण्याचा अधिकार आहे. त्यामुळे भारतातील लोक ज्यांना संधी मिळते ते प्रचंड उत्पन्न व संपत्ती मिळवितात. पिढयांपिढया  संपत्ती वारसाकडे हस्तांतरीत होत राहते. ग्रामीण भागातील जातीव्यवस्थेमुळे उच्चभू समाजाकडे संपत्तीचे केंद्रिकरण झालेले आहे. देशभरातील १० टक्के श्रीमंताकडे देशातील एकूण संपत्तीच्या ७७.४ टक्के संपत्ती आहे. तर उर्वरित बहुसंख्य लोकांना रोजीरोटीचा प्रश्न भेडसावत आहे. मालमत्तेच्या खाजगी हक्कामुळे मुठभर धनिक वर्गातील व्यक्तींना भांडवलाच्या विनियोगापासून मिळणारा नफा अशा वेगवेगळ्या मार्गांनी उत्पन्न मिळते. तसेच मालमत्तेवरील वंशपरंपरागत वारसाहक्कामुळे आर्थिक विषमतेत मोठया प्रमाणात भर पडते. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या धोरणाचा भारत सरकारने स्वीकार केल्याने आर्थिक विषमता वाढत आहे. भ्रष्टाचार दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढला आहे. यामुळे देशात एकूण लोकसंख्येपैकी १०% लोकांकडे ९०% संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. ९०% लोकांकडे फक्त १०% उत्पन्न यामुळे दारिद्रय टिकून आहे. जेवढी आर्थिकविषमता अधिक तितके सामाजिक कल्याण कमी म्हणजे विषमतेमुळे दारिद्रयाची तीव्रता वाढते.

**९) शिक्षण सुविधांचा अभाव :**

शिक्षणविषयक सोयी ग्रामीण भागातून फारशा उपलब्ध असत नाहीत. शाळा दुर अंतरावर असतात. त्यामुळे निरक्षर लेकांमध्ये एकूण शिक्षणाविषयीच उदासिनता दिसते. शिक्षणाची गरज महत्त्व अद्यापही पटलेले नाही. निरक्षरतेमुळे आर्थिकव्यवहार व इतर व्यवहारातील फसवणूक ग्रामीण जनतेला काळात नाही.

### १०) मूल्यांची घसरण :

भारतात पूर्वी मानवी मुल्यांधिष्ठित व्यवस्था होती. मुल्यव्यवस्थेमुळे दारिद्र्याची तीव्रता जाणवत नव्हती. परंतु विज्ञान व तंत्रविज्ञानातील प्रगती, औद्योगिकरण, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय रचना बदलती आहे. कल्याणकारी राज्यव्यवस्थेपासून सरकार दूर चालले आहे. खाजगीकरणाकडे सरकारचा अधिक कल असल्यानेच या रचनेतून मुल्यांची घसरण होत आहे. हेही दारिद्र्याचे एक कारण आहे.

### ११) सावकार व जमीनदारांचे वर्चस्व :

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर अद्यापही सावकार मोठे जमीनदार यांचे वर्चस्व आहे. अशा व्यक्ती सुधारित शेतीचे लाभ अल्पभुधारकांपर्यंत पोहचू देत नाहीत. तसेच गरीब लोक निरक्षर असल्याने जमिनविषयक कायद्यातील तरतुदीचे अर्थ त्यांना समजत नाही. सावकार त्यांच्याकडे गहाण ठेवलेल्या जमीनी काही वर्षांनी जप्त करतात किंवा अल्प किंमतील खरेदी करतात. त्यामुळे गरीब शेतकरी आर्थिक अडचणीत आयुष्य कंठीत असतात.

### १२) भाववाढ :

भाववाढ हेही दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. महागाई म्हणजे सामान्य किंमत पातळीतील वाढ होय. एका बाजूला वस्तू व सेवांची कमी उपलब्धता आणि दुसऱ्या बाजूला मर्यादित उत्पन्न यामुळे महागाई वाढते. जेव्हा वस्तूच्या किंमती वाढतात. तेव्हा लोकांची खरेदी शक्ती कमी होते आणि त्याचा परिणाम समाजातील कनिष्ठ, मध्यम व गरीब वर्गावर होतो. १९५५ पासून भारतात सातत्याने भाववाढ पडून येत आहे. त्यामुळे देशातील गरीब लोकांच्या संख्येत वाढ होत आहे.

### १३) पर्यायी रोजगार क्षेत्राचा अभाव :

ग्रामीण भागात पर्यायी रोजगार क्षेत्रे उपलब्ध नसून वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीक्षेत्रावरील ताण अधिकाधिक वाढत आहे. परिणामतः ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यात भर पडत आहे.

### १४) जमीन वाटपात विषमता :

भारतातील फार मोठया लोकसंख्येचे उपजीविकेचे साधन शेती हे आहे. ग्रामीण भागात शेतीवर अवलंबुन असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. मात्र भारतात एकूण ग्रामीण कुटुंबापैकी ५५% कुटुंबाकडे १ हेक्टरपेक्षा कमी व १८% कुटुंबाकडे १ ते २ हेक्टर आकाराच्या जमिनी होत्या. तर ग्रामीण भागातील ५०% लोकांकडे जमिनीची कसलीही मालकी नाही. थोडक्यात ग्रामीण भागात बहुसंख्य लोक अल्पभूधारक व भूमीहीन असल्याने त्यांना शेतीतून कमी उत्पन्न मिळत असल्याने दारिद्र्यात वाढ होत आहे.

### १५) दारिद्र्याचे दृष्टचक्र :

ग्रामीण भागात भांडवलाच्या अभावामुळे औद्योगिक विकासाला खिळ बसते. कृषीवर आधारित उद्योगाच्या विकासासाठी नैसर्गिक साधनसामुग्री ग्रामीण भागात मुबलक प्रमाणात

उपलब्ध असूनही तिचा पुरेपूर उपयोग करणे शक्य होत नाही. ग्रामीण भागातील बेकारीचे प्रमाण जास्त आहे. लोकांचे उत्पन्न कमी आहे. लोकांच्या बचत करण्याच्या सवयीतून भांडवलाची निर्मिती होत असते. लग्न, श्राद्ध, अंत्यविधी, आणि सण सामारंभावरील खर्चामुळे बचत व गुंतवणूक होत नाही. दरडोई उत्पन्न कमी म्हणून बचत कमी, बचत कमी म्हणून भांडवलाचा अभाव असे दृष्टचक्र सुरु राहते. परिणामी दारिद्रय वाढते आहे.

**१६) नैसर्गिक आपत्ती :**

भारतात दुष्काळ, महापूर अतिवृष्टी, भूकंप, प्रतिकूल हवामान, अनिश्चित मान्सून यामुळे लोकांच्या उत्पन्नात सातत्य राहत नाही. त्यामुळे दारिद्रय मात्र सातत्याने वाढत आहे. कोरोना ग्रामीण भागातील लोकांचा रोजगार बुडाला व ते दारिद्रयाच्या खाईत लोटले गेले.

**१७) समाजाची संरचना :**

उदारमतवादी आणि संघर्ष किंवा सुधारणावादी विचारांचे समर्थन करणाऱ्या सामाजिक विचारवंतांना अन्यायपूर्ण परिस्थिती हेच दारिद्रयाचे प्रमुख कारण होय असे वाटते. पारंपारिक मुल्ये, प्रमाणके व विचारानुसार वर्तन करण्यावर भर देणाऱ्या ग्रामीण भारतातील कुटुंब संस्था, धर्मसंस्था, जातीसंस्था आणि दिर्घकळापासून सुरु असलेली प्रचंड संख्येतील बेरोजगारीची स्थिती ही दोन दारिद्रय निर्माण करणारी आणि टिकवून ठेवण्याची कारणे आहेत. ग्रामीण भागात प्रचलित व्यवस्थेतून लाभ प्राप्त होत असल्यामुळे 'आहे तीच स्थिती' टिकवून ठेवण्यामध्ये तथाकथीत लोकांचा स्वार्थ दडलेला असतो. प्रचलित व्यवस्थेत स्वार्थ किंवा सुप्त हितसंबंध (Vested Interest) असणारे लोक सामाजिक व आर्थिक संरचनेत परिवर्तन घडून येऊ देत नाहीत. परिणामी ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण वाढत जाते.

**१८) आर्थिक विकासाच्या प्रति निरुत्साह :**

भारत हा खेडयांचा देश आहे. या खेड्यांमध्ये बहुतांशी जनताही निरक्षर अंधश्रद्धा बुवाबाजीवर विश्वास दैववादी धार्मिक प्रवृत्तीची आहे. त्यामुळे समाजात भौतिक संपत्ती सुखचैन या बाबीना गौण स्थान देतात. गरिब लोकांना आपणही काही नाविन्यपूर्ण उपक्रम करून पैसे कमवावे असे वाटत नाही. 'ठेविले अनंते तैसेची रहावे" अशा वृत्तीची मनसे ग्रामीण भागात जास्त आहेत. आपले नशीबच गरीब आहे अशी बहुतांशी लोकांची धारणा आहे. आपल्यासाठी शासन किंवा कोणीतरी काही करेल या आशेवर बहुतांशी लोक जगतात. अशा प्रवृत्तीमुळे बहुसंख्य लोका ग्रामीण भागात दारिद्र्यात जीवन जगत आहेत.

## ६.६ दारिद्रय समस्येचे परिणाम

भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रयाचे स्वरूप भयावह असून दारिद्रयरेषेखालील लोकांना अत्यंत कष्टप्रद, निकृष्ट, करुणास्पद जीवन जगावे लागते. त्याचबरोबर ग्रामीण दारिद्रय ही अनेक समस्यांना प्रेरक व पोषक ठरत आली आहे. गरीब भुकेल्या माणसाकडे चार पैसे आले तर सर्वप्रथम तो आपली भूक भागवेल हे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांचे विधान याच स्थितीवर प्रकाश टाकणारे आहे. निकृष्ट गुणवत्तेची

लोकसंख्या, दारिद्रयाचे दृष्टचक्र, बालमजुरी, वेश्याव्यवसाय निरक्षरता, बालगुन्हेगारी, भिक्षावृत्ती, मद्यपान व व्यसनाधीनता इत्यादी समस्यांचा दारिद्रयाशी निकटचा संबंध आहे.

**१) अपराधीपणा :** ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील व्यक्तीला समाजात स्थान नसते परिणामी त्यांच्या मनात न्यूनगंडाची व अपराधीपणाची भावना वाढीस लागते.

**२) बालगुन्हेगारी :** दारिद्रयाच्या स्थितीमुळे मुलांच्या गरजा पूर्ण करण्यास आई वडील असमर्थ असतात. अशी मुले घराबाहेरच आपल्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करतात. यातून ग्रामीण लहान मुलांमध्ये बालगुन्हेगारी वाढते.

**३) अन्नाचा पुरवठा :** आपला भारत देश खेडेप्रधान आहे. या खेडयात दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. या दारिद्रयरेषेखालील कुटूंबाचे कुपोषण होऊ नये म्हणून सदर कुटूंबाला स्वस्थ दराने अन्नधान्याचा पुरवठा शासनाला शिधावाटप केंद्रातून करावा लागतो त्यांचा ताण सरकारी तिजोरीवर पडतो.

**४) दुःखी आरोग्य स्थिती :** गरिबीमध्ये जगण्याचा परिणाम लोकांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर झाल्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्त्व खुंटते. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखाली कुटूंबातील मुलांचा स्वभाव एकलकोंडा होणं मनाने खोटे मित्र खोटे प्रसंग रचणं आणि त्यात रमताना आभासी व खऱ्या जगात गल्लत होणं याचे प्रमाण वाढत आहे.

**५) ग्रामीण कर्जबाजारीपणात वाढ :** ग्रामीण भागात दारिद्रयाचा परिणाम म्हणून अनेक कुटूंब कर्जबाजारीपणा बनतात. सावकाराकडून आपल्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी कार्जा ची उचल करावी लागते.

**६) स्थलांतर :** ग्रामीण भागात कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने गरीबीचे प्रमाण वाढते. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे पोटाची खळगी भरण्यासाठी होणारे स्थलांतर वाढत आहे.

## ६.७ ग्रामीण दारिद्रय निर्मुलनासाठी उपाय योजना

भारतात ग्रामीण भागातील दारिद्राचा प्रश्न हा अकाळविकाळ भेसूर स्वरूपाचा बहूरंगी असा आहे. भारतातील ग्रामीण दारिद्रय कमी करण्यासाठी पुढील काही उपाय योजता येतील.

**१) ग्रामीण औद्योगिकरण :**

भारतात खेडयांची संख्या जास्त आहे. हया खेडयातील जनता संपुर्णपणे शेतीव्यवसायावर अवलंबून आहे. हेच गरिबीचे मुख्य कारण आहे. शासनाने ग्रामीण भागातील लोकांना लहान उद्योगधंदे व कुटिरउद्योग उभारणीकरिता प्रशिक्षणाची सोय केली पाहिजे तसेच ग्रामीण लोकांना बी बियाणे, भांडवल, कच्चामाल, व कारखाना उभारणीसाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून दिली पाहिजे. जेणेकरून ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरु झाल्यास लोकांना रोजगार मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांची गरिबी कमी होण्यास मदत होईल.

**२) लोकसंख्या नियंत्रण :**

वेगाने वाढणारी लोकसंख्या दारिद्रय वाढविण्यास कारणीभूत ठरलेली आहे. त्यामुळे दारिद्रय निर्मुलनासाठीच्या कार्यक्रमात लोकसंख्या नियंत्रणावर भर देण्यात आला आहे. यामुळे लोकसंख्या वाढीचा दर काही प्रमाणात कमी होईल.

**३) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे :**

दारिद्रय निर्मूलनाचा सर्वात योग्य उपाय म्हणजे आर्थिक विकासाचा वेग वाढविणे होय. हा वेग गरीब वाढल्यामुळे गरीब वर्गातील लोकांना अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या वस्तू उपलब्ध होतात. आर्थिक विकासाचा वेग वाढविल्यास दारिद्रय निर्मुलनास मदत होते.

**४) गरीब शेतकऱ्यांना साहाय्य :**

सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतकरी, कोरडवाहू शेतकरी अशा आर्थिकदृष्टया गरीब शेतकऱ्यांना सरकारने खते,बी-बियाणे, वीज कमी दराने पुरवितात. तसेच कर्जाचा पुरवठा पुरेसा व बिनव्याजी करावा. अशा शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी बिनव्याजी किंवा कमी दराने कर्जपुरवठा करावा अशा व्यवसायाचे मार्गदर्शन करण्यात यावे.

**५) कुटुंबातील एका व्यक्तीस रोजगार :**

प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीस रोजगार देण्यात यावा. अशा योजना राबविल्या तर संपत्तीचे केंद्रीकरण कमी होईल व आणखी एका जादाच्या कुटुंबातील व्यक्तीला रोजगार / नोकरी मिळाल्यास त्यांचे दारिद्रय दूर होण्यास मदत होईल.

**६) शिक्षणाचा प्रसार :**

शिक्षणाचा प्रसार दारिद्रय निर्मूलनावरील उपाय आहे. देशात नियोजन काळात कमी शिक्षणप्रसारावर मोठया प्रमाणात भर देण्यात आला. शिक्षण प्रसारामुळे लोकसंख्या वाढ कमी होण्यास मदत होईल. त्याबरोबर रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतील.

**७) आर्थिक विषमता कमी करण्यावर भर :**

भारतात उत्पन्न व संपत्तीमधील विषमता कमी करण्यासाठी सरकारने श्रीमंतावर उत्पन्न कर, व्यवसाय कर असे विविध कर बसवून मिळालेल्या पैशातून गरीबासाठीच्या दारिद्रय निर्मूलनाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. मोठया शेतकऱ्यांकडील जादाची जमीन काढून घेऊन भूमिहीनांना त्याचे वाटप करण्यात येत आहे. अशा रितीने दारिद्रय कमी करण्यासाठी उत्पन्न व संपत्ती वाटपातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**८) भू सुधारणा कायदे :**

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी परिणामकारक जमीन सुधारणविषयक कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यामुळे सीमांत व अल्पभूधारकांना परिणामी गरिबीचे निर्मुलन होईल.

**९) संतूलित प्रादेशिक विकास :**

शासनाने आपली भूमिका बदलून मागास प्रदेश व ग्रामीण भागात जास्त संशोधन उपलब्ध करून द्यावीत जेणे करून प्रादेशिक असमतोल आणि गरिबी दूर होईल.

**१०) सामाजिक सुरक्षा उपाययोजना :**

सामाजिक सुरक्षा म्हणून भविष्य निर्वाह निधी, विमा योजना, निवृत्ती वेतन, मोफत औषध व आरोग्य व्यवस्था इत्यादी ग्रामीण भागात उपलब्ध करून दिली पाहिजे त्यामुळे ग्रामीण भागात उपलब्ध करून दिली पाहिजे त्यामुळे ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा जीवनमानाचा स्तर वाढेल.

## ६.८ भारतातील योजना काळातील दारिद्रय निर्मूलनाचे कार्यक्रम

**१. सीमांत शेतकरी व शेतमजूर यांच्या विकासासाठी संस्था :**

ग्रामीण भागातील सर्वात दुर्बल घटक म्हणजे सीमांत शेतकरी, ज्याची जमीन १ ते ३ एकर एवढीच आहे आणि जे भूमीहीन शेतमजूर आहेत त्यांच्या दारिद्र्याच्या निर्मुलनासाठी अखिल भारतीय परीक्षण समितीने केलेल्या शिफारशीनुसार १९७१ पासून लहान शेतकरी विकास एजन्सी सुरु करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत लहान शेतकऱ्यांना आवश्यक सेवा पुरविणे, जलसिंचनाची व्यवस्था करणे, सहाय्यकारी बँकेकडून कर्ज मिळविण्यास मदत करणे व विक्री व्यवस्थेबाबत मदत करणे इ. बाबींचा समावेश होतो. या योजनेने १९८० सालापर्यंत १ कोटी ६९ लाख सीमांत शेतकऱ्यांना दारिद्रय दूर करण्यास मदत केली. पुढे हीच योजना १९८० मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) मध्ये समाविष्ट करण्यात आली.

**२. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :**

या योजनेची सुरुवात भारतात सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात झाली. महाराष्ट्रातील सर्व पंचायत समित्यांच्या पातळीवर २ ऑक्टोबर १९८२ साली झाली. एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या माध्यमातून भारत सरकारने देशातील ग्रामीण भागात राहणारी गरीब कुटूंबे, सीमांत शेतकरी, शेत मजूर, आणि ग्रामीण कारागीर यांना स्वतः चा व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्य केले होते. यात समाजाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन करणे पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, उपलब्ध साधनांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करणे, गरीब कुटुंबाना स्वयं रोजगार देणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. १९९९ साली या कार्यक्रमाचे नामकरण सुवर्णजयंती ग्रामीण विकास कार्यक्रम असे करण्यात आले.

**३. किमान गरजा कार्यक्रम :**

गरिबी हटाव आणि सामाजिक न्यायासह विकास साध्य करण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षात १९७४ - ७८ साली किमान गरजा कार्यक्रम सुरु करण्यात आला. या कार्यक्रमात दारिद्रय रेषेखालील लोकांच्या उपभोग पातळी सुधारणा करणे ग्रामीण व शहरी, भागातील कामगारांची उत्पादकता, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, रस्ते बांधणी तसेच भूमिहीन श्रमिकांना घरे देणे इ. या कार्यक्रमाचे मुलभूत घटक होते.

**४. २० कलमी कार्यक्रम :**

माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी हा कार्यक्रम जानेवारी १९८२ मध्ये सुरु केला. त्यानंतर तो पुन्हा २० ऑक्टोंबर १९८६ ला नव्याने आणला. गेला. २० कलमी कार्यक्रमांतर्गत गरीब लोकांच्या विविध मुलभूत गरजा पुर्ण करण्यासाठी व त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या.

**५. ग्रामीण भूमिहीन मजूर रोजगार हमी कार्यक्रम :**

या योजनेची सुरुवात १५ ऑगस्ट १९८३ मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुराला १०० दिवस रोजगार देण्याची हमी या योजनेत आहे. या योजनेत कुटुंबातील किमान एक व्यक्तीला अशी हमी देते. केंद्रपुरस्कृत ही योजना राज्यशासनमार्फत अंमलात आणली जाते.

**६) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना :**

ग्रामीणपातळीवर मानवी विकास साध्य करण्यासाठी २०००-२००५ मध्ये सुरु केलेल्या प्रधानमंत्री ग्रामोदय योजनेअंतर्गत खेडयातील गरिबांना पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य योजना, राहण्यासाठी घरे आणि शिक्षण दिले जाते.

**७) इंदिरा महिला योजना :**

गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी इंदिरा महिला योजना सुरु करण्यात आली होती.

**८) इंदिरा आवास योजना :**

(१८८५-८६) या योजनेतून गरीबांना घरे बांधणीसाठी आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा ६०% फायदा हा अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी आहे. तसेच डोंगरी व आदिवासी भागातील गरीबांना घर बांधणीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

**९. राष्ट्रीय रोजगार हमी योजना :**

(२ फेब्रुवारी २००६) सर्वप्रथम देशातील २०० जिल्ह्यात लागू केली. या योजनेतून कुटुंबातील एका व्यक्तीला १०० दिवस रोजगार दिला जातो. या योजनेची सुरुवात प्रथम आंध्रप्रदेश या राज्यात झाली. या योजनेतून वृक्ष लागवड, जलसंवर्धन, जलव्यवस्थापन, ग्रामीण विकास, रस्ते बांधणी इत्यादी कामे केली जातात.

**१०. भारत निर्माण योजना :**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी भारत सरकारने भारत निर्माण योजना सुरु केली. या योजनेची घोषणा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००५ मध्ये केली. पाटबंधारे, रस्ते, घरे, पाणी, वीज व दूरध्वनी अशा ग्रामीण भागातील क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याची हमी या योजनेत देण्यात आली आहे.

**११. अंत्योदय अन्न योजना (डिसेंबर २०००) :**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी गरीबात गरीब अशा १ कोटी कुटुंबाचा या योजनेत समावेश केला आहे. योजनेखालील प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रुपये कीलो आणि तांदूळ ३ रु. कीलो अशा दराने २५ किलो अन्नधान्य पुरविले जाते.

**१२. प्रधानमंत्री ग्राम सड़क योजना (डिसेंबर २०००) :**

दहाव्या योजनेच्या समाप्तीपर्यंत जेथे रस्ते नाहीत अशा ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील रस्त्याने जोडल्या न गेलेल्या १.८ लाख वस्तीस्थानांना रस्त्याची सुविधा पुरविण्याची ही योजना ही योजना देशभर राबविली जाते.

**१३. कामाच्या मोबदल्यात धान्य कार्यक्रम (फेब्रु २००१) :**

हा कार्यक्रम दुष्काळग्रस्त ग्रामीण भागात राबविला जातो. हा कार्यक्रम ८ राज्यात लागू करण्यात आला आहे.

**१४. ग्रामीण जीवन्नोती अभियान :**

केंद्र शासनाने १९९९ पासून दारिद्र निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली. या योजनेचे केंद्र शासनाने विविध संस्थाकडून मुल्यमापन केले असता सदर योजना सुरु केली. या योजना दारिद्रय निर्मुलनासाठी काहीअंशी यशस्वी ठरली असली तरी बऱ्याच उणिवा केंद्र शासनाच्या निदर्शनास आल्या. म्हणून केंद्र शासनाने गरिबाचे निर्मुलन करण्यासाठी नवीन धोरण निश्चिति करण्यासाठी प्रा. आर राधाकृष्ण समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन १८ जुलै २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान (NRLM) सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अभियानात गरिबांच्या स्वयंसहाय्यता गटांचे संघटन करून त्याद्वारे स्वयंरोजगार मिळविणे हा मुलभूत हा घटक मानण्यात आला आहे. राज्यातील सर्व गरीब कुटुंबापर्यंत पोहचून त्यांना कायमस्वरूपी उपजिविकेच्या संधी उपलब्ध करणे व दारिद्रय रेषेच्या वर येईपर्यंत त्यांना मदतीचा हात देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हा या अभियानाचा उद्देश्य आहे. योजनेत केंद्र सरकारचा हिस्सा ७५ टक्के तर राज्य सरकारचा हिस्सा २५ टक्के आहे. ग्रामीण भागातील गरिबातील गरीब अशा स्वरोजगाराची निवड करून विधवा व परितक्त्या महिला, अपंग, अनुसूचित जाती जमाती, आणि अल्पसंख्याक वयोवृद्ध यांना लोकसहभागातून गरीबी निवारण करण्याचा निर्धार शासनाने केला आहे.

**१५. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

सप्टेंबर २०११ मध्ये जवाहर ग्राम समृद्धी योजना आली आहे. अशा प्रकारे भारतात दारिद्रय निर्मूलनासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम राबविले परंतु रोजगार निर्मितीच्या तुलनेत रोजगार मागणाऱ्यांची संख्या व लोकसंख्या जलद गतीने वाढल्याने दारिद्रयाचे प्रमाण वाढतच आहे.

## ६.९ सारांश

भारतातील दारिद्र्याला ऐतिहासिक परंपरा आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळातील भारतावरील परकीय आक्रमणे त्यानंतर अर्वाचीन भारताची ब्रिटिशांनी केलेली आर्थिक लूट आणि स्वातंत्रोनंतर टिकून असलेली सामाजिक, आर्थिक विषमता यामुळे भारत अजूनही ग्रामीण दारिद्र्य ही ज्वलंत समस्या दिसून येते. एखाद्या व्यक्तीला गरीब म्हणून तेव्हाचा संबोधले जाते जेव्हा त्या व्यक्तीचा उपभोग किंवा उत्पन्नाची पातळी घसरते. जगामधील गरीब देशांच्या क्रमवारीमध्ये भारत हा एक देश आहे. दारिद्र्याचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे सापेक्ष दारिद्र्य आणि दुसरे निरपेक्ष दारिद्र्य. २०२१ च्या सुरुवातीला साधारणपणे ८६.८ दशलक्ष लोक दारिद्र्यरेषेखाली होते. दारिद्र्याच्या अभ्यासाची सुरुवात आधुनिक भारतामध्ये दादाभाई नवरोजी यांच्यापासून सुरु होते. भारताच्या दिवंगत पंतप्रधान माननीय इंदिरा गांधी यांनी १९७१ मध्ये 'दारिद्र्य निर्मुलन' हा नारा दिला. भारतातील खेडयात रोजगाराचा अभाव परिणामी पैशाच्या अभावी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक या सगळ्याबाबत दारिद्र्य असते. भारतातील दारिद्र्याच्या प्रमाणाविचार करता बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, ओरिसा, आणि आसाम या राज्यामध्ये इतर राज्याच्या  तुलनेत दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. दारिद्र्य या समस्येमुळे अल्प राष्ट्रीय उत्पन्न, अल्प दरडोई उत्पन्न, कमी प्रतीचे जीवनमान निर्माण होते. त्यातूनच मोठया प्रमाणावरील बेकारी, अर्धबेकारी व स्थलांतराच्या समस्या निर्माण होतात. गरिबी ही अल्पबचत व अल्प गुंतवणूक व अल्प उत्पादनालासुद्धा जबाबदार आहे. दुसऱ्या शब्दात दारिद्र्य हे आर्थिक विकासाला व विघातक आर्थिक परिस्थितीला जबाबदार आहे. गरिबीमुळे  समाजाची श्रीमंत आणि गरीब भागात विभागणी होऊन वर्गसंघर्ष निर्माण होतो. दारिद्र्यामुळे कुपोषण व दैनावस्था ही परिस्थिती निर्माण होते. त्यामुळेच चोरया, बालगुन्हेगारी इत्यादी सामाजिक समस्या निर्माण होतात. नियोजन काळात शासनाने राबविलेल्या दारिद्र्य निर्मुलनासाठी अनेक योजना व कार्यक्रम शासनाने राबविले उदा. लहान शेतकरी विकास एजन्सी, एकात्मिक ग्रामीण विकास योजना (२ ऑक्टोबर १९८०), जवाहर रोजगार योजना (१९८९). किमान गरजा कार्यक्रम, वीस कलमी कार्यक्रम (१९७५-१९८२), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (१९९७), ग्रामीण जीवन्नोती  अभियान (१९९९), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२०११), या सर्व योजनांचा परिणाम म्हणून भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होत आहे तथापि, उत्पादन साधनांचा मालकीची विषमता, हस्तउद्योग व ग्रामोद्योगांचे देवसेंदिवस घटणारे प्रमाण, लोकसंख्या वाढ, रूढी परंपरा, सामाजिक व आर्थिक विषमता, भाववाढ, दारिद्र्य निर्मुलनाच्यायोजनांचा गैरवापर, अनियमित रोजगार, आणि मानवी मूल्यांचीघसरण, नैसर्गिक संकटे इत्यादीमुळे भारतात ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनाचा वेग अत्यंत कमी आहे. ग्रामीण भागातील लोकांना एखाद्या रक्तपीती  व्याधी प्रमाणे चिकटून राहिलेल्या या दारिद्र्याच्या स्थितीतून त्यांची सुटकाच होत नाही म्हणून दारिद्र्य हे दृष्टचक्र आहे असे अर्थतज्ञ प्रो. रेग्नर नर्क्स यांनी म्हटले आहे. या चक्रातून स्वतः ची सुटका करून घेणे एका व्यक्तीच्या दृष्टीने फारच अवघड असते. जे खूद्द दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. केवळ प्रारब्धवादी बनून हताशपणे दारिद्र्यात खितपत पडल्याने दारिद्र्य दूर होणार नाही तर त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रथम त्यांनी आपली अभिवृत्ती बदलेली पाहिजे. गरिबांना गरिबी दूर व्हावी

असे वाटले पाहिजे त्यासाठी प्रामाणिकपणा, प्रयत्नात सातत्य, कष्ट झेलण्याची तयारी अंगी बाणवली पाहिजे. तरच दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते.

## ६.१० स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

१. जागतिक बँकेच्या सन २०११ च्या अहवालात भारतातील किती टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे ?

अ. ३२.७०%

ब. ४०%

क. ३५%

ड. ५५.५%

२. भारतात ग्रामीण भागात कोणती मोठया प्रमाणात आढळून येते ?

अ. एच्छिक बेकारी

ब. अर्धबेरोजगारी आणि छुपी बेरोजगारी

क. सुशिक्षित बेकारी

ड. पुर्ण बेकारी

३. कोणत्या काळात ग्रामीण भागातील लोकांचा रोजगार बुडाला व ते दारिद्र्याच्या खाईत लोटले गेले ?

अ. करोना काळात

ब. वर्तमान काळात

क. भविष्य काळात

ड. सुवर्णकाळात

४. केंद्र शासनाने गरिबीचे निर्मुलनाचे नवीन धोरण निश्चिती करण्यासाठी कोणत्या समितीची स्थापना केली ?

अ. बलवंतराय समिती

ब. अशोक समिती

क. प्रा. आर राधाकृष्ण समितीची

ड. वनहक्क समिती

५. ग्रामीण भागात दारिद्र्याचा परिणाम म्हणून अनेक कुटुंबाना सावकारांकडून कोणत्या समस्येमुळे पिळवणूक होते ?

अ. कर्जबाजारी

ब. करोना

क. छुपी बेकारी

ड. बालगुन्हेगारी

६. केंद्र शासनाने कोणत्या साला पासून दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली ?

अ. १९९१

ब. १९६६

क. १९८२

ड. १९९९

७. शासनाने कोणत्या साली राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान (NRLM) सुरु करण्याचा निर्णय घेतला ?

अ. १८ जुलै २०११

ब. ११ ऑक्टोबर १९६६

क. २ फेब्रुवारी २००६

ड. २५सप्टें २००१

८. गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी कोणती योजना सुरु करण्यात आली होती ?

अ. इंदिरा महिला

ब. सिंगल विडो सिस्टिम

क. बेटी बचाओ बेटी पढाओ

ड. किशोरी शक्ती योजना

९. केंद्र शासनाने कोणत्या पासून दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली ?

अ. १९९१

ब. १९९९

क. २००१

ड. २०२१

१०. ग्रामीण भागात कोणत्या संधि उपलब्ध नसल्याने स्थलांतराचे प्रमाण वाढते ?

अ.कायमस्वरूपी रोजगाराच्या

ब. करमणूकीच्या

क. आरोग्याच्या

ड. व्यसनाच्या

११. दारिद्र्याचे दृष्टचक्र ही संकल्पना खालीलपैकी कोणत्या नावाशी निगडित आहे ?

अ. केन्स

ब. कार्ल मार्क्स

क. रग्नर नर्क्स

ड. जे. एस. मिल

१२. दारिद्र्य निर्मुलन हा कार्यक्रम कोणत्या पंतप्रधानानी सुरु केला ?

अ. श्रीमती इंदिरा गांधी

ब. श्री मनमोहन सिंग

क. अटल बिहारी बाजपेयी

ड. श्री नरेंद्र मोदी

१३. "एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय." अशी दारिद्र्याची व्याख्या कोणत्या अर्थतज्ञानी केली आहे ?

अ. गोगार्ड

ब. प्रा. अमर्त्य सेन

क. केन्स

ड. रग्नर नर्क्स

१४. सामान्य भारतीय ग्रामीण माणसाला दररोजच्या आहारातून किती उषांकाची गरज असते ?

अ. २४००

ब. २२५०

क. २०५००

ड. २०२००

१५. कोणते दारिद्र्य कमीत कमी गरजांचा विचार करते ?

अ. निरपेक्ष

ब. सापेक्ष

क. ग्रामीण

ड. शहरी

## ६.११ सरावासाठी प्रश्न

१. दारिद्रयाची व्याख्या सांगून दारिद्रयाचे प्रकार सांगा ?

२. दारिद्रयाची व दारिद्रयरेषेची संकल्पना स्पष्ट करा

३. ग्रामीण दारिद्रयाची कारणे विशद करा ?

४. ग्रामीण दारिद्रयाचे परिणाम स्पष्ट करा ?

५. दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घ्या ?

६. ग्रामीण दारिद्रय निर्मुलनासाठी उपाय योजना सांगा ?

## ६.१२ संदर्भ पुस्तके

१. प्रा. ए. वाय. कोंडेकर व प्रा विजय मारुलकर 'भारतातील सामाजिक समस्या' फडके प्रकाशन.

२. खरे सी.पी 'दारिद्रयाचा अर्थ' दास्ताने आणि कंपनी, पुणे

३. World Human Development Report - Nov. 2010

४. इंगळे जयवंत जानेवारी मार्च २००९ ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींनच्या दारिद्रयाची समस्या 'अर्थसंवाद' खंड ३२ अंक ४

५. नलावडे पंडित नोव्हेंबर २००७, 'महाराष्ट्रातील दारिद्रयाचे प्रमाण एक अभ्यास योजना मासिक

६. उगले सुनिल ऑगस्ट २०१२ 'भारतीय दारिद्रयाचे प्रमाण एक अभ्यास' योजना मासिक

७. प्रा. डी आर जगताप, प्रा. सौ निता वाणी, डॉ मंगल जंगले, प्रा डी जी पाटील. 'भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप' प्रशांत प्रकाशन, जळगाव.

८. रा. झ. लोटे, 'भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या' पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

९. (संदर्भ. डॉ विलास गायकर 'गरिबी हटाओ चे अर्धशतक एक मुल्यमापन' महाराष्ट्र टाइम्स दैनिक ४ एप्रिल २०२१ संदर्भ. महाराष्ट्र टाईम्स दैनिक १८ एप्रिल २०२२)

❖❖❖❖

# ७

## ग्रामीण दारिद्र्य-२

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टये

७.१ प्रास्ताविक

७.२ विषय विवेचन

७. ३ भारतातील योजना काळातील दारिद्रय निर्मूलनाचे कार्यक्रम

७.४ सारांश (Summary)

७.५ स्वयंअध्ययन प्रश्न

७.६ सरावासाठी प्रश्न

७.७ संदर्भ पुस्तके

### ७. ० उद्दिष्टये

१) दारिद्र्याचा अर्थ आणि संकल्पना लक्षात येईल.

२) भारतातील दारिद्र्याचे प्रकार याचे आकलन होईल.

३) दारिद्र्याची कारणे, परिणाम व उपाय यांची माहिती होईल.

### ७.१ प्रास्ताविक

दारिद्र्याची समस्या भारतापुरती मर्यादित न राहता या समस्येचे वैश्विक रूप धारण केल्याचे दिसते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र संघाने २००० या वर्षी २१ व्या शतकातील विकासातील ध्येय निश्चित करताना दारिद्र्य आणि उपासमारीचे प्रमाण निम्यावर आणण्याचे निश्चित केले होते. सांप्रत काळात भारतीय ग्रामीण समाजात दारिद्र्य आणि उपासमार हा ज्वलंत समस्येचे मुददा बनला आहे. ग्रामीण दारिद्र्याची संकल्पना ही केवळ आर्थिक नसून ती सामाजिक आहे. उदरनिर्वाहाची किमान साधने उपलब्ध नसणे किंवा तुटपूंजी असणे या बाबी आर्थिक दारिद्र्यामध्ये मोडतात. कोणतीही आर्थिक प्रक्रिया कधीच सुटी व स्वायत्त नसते. व्यक्तीच्या अस्तित्वाला आर्थिककतेसोबत सामाजिक राजकीय असे अनेकविध पैलू चिकटलेले असतात. वेगळ्या शब्दात समाजाची सर्व अंगे आणि त्या अंगांमध्ये घडून येणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया व्यक्तीच्या अस्तित्वात सामाविष्ट झालेल्या असतात. या अर्थाने दारिद्र्याला सामाजिक पदर आहे. ग्रामीण भारतीय संदर्भात दारिद्र्याची मुळे जात, वर्ग, प्रदेश, लिंग, भाषा, शिक्षण, व आरोग्य इ सामाजिक घटकांमध्ये सापडतात. म्हणूनच

दारिद्रयाची कारणे सामाजिक घटकांच्या परस्पर प्रक्रियेत शोधावी लागतात. आपण भारतातील दारिद्रय, त्याचा अर्थ आणि संकल्पना, दारिद्रयाची कारणे व उपाययोजनांचा यांचा अभ्यास या घटकात करणार आहोत. भारतीय ग्रामीणअर्थव्यवस्थेला वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, आर्थिक व सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल, वाढती गुन्हेगारी, यासारख्या महत्त्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या मागे महत्वाचे कारण दारिद्रय आहे. या समस्यांमुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. देशाचा विकास जर जलद गतीने व्हावयाचा असेल तर भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रयाची ज्वलंत समस्या सोडवावी लागेल. कारण गाव म्हणजे देशाचा नकाशा. गावावरून देशाची परिक्षा. गावची भंगता अवदशा. येईल देशा. हाच विचार समोर ठेवून यासाठी भारत सरकार व घटकराज्ये प्रयत्नशील आहेत. तरीही या समस्यांची तीव्रता कमी नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्वीकार केला आहे.

## ७.२ विषय विवेचन

सदर घटकामध्ये आपण भारतातील दारिद्रयाचा अर्थ, संकल्पना, कारणे, परिणाम व उपाय या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### ७.२.१ भारतातील दारिद्रयाची समस्या :

ग्रामीण भारताच्या अनेक प्रमुख समस्यापैकी दारिद्रय ही एक ज्वलंत समस्या मानली जाते. भारतात सार्वत्रिक दारिद्रय आढळते. देशाच्या विकासामध्ये दारिद्रयामुळे अडथळा निर्माण होतो आहे. ग्रामीण भारतातील वाढती लोकसंख्या, बेकारीचे मोठे प्रमाण, आर्थिक विषमता, खाजगीकरण, शेतीप्रधान अर्थव्यवस्था अशा अनेक कारणामुळे ग्रामीण भारतात दारिद्रय व्यापक प्रमाणात आढळते. ग्रामीण भारतात दारिद्रय निवारण्यासाठी नियोजन काळात अनेक उपाययोजना आखण्यात आल्या. त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. परंतु भारतात आजही मोठया प्रमाणात दारिद्रय आढळून येते. भारतीय नियोजनाला मानवी चेहरा देण्याच्या दृष्टीने डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्रय निर्मुलनाच्या कार्यक्रमावर भर देवून सामाजिक सशक्तता वाढविण्यावर भर देण्याचे सुचविले आहे.

## ७.३ भारतातील योजना काळातील दारिद्रय निर्मूलनाचे कार्यक्रम

### १. सीमांत शेतकरी व शेतमजूर यांच्या विकासासाठी संस्था :

ग्रामीण भागातील सर्वात दुर्बल घटक म्हणजे सीमांत शेतकरी, ज्याची जमीन १ ते ३ एकर एवढीच आहे आणि जे भूमीहीन शेतमजूर आहेत त्यांच्या दारिद्रयाच्या निर्मुलनासाठी अखिल भारतीय परीक्षण समितीने केलेल्या शिफारशीनुसार १९७१ पासून लहान शेतकरी विकास एजन्सी सुरु करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत लहान शेतकऱ्यांना आवश्यक सेवा पुरविणे, जलसिंचनाची व्यवस्था करणे, सहाय्यकारी बँकेकडून कर्ज मिळविण्यास मदत करणे व विक्री व्यवस्थेबाबत मदत करणे इ. बाबींचा समावेश होतो. या योजनेने १९८० सालापर्यंत १ कोटी ६९ लाख सीमांत शेतकऱ्यांना दारिद्रय दूर करण्यास मदत केली. पुढे हीच योजना १९८० मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) मध्ये समाविष्ट करण्यात आली.

### २. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :

या योजनेची सुरुवात भारतात सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात झाली. महाराष्ट्रातील सर्व पंचायत समित्यांच्या पातळीवर २ ऑक्टोबर १९८२ साली झाली. एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या माध्यमातून भारत सरकारने देशातील ग्रामीण भागात राहणारी गरीब कुटूंबे, सीमांत शेतकरी, शेत मजूर, आणि ग्रामीण कारागीर यांना स्वतः चा व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्य केले होते. यात समाजाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन करणे पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, उपलब्ध साधनांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करणे, गरीब कुटुंबाना स्वयं रोजगार देणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. १९९९ साली या कार्यक्रमाचे नामकरण सुवर्णजयंती ग्रामीण विकास कार्यक्रम असे करण्यात आले.

### ३. किमान गरजा कार्यक्रम :

गरिबी हटाव आणि सामाजिक न्यायासह विकास साध्य करण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षात १९७४ - ७८ साली किमान गरजा कार्यक्रम सुरु करण्यात आला. या कार्यक्रमात दारिद्रय रेषेखालील लोकांच्या उपभोग पातळी सुधारणा करणे ग्रामीण व शहरी, भागातील कामगारांची उत्पादकता, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, रस्ते बांधणी तसेच भूमिहीन श्रमिकांना घरे देणे इ. या कार्यक्रमाचे मुलभूत घटक होते.

### ४. २० कलमी कार्यक्रम :

माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी हा कार्यक्रम जानेवारी १९८२ मध्ये सुरु केला. त्यानंतर तो पुन्हा २० ऑक्टोंबर १९८६ ला नव्याने आणला. गेला. २० कलमी कार्यक्रमांतर्गत गरीब लोकांच्या विविध मुलभूत गरजा पुर्ण करण्यासाठी व त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या.

### ५. ग्रामीण भूमिहीन मजूर रोजगार हमी कार्यक्रम :

या योजनेची सुरुवात १५ ऑगस्ट १९८३ मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुराला १०० दिवस रोजगार देण्याची हमी या योजनेत आहे. या योजनेत कुटुंबातील किमान एक व्यक्तीला अशी हमी देते. केंद्रपुरस्कृत ही योजना राज्यशासनमार्फत अंमलात आणली जाते.

### ६. प्रधानमंत्री ग्रामोदय योजना :

ग्रामीणपातळीवर मानवी विकास साध्य करण्यासाठी २०००-२००५ मध्ये सुरु केलेल्या प्रधानमंत्री ग्रामोदय योजनेअंतर्गत खेडयातील गरिबांना पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य योजना, राहण्यासाठी घरे आणि शिक्षण दिले जाते.

### ७. इंदिरा महिला योजना :

गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी इंदिरा महिला योजना सुरु करण्यात आली होती.

**८. इंदिरा आवास योजना :**

(१८८५-८६) या योजनेतून गरीबांना घरे बांधणीसाठी आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा ६०% फायदा हा अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी आहे. तसेच डोंगरी व आदिवासी भागातील गरीबांना घर बांधणीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

**९. राष्ट्रीय रोजगार हमी योजना :**

(२ फेब्रुवारी २००६) सर्वप्रथम देशातील २०० जिल्ह्यात लागू केली. या योजनेतून कुटुंबातील एका व्यक्तीला १०० दिवस रोजगार दिला जातो. या योजनेची सुरुवात प्रथम आंध्रप्रदेश या राज्यात झाली. या योजनेतून वृक्ष लागवड, जलसंवर्धन, जलव्यवस्थापन, ग्रामीण विकास, रस्ते बांधणी इत्यादी कामे केली जातात.

**१०. भारत निर्माण योजना :**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी भारत सरकारने भारत निर्माण योजना सुरु केली. या योजनेची घोषणा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००५ मध्ये केली. पाटबंधारे, रस्ते, घरे, पाणी, वीज व दूरध्वनी अशा ग्रामीण भागातील क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याची हमी या योजनेत देण्यात आली आहे.

**११. अंत्योदय अन्न योजना (डिसेंबर २०००) :**

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबापैकी गरीबात गरीब अशा १ कोटी कुटुंबाचा या योजनेत समावेश केला आहे. योजनेखालील प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रुपये कीलो आणि तांदूळ ३ रु. कीलो अशा दराने २५ किलो अन्नधान्य पुरविले जाते.

**१२. प्रधानमंत्री ग्राम सड़क योजना (डिसेंबर २०००) :**

दहाव्या योजनेच्या समाप्तीपर्यंत जेथे रस्ते नाहीत अशा ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील रस्त्याने जोडल्या न गेलेल्या १.८ लाख वस्तीस्थानांना रस्त्याची सुविधा पुरविण्याची ही योजना ही योजना देशभर राबविली जाते.

**१३. कामाच्या मोबदल्यात धान्य कार्यक्रम (फेब्रु २००१) :**

हा कार्यक्रम दुष्काळग्रस्त ग्रामीण भागात राबविला जातो. हा कार्यक्रम ८ राज्यात लागू करण्यात आला आहे.

**१४. ग्रामीण जीवन्नोती अभियान :**

केंद्र शासनाने १९९९ पासून दारिद्र निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली. या योजनेचे केंद्र शासनाने विविध संस्थाकडून मुल्यमापन केले असता सदर योजना सुरु केली. या योजना दारिद्र्य निर्मुलनासाठी काहीअंशी यशस्वी ठरली असली तरी बऱ्याच उणिवा केंद्र शासनाच्या निदर्शनास आल्या. म्हणून केंद्र शासनाने गरिबाचे निर्मुलन करण्यासाठी नवीन धोरण निश्चिति करण्यासाठी प्रा. आर राधाकृष्ण समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन १८ जुलै २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण

जीवन्नोती अभियान (NRLM) सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अभियानात गरिबांच्या स्वयंसहाय्यता गटांचे संघटन करून त्याद्वारे स्वयंरोजगार मिळविणे हा मुलभूत हा घटक मानण्यात आला आहे. राज्यातील सर्व गरीब कुटुंबापर्यंत पोहचून त्यांना कायमस्वरूपी उपजिविकेच्या संधी उपलब्ध करणे व दारिद्रय रेषेच्या वर येईपर्यंत त्यांना मदतीचा हात देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हा या अभियानाचा उद्देश्य आहे. योजनेत केंद्र सरकारचा हिस्सा ७५ टक्के तर राज्य सरकारचा हिस्सा २५ टक्के आहे. ग्रामीण भागातील गरिबातील गरीब अशा स्वरोजगाराची निवड करून विधवा व परितक्त्या महिला, अपंग, अनुसूचित जाती जमाती, आणि अल्पसंख्याक वयोवृद्ध यांना लोकसहभागातून गरीबी निवारण करण्याचा निर्धार शासनाने केला आहे.

**१५. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

सप्टेंबर २०११ मध्ये जवाहर ग्राम समृद्धी योजना आली आहे. अशा प्रकारे भारतात दारिद्रय निर्मूलनासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम राबविले परंतु रोजगार निर्मितीच्या तुलनेत रोजगार मागणाऱ्यांची संख्या व लोकसंख्या जलद गतीने वाढल्याने दारिद्रयाचे प्रमाण वाढतच आहे.

## ७.४ सारांश

भारतातील दारिद्रयाला ऐतिहासिक परंपरा आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळातील भारतावरील परकीय आक्रमणे त्यानंतर अर्वाचीन भारताची ब्रिटिशांनी केलेली आर्थिक लूट आणि स्वातंत्रोनंतर टिकून असलेली सामाजिक, आर्थिक विषमता यामुळे भारत अजूनही ग्रामीण दारिद्रय ही ज्वलंत समस्या दिसून येते. एखाद्या व्यक्तीला गरीब म्हणून तेव्हाचा संबोधले जाते जेव्हा त्या व्यक्तीचा उपभोग किंवा उत्पन्नाची पातळी घसरते. जगामधील गरीब देशांच्या क्रमवारीमध्ये भारत हा एक देश आहे. दारिद्रयाचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे सापेक्ष दारिद्रय आणि दुसरे निरपेक्ष दारिद्रय. २०२१ च्या सुरुवातीला साधारणपणे ८६.८ दशलक्ष लोक दारिद्रयरेषेखाली होते. दारिद्रयाच्या अभ्यासाची सुरुवात आधुनिक भारतामध्ये दादाभाई नवरोजी यांच्यापासून सुरु होते. भारताच्या दिवंगत पंतप्रधान माननीय इंदिरा गांधी यांनी १९७१ मध्ये 'दारिद्रय निर्मुलन' हा नारा दिला. भारतातील खेडयात रोजगाराचा अभाव परिणामी पैशाच्या अभावी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक या सगळ्याबाबत दारिद्रय असते. भारतातील दारिद्रयाच्या प्रमाणाविचार करता बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, ओरिसा, आणि आसाम या राज्यामध्ये इतर राज्याच्या तुलनेत दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. दारिद्रय या समस्येमुळे अल्प राष्ट्रीय उत्पन्न, अल्प दरडोई उत्पन्न, कमी प्रतीचे जीवनमान निर्माण होते. त्यातूनच मोठया प्रमाणावरील बेकारी, अर्धबेकारी व स्थलांतराच्या समस्या निर्माण होतात. गरिबी ही अल्पबचत व अल्प गुंतवणूक व अल्प उत्पादनालासुद्धा जबाबदार आहे. दुसऱ्या शब्दात दारिद्रय हे आर्थिक विकासाला व विघातक आर्थिक परिस्थितीला जबाबदार आहे. गरिबीमुळे समाजाची श्रीमंत आणि गरीब भागात विभागणी होऊन वर्गसंघर्ष निर्माण होतो. दारिद्रयामुळे कुपोषण व दैनावस्था ही परिस्थिती निर्माण होते. त्यामुळेच चोरया, बालगुन्हेगारी इत्यादी सामाजिक समस्या निर्माण होतात. नियोजन काळात शासनाने राबविलेल्या दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक योजना व कार्यक्रम शासनाने राबविले उदा.

लहान शेतकरी विकास एजन्सी, एकात्मिक ग्रामीण विकास योजना (२ ऑक्टोबर १९८०), जवाहर रोजगार योजना (१९८९). किमान गरजा कार्यक्रम, वीस कलमी कार्यक्रम (१९७५-१९८२), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (१९९७), ग्रामीण जीवन्नोती  अभियान (१९९९), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२०११), या सर्व योजनांचा परिणाम म्हणून भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होत आहे तथापि, उत्पादन साधनांचा मालकीची विषमता, हस्तउद्योग व ग्रामोद्योगांचे देवसेंदिवस घटणारे प्रमाण, लोकसंख्या वाढ, रूढी परंपरा, सामाजिक व आर्थिक विषमता, भाववाढ, दारिद्र्य निर्मुलनाच्यायोजनांचा गैरवापर, अनियमित रोजगार, आणि मानवी मूल्यांचीघसरण, नैसर्गिक संकटे इत्यादीमुळे भारतात ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनाचा वेग अत्यंत कमी आहे. ग्रामीण भागातील लोकांना एखाद्या रक्तपीती  व्याधी प्रमाणे चिकटून राहिलेल्या या दारिद्र्याच्या स्थितीतून त्यांची सुटकाच होत नाही म्हणून दारिद्र्य हे दृष्टचक्र आहे असे अर्थतज्ञ प्रो. रेग्नर नर्क्स यांनी म्हटले आहे. या चक्रातून स्वतः ची सुटका करून घेणे एका व्यक्तीच्या दृष्टीने फारच अवघड असते. जे खूद्द दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. केवळ प्रारब्धवादी बनून हताशपणे दारिद्र्यात खितपत पडल्याने दारिद्र्य दूर होणार नाही तर त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रथम त्यांनी आपली अभिवृत्ती बदलेली पाहिजे. गरिबांना गरिबी दूर व्हावी असे वाटले पाहिजे त्यासाठी प्रामाणिकपणा, प्रयत्नात सातत्य, कष्ट झेलण्याची तयारी अंगी बाणवली पाहिजे. तरच दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते.

## ७.५ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

१. जागतिक बँकेच्या सन २०११ च्या अहवालात भारतातील किती टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे ?

अ. ३२.७०%

ब. ४०%

क. ३५%

ड. ५५.५%

२. भारतात ग्रामीण भागात कोणती मोठया प्रमाणात आढळून येते ?

अ. एच्छिक बेकारी

ब. अर्धबेरोजगारी आणि छुपी बेरोजगारी

क. सुशिक्षित बेकारी

ड. पुर्ण बेकारी

३. कोणत्या काळात ग्रामीण भागातील लोकांचा रोजगार बुडाला व ते दारिद्र्याच्या खाईत लोटले गेले ?

अ. करोना काळात

ब. वर्तमान काळात

क. भविष्य काळात

ड. सुवर्णकाळात

४. केंद्र शासनाने गरिबीचे निर्मुलनाचे नवीन धोरण निश्चिती करण्यासाठी कोणत्या समितीची स्थापना केली ?

अ. बलवंतराय समिती

ब. अशोक समिती

क. प्रा. आर राधाकृष्ण समितीची

ड. वनहक्क समिती

५. ग्रामीण भागात दारिद्रयाचा परिणाम म्हणून अनेक कुटुंबाना सावकारांकडून कोणत्या समस्येमुळे पिळवणूक होते ?

अ. कर्जबाजारी

ब. करोना

क. छुपी बेकारी

ड. बालगुन्हेगारी

६. केंद्र शासनाने कोणत्या साला पासून दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली ?

अ. १९९१

ब. १९६६

क. १९८२

ड. १९९९

७. शासनाने कोणत्या साली राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान (NRLM) सुरु करण्याचा निर्णय घेतला ?

अ. १८ जुलै २०११

ब. ११ ऑक्टोबर १९६६

क. २ फेब्रुवारी २००६

ड. २५सप्टें २००१

८. गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी कोणती योजना सुरु करण्यात आली होती ?

अ. इंदिरा महिला

ब. सिंगल विडो सिस्टिम

क. बेटी बचाओ बेटी पढाओ

ड. किशोरी शक्ती योजना

९. केंद्र शासनाने कोणत्या पासून दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली ?

अ. १९९१

ब. १९९९

क. २००१

ड. २०२१

१०. ग्रामीण भागात कोणत्या संधि उपलब्ध नसल्याने स्थलांतराचे प्रमाण वाढते ?

अ.कायमस्वरूपी रोजगाराच्या

ब. करमणूकीच्या

क. आरोग्याच्या

ड. व्यसनाच्या

११. दारिद्रयाचे दृष्टचक्र ही संकल्पना खालीलपैकी कोणत्या नावाशी निगडित आहे ?

अ. केन्स

ब. कार्ल मार्क्स

क. रग्नर नर्क्स

ड. जे. एस. मिल

१२. दारिद्रय निर्मुलन हा कार्यक्रम कोणत्या पंतप्रधानानी सुरु केला ?

अ. श्रीमती इंदिरा गांधी

ब. श्री मनमोहन सिंग

क. अटल बिहारी बाजपेयी

ड. श्री नरेंद्र मोदी

१३. "एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय." अशी दारिद्रयाची व्याख्या कोणत्या अर्थतज्ञानी केली आहे ?

अ. गोगार्ड

ब. प्रा. अमर्त्य सेन

क. केन्स

ड. रग्नर नर्क्स

१४. सामान्य भारतीय ग्रामीण माणसाला दररोजच्या आहारातून किती उषांकाची गरज असते ?

अ. २४००

ब. २२५०

क. २०५००

ड. २०२००

१५. कोणते दारिद्रय कमीत कमी गरजांचा विचार करते ?

अ. निरपेक्ष

ब. सापेक्ष

क. ग्रामीण

ड. शहरी

## ७.६ सरावासाठी प्रश्न

१. दारिद्रयाची व्याख्या सांगून दारिद्रयाचे प्रकार सांगा ?

२. दारिद्रयाची व दारिद्रयरेषेची संकल्पना स्पष्ट करा

३. ग्रामीण दारिद्रयाची कारणे विशद करा ?

४. ग्रामीण दारिद्रयाचे परिणाम स्पष्ट करा ?

५. दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घ्या ?

६. ग्रामीण दारिद्रय निर्मुलनासाठी उपाय योजना सांगा ?

## ७.७ संदर्भ पुस्तके


१. प्रा. ए. वाय. कोंडेकर व प्रा विजय मारुलकर 'भारतातील सामाजिक समस्या' फडके प्रकाशन.

२. खरे सी.पी 'दारिद्रयाचा अर्थ' दास्ताने आणि कंपनी, पुणे

३. World Human Development Report - Nov. 2010

४. इंगळे जयवंत जानेवारी मार्च २००९ ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींनच्या दारिद्रयाची समस्या 'अर्थसंवाद' खंड ३२ अंक ४

५. नलावडे पंडित नोव्हेंबर २००७, 'महाराष्ट्रातील दारिद्रयाचे प्रमाण एक अभ्यास योजना मासिक

६. उगले सुनिल ऑगस्ट २०१२ 'भारतीय दारिद्रयाचे प्रमाण एक अभ्यास' योजना मासिक

७. प्रा. डी आर जगताप, प्रा. सौ निता वाणी, डॉ मंगल जंगले, प्रा डी जी पाटील. 'भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप' प्रशांत प्रकाशन, जळगाव.

८. रा. झ. लोटे, 'भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या' पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

९. (संदर्भ. डॉ विलास गायकर 'गरिबी हटाओ चे अर्धशतक एक मुल्यमापन' महाराष्ट्र टाइम्स दैनिक ४ एप्रिल २०२१ संदर्भ. महाराष्ट्र टाईम्स दैनिक १८ एप्रिल २०२२)


❖❖❖❖

# ८

# भारतीय अर्थव्यवस्था व नवीन आर्थिक धोरण- भाग १

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टये

८.१ प्रस्तावना

८.२ आर्थिक धोरणाची संकल्पना व व्याख्या

८.३ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांचे स्वरूप

८.४ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची गरज

८.५ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची वैशिष्टये

८.६ सारांश

८.७ सरावासाठी प्रश्न

८. ८ संदर्भ ग्रंथ

## ८.० उद्दिष्टये

भारतातील नवीन आर्थिक सुधारणा प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर पुढील बाबींचे ज्ञान होईल.

१) आर्थिक धोरणाची संकल्पना व आर्थिक सुधारणाची गरज समजून घेता येईल.

२) नवीन आर्थिक सुधारणाच्या पद्धती आणि आर्थिक सुधारणांसाठी शासनाने केलेल्या उपाययोजना स्पष्ट होतील.

३) आर्थिक धोरणाचे यश व अपयशाचे आकलन होईल.

## ८.१ प्रस्तावना

जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात आर्थिक धोरणाची निर्मिती प्रामुख्याने विकास आणि उन्नती करण्यासाठी केली जाते. आपल्या भारत देशाला 1947 मध्ये अनेक पातळीवर संघर्ष करून स्वातंत्र्य प्राप्ती झाली. स्वातंत्र्यानंतर देशाची सर्वच आघाडीवर घडी बसवणे हे अवघड काम त्या काळातील नेतृत्वाला पार पाडावे लागले. एका बाजूस मिश्र अर्थव्यवस्थेच्या प्रारुपाचा स्वीकार करून मुलभूत उद्योग सार्वजनिक तर अन्य क्षेत्र खासगी उद्योग या पद्धतीने पुढे जाण्याचा संकल्प करण्यात आला. यासाठी नियोजनबद्ध रितीने देशाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने नियोजन आयोगाची निर्मिती करण्यात आली.

आयोगाच्या वतीने पंचवार्षिक योजनाचे प्रतिमान स्वीकारून प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात झाली. भयावह दारिद्र्य, मागासलेली शेती, पारंपारिक व आजारी उद्योग, निरक्षरता अशा आव्हानांना सामोरे जात देशाने 'कल्याणकारी' राज्यच्या (Welfare State) दिशेने आपण वाटचाल सुरु केली. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ पासून पंचवार्षिक योजना काळात विकासाचे धोरण अवलंबिले. हे धोरण राबविताना स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली घसरण भरून काढणे हे उद्दिष्टय होते. त्यासाठी १९५१ या काळात अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राकडून मोठया प्रमाणावर गुंतवणूक केली होती. त्यासाठीचे आवश्यक भांडवल कर्जाच्या स्वरुपात आंतरराष्ट्रीय स्थरावर उभारले गेले. त्याचा परिणाम म्हणून भारतावर कर्जाचा बोजा निर्माण झाला. जीवनावश्यक वस्तूची किंमत वाढली होती. आपल्या देशाची आंतरराष्ट्रीय पत घसरली. अशा दयनीय परिस्थितीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढून अर्थव्यवस्थेला नवचैतन्य प्राप्त करून देणे काळाची गरज होती. या पार्श्वभूमीवर तत्कालीन पंतप्रधान श्री नरसिंह व अर्थमंत्री मनमोहनसिंग याच्या कारकिर्दीत भारत सरकारने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला.

30 वर्षापूर्वी 24 जुलै 1991 ला खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाऊजा ) या नव्या आर्थिक धोरणाची संसेदेत घोषणा झाली. तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थसंकल्प सदर करताना नव्या आर्थिक धोरणांची रूपरेषाही मांडली. पण, आर्थिक धोरणांची चौकट बदलण्याची प्रक्रिया त्यापूर्वी अंदाजे एक दशक आधी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना सुरु झाली.

देशात 1991 च्या आर्थिक सुधारणा या अन्वयार्थाने मोठया व अचानक, तत्कालीन वाटण्याची शक्यता आहे, पण तशा मोठया धोरणात्मक बदलाची प्राथमिक पाऊले 1980-81 ते 1984-85 या 6 व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पडलेली दिसतात.

## ८.२ नवीन आर्थिक धोरणाची संकल्पना व व्याख्या

प्रस्तुत घटकांमध्ये आपण भारतीय नवीन आर्थिक धोरणाची व्याख्या अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणा संकल्पना व व्याख्या, गरज, स्वरूप व वैशिष्ट्याचा अभ्यास करणार आहोत.

**संकल्पना व व्याख्या :**

आर्थिक धोरणाच्या संकल्पनेमध्ये अर्थव्यवस्थेला सक्षम करणाऱ्या आर्थिक घटकांचा पर्याप्त वापर करण्यासाठी डावपेच आखले जातात. देशातील संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी देशातील साधनसंपत्तीचा योग्य उपयोग करण्यासाठी तसेच आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक धोरणाची भूमिका महत्वाची असते.

**नवीन आर्थिक धोरणाची व्याख्या –**

भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकात अंतर्गत व बहिर्गत आत्मविश्वास उंचावण्यासाठी अनेक बदल केले. ज्यामध्ये परकीय गुंतवणूका, व्यापार, विनिमय दर, उद्योग, बँका, वित्तिय संस्था आणि राजकोषीय धोरण या संबंधी धोरणांमध्ये मुलभूत बदल केले या सर्व एकत्रित घटकांना आर्थिक धोरण असे म्हटले जाते.




https://www.dompsc.com

## ८.३ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची स्वरूप

आर्थिक धोरणातील कमतरता आणि विकृती सुधारण्यासाठी रचनात्मक समायोजनेच्या प्रक्रियेने आर्थिक सुधारणांची सुरुवात झाली. नियोजनाच्या चार दशकानंतरही एकूण लोकसंख्येच्या ३६ टक्के लोकसंख्या दारिद्र्याच्या स्थितीत राहते हे आपल्या नियोजनाच्या दृष्टीने क्लेशकारक वाव होती. १९९१ मध्ये सुधारणाची प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी सरकारने भारतीय अर्थव्यवस्था जगातील इतर देशांपासून दुरच ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी भारतात सार्वजनिक क्षेत्रातील मक्तेदारीमुळे पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक फारच कमी होती. असे असले तरी या क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी अधिक वाव होता. १९६२ च्या भारत चीन युद्धामुळे आणि १९६६-६७ चा दुष्काळ या कारणामुळे १९६६-६७ मध्ये पहिले आर्थिक संकट आले. १९७४ मधला अपुरा पाऊस १९७३ मधील तेलाचे संकट यामुळे १९७४ दूसरे संकट आले. या सर्व संकटांमधून अवमूल्यन करून भारतीय अर्थव्यवस्था सावरण्यात आली. एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी काळाची पावले ओळखून आतापर्यंत अंमलात आणल्या गेलेल्या धोरणांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याची गरज वाटू लागली. खालील मुद्दे भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक सुधारणांची गरज का होती याचे स्पष्टीकरण देतात.

१९८५ मध्ये पंतप्रधान म्हणून कार्यभार हाती घेतल्यानंतर राजीव गांधी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये बदल करण्याचे सूचित केले. नवीन आर्थिक धोरणाचा मुलभूत विश्वास हा काजागी क्षेत्राच्या सहभागावर होता. खाजगी क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यासाठी औद्योगिक परवाना, परकीय व्यापार, परकीय समभाग भांडवल, खाजगी क्षेत्राला योग्य औद्योगिक पर्यावरण प्राप्त व्हावे आणि भारत देशाचा आर्थिक विकास जलद गतीने व्हावा यासाठी केले गेले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कारकीर्दीत आर्थिक सुधारणांची मुहुर्त मेढ रोवली गेली असली तरी त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम दिसून आलेला नव्हता. २१ जून १९९१ रोजी पी. व्ही नरसिंहराव यांनी देशाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्याला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. देशामध्ये अंतर्गत आणि बहिर्गत आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी स्थिरीकरणात्मक आणि रचनात्मक समायोजन यांची अंमलबजावणी सुरु केली आणि नवीन आर्थिक धोरणाच्या स्वरुपात अर्थ व्यवस्थेत खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पांचा नव्याने जन्म झाला.

## अ. जागतिकीकरण संकल्पना (Concept of Globalization)

जागतिकीकरण किंवा वैश्विकीकरण (Globalization) हा अत्यंत लोकप्रिय आणि चर्चेचा विषय झाला आहे. जागतिकीकरण हे नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे सूत्र आहे. जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलाच्या हालचालीवरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करणे व त्यांचा प्रवाह सुखकर व गतिमान करण्याची प्रक्रिया होत थोडक्यात व्यापार, रोजगार, तंत्रज्ञान दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होणारे रुपांतर म्हणजे जागतिकीकरण असे म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या संकल्पनेत पुढील बाबींचा समावेश होतो, **खाजगीकरण,** उदारीकरण.

**खाजगीकरण संकल्पना :** भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी १९९१ रोजी जे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्या धोरणातील एक महत्वाची संकल्पना म्हणजे; खाजगीकरण' होय. स्वातंत्र प्राप्तीनंतर आपल्या भारत देशाचा जलद विकास साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीअकर करण्यात आला होता. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाबरोबरच खाजगी उद्योगाची उभारणी करण्यासाठी शासनाने विकासात्मक धोरण आखले. महत्वाचे उद्योग व मुलभूत उद्योग (लोखंड पोलाद उद्योग, वीजनिर्मिती उद्योग, पोष्ट, दुरध्वनी, तारसेवा, सिमेंट उद्योग, वाहतूक दळणवळण सेवा) सार्वजनिक क्षेत्रात ठेवण्यात आले व कमी महत्वाचे उद्योग खाजगी क्षेत्राकडे ठेवण्यात आले. कालांतराने म्हणजे १९४७ ते १९९० या काळापर्यंत या क्षेत्रातील अकार्यक्षमता व भ्रष्टाचार यात वाढ झाली. कामगिरी निराशाजनक ठरली. सार्वजनिक क्षेत्र तोटयात जाऊ लागले त्यामुळे भारत सरकारला सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्यासाठी विशेष योजना आखणे जरुरीचे वाटले आणि त्यानुसार सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खुले करण्याचे धोरण सरकारने अमलात आणले. तोटयात चालणारे कारखाने कार्यालये यांचे निर्गुतवणुकीकरण करून ते खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्यात आले या प्रक्रियेला खाजगीकरण असे म्हणतात. म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकांची मालकी त्यांचे व्यवस्थापन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया यांचा समावेश खाजगीकरण या संकल्पनेत होतो. खाजगीकरण हा जागतिकीकरण गाठण्याचा मार्ग आहे. खाजगीकरण ही राष्ट्रीयकारणाच्या विरुद्ध संकल्पना आहे. १९९१ नंतर भारतीय अर्थ व्यवस्थेने खाजगीकरण सुरुवात केली. भारतातील शिक्षण व्यवस्थेतही खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.




https://marathivishwakosh.org

**आ. उदारीकरण संकल्पना:**

२४ जुलै १९९१ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही.नरसिंह राव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी ऐतिहासिक अर्थसंकल्प सादर करून देशात उदारीकरणाचे रणशिंग फुंकलं आणि भारतात उदारीकरणाला सुरुवात झाली. या घटनेला ३१ वर्षे होत आहेत. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या त्रिसूत्री मधील उदारीकरण किंवा शिथिलीकरण ही एक महत्वाची संकल्पना आहे. या संकल्पनेत नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या जागी बाजाराभिमुख खुल्या व मुक्त स्पर्धेवर आधारित अर्थव्यवस्था ही उदारीकरण प्रक्रियेतील मूळ संकल्पना आहे

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. देशाच्या आर्थिक व्यवस्थेत विकासाच्या दिशेने करण्यात येणारी सुधारणात्मक उपायांची एक साखळी म्हणजे 'आर्थिक उदारीकरण' होय. हि संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरूपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.उदारीकरण म्हणजे अर्थ व्यवस्थेमध्ये लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रणे काढून टाकणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे, सरकारच्या सहभागाचे क्षेत्र मर्यादित करणे, उद्योजकांना व व्यावसायिकांना सोयी व सवलती पुरविणे, त्यांना पुरेसे स्वातंत्र देणे, देशी परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि एकंदरीने अर्थव्यवस्था अधिक मुक्त, पारदर्शी व स्पर्धात्मक करणे होय.

थोडक्यात जागतिकीकरण हे मुक्त अर्थव्यवस्थेचं अंतिम हे लक्ष गाठण्यासाठी उदारीकरण असे म्हणतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन, गुंतवणूक आयात-निर्यात इत्यादीवरील परवाना पद्धातीसारखे जाचक निर्बंध, नियंत्रणे व नियम कमीत कमी करण्याच्या धोरणाला समावेश उदारीकरणाच्या प्रक्रियामध्ये होतो.

## ८.४ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची गरज

भारतावर कर्जाचा बोजा निर्माण झाला. जीवनावश्यक वस्तूची किंमत वाढली होती. आपल्या देशाची आंतरराष्ट्रीय पत घसरली. अशा दयनीय परिस्थितीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढून अर्थव्यवस्थेला नवचैतन्य प्राप्त करून देणे काळाची गरज होती. या पार्श्वभूमीवर तत्कालीन पंतप्रधान श्री नरसिंह व अर्थमंत्री मनमोहनसिंग याच्या कारकिर्दीत भारत सरकारने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला.

### १. अर्थव्यवस्थेचा कमी वृद्धी दर (The low growth rate of the Economy) :

आर्थिक विकासची प्रक्रिया अधिक जलद आणि सर्वसमावेशक करणे हे प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. १९९० पर्यंत भारताचा वार्षिक वृद्धी दर हा इतर विकसनशील देशापेक्षा कमी होता त्यामुळे भारतात आर्थिक सुधारणाची गरज निर्माण झाली.

### २. दारिद्रय आणि बेरोजगारी (Poverty and Unemployment) :

देशातील लोकांचे जीवनमान उंचावणे म्हणजेच दारिद्रय कमी करणे आणि देशातील प्रत्येक सक्षम श्रमिकाला रोजगार पुरविणे ही भारतीय नियोजनाची मुख्य उद्दिष्टये आहेत. तथापि, नियोजनाच्या चार दशकांनंतर एकूण लोकसंख्येच्या ३६ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली राहत होते परिणामी मानव विकास निर्देशकांमध्ये भारत देशाचा क्रमांक खुप खाली घसरला होता म्हणून भारत सरकारने नविन आर्थिक धोरण राबविण्याचा संकल्प केला.

### ३. कमी उत्पादकता (Low productivity) :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात गुंतवणूक वाढवूनदेखील कमी उत्पादकतेच्या समस्येला भारतीय अर्थव्यवस्थेला सामोरी जात होती ही समस्या दूर करण्यासाठी 'खाउजा' धोरण राबविणे काळाची गरज होती.

### ४. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समस्या : (Problems of public sector Industries) :

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या भक्कम पाया म्हणजे कार्यसंस्कृती. अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यामध्ये कार्य मूल्यावर विश्वास ठेवणाऱ्या कामगारांचा मोठा वाट असतो. भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगामध्ये कार्य संस्कृतीबद्दल उदासिनता १९९० पर्यंत जाणवत होती. गरजेपेक्षा जास्त असलेले कर्मचारी आणि ते सुद्धा आराममुल्य जाणणारे होते. परिणामी उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाला होता. कच्चा माल आणि अन्नधान्याची नासधूस आणि मोठया प्रमाणावरील कामगार संघटनांमध्ये असलेली कार्यसंस्कृती बद्दलची अनास्था यामुळे भारतातील सार्वजनिक क्षेत्र कमी उत्पादकता आणि गुंतवणुकीवरील अल्प मोबदला या समस्येशी सामना करत होती. आकडेवारी अशी साक्ष देतात की देशाच्या एकूण बचतीमध्ये सार्वजनिक क्षेत्राचा हिस्सा १०५० मध्ये १७ टक्के इतका होता तो घसरून १९८९.९० मध्ये ८ टक्के इतका झाला. सरकारी मालकीच्या उद्योगांना याच काळात मोठा तोटा झालेला दिसून येतो. या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेमध्ये नव चैतन्य आणण्यासाठी नवीन आर्थिक धोरण स्वीकारणे अपरिहार्य होत.

### ५. चलन वाढीचा दबाव (Inflationary Pressues) :

१९९० च्या काळात चलन वाढीचा विपरित परिणाम देशाच्या उत्पन्नाच्या वितरणावर होत होता. चलन वाढीमुळे दारिद्रय आणि उत्पन्न तसेच संपत्तीतील विषमता वाढते हे टाळण्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला गेला.

**६. परकीय चलनाची टंचाई (Shortage of Foreign Exchange) :**

परकीय चलन साठयाला 'Reserve Currency' असेही म्हणतात. परकिय चलनसाठा एखाद्या आरोग्यतपासणीच्या मीटरसारखा असतो किंबहुना अधिक परकिय चलनसाठा असलेल्या देशाची आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगली प्रतिमा असते. कारण आंतरराष्ट्रीय व्यापारात या चलन साठ्यावरून ठरणाऱ्या प्रतिमेचा चांगला उपयोग होतो. थेट गुंतवणूक त्याचबरोबर शेअर बाजारात झालेली गुंतवणूक याचा विचार करून परकीय चलन विनिमय दरानुसार या साठयांचे मुल्यांकन केले जाते. परकीय चलन साथ केंद्रिय बँकासाठी महसूल मिळविण्याचा प्रमुख स्त्रोतापैकी एक आहे. जे परकीय सरकारी रोख्यांमध्ये पैसे गुंतवितात आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि इतर सुरक्षित गुंतवणुकीच्या पर्यायामध्ये देखील गुंतवणूक करतात. परकिय चलन साठयामध्ये परदेशी चलन, गोल्ड रिझर्व्ह, एस डी आर आणि आय एम एफ कोटा, डिपॉसिट ट्रेझरी विल बॉड आणि इतर इतर सरकारी सिक्युरीटीज समाविष्ट असतात. १९९१ च्या आर्थिक संकटामध्ये भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर डिफॉल्टर घोषित होण्याच्या उंबरठ्यावर होता. या पार्श्वभूमीवर आपल्या भारत देशाला आपली आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा उज्वल करण्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करावा लागला.

**७. अल्प जागतिक व्यापार हिस्सा (Minimum Global trade Share) :**

जगातील सर्व अर्थ व्यवस्थामध्ये अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार हे देशाच्या विकास धोरणाचे अविभाज्य घटक आहेत. देशी उपभोगाची गरज पूर्ण करून विशेषीकरणाच्या आधारे वस्तू आणि सेवा यांचे उत्पादन केले जाते. व अतिरिक्त उत्पादन विकले जाते. नव सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी व्यापाराला हिस्सा अल्प होता. जागतिक व्यापारातील हिस्सा वाढविणे आणि जगातील औद्योगिक दृष्टया प्रगत अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करून विकसित राष्ट्राच्या मांदयाळीत प्रवेश करण्यासाठी नवीन आर्थिक सुधारणा राबविण्याची गरज निर्माण झाली होती.

**८. भारताच्या व्यवहार तोलाची नाजूक स्थिती :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या व्यवहार तोलाची स्थिती खूपच नाजूक झाली होती. या व्यवहार तोलाची तूट भरून काढण्यासाठी विदेशी कर्जे, अनिवासी भारतीयांच्या ठेवी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे महाग कर्ज इत्यादींचा वापर करण्यात आला. ही सर्व कर्ज महागडी असल्याने त्यांच्यावरील व्याजाचा दर वाढत गेला. तुट भरून काढण्यासाठी परकिय चलनाचा साठयांचा वापर वाढत गेला त्याचा परिणाम म्हणून परकिय चलनाचा साथ कमी झाला. त्यातच अनिवासी भारतीयांनी आपल्या ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली होती परिणामी १९९० पर्यंत व्यवहार तोलाची स्थिती फारच नाजूक झाली होती या पार्श्व भूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन उभारी देणे काळाची गरज होती म्हणून भारत सरकारने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला.

**९. वित्तपुरवठयाचा तुटवडा (Lack of Financial Resources) :**

देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी अर्थ व्यवस्थेत असलेल्या प्राथमिक द्वितीय आणि सेवा क्षेत्रात योग्य वेळी व योग्य वेळी व योग्य प्रमाणात वित्त पुरवठा होणे गरजेचे असते. १९९०

पर्यंत वित्तीय पतपुरवठा करणाऱ्या स्त्रोताची कमतरता होती. देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी निधीची गरज असते. अत्याधुनिक तंत्रज्ञान यंत्रसामुग्री तसेच देशात उपलब्ध नसलेला कच्चा माल निधीच्या कमतरतेमुळे आयात करू शकत नव्हते. त्याच बरोबर भारतातील संरचनात्मक अशा पायाभूत सुविधांची उणीव होती. या कमतरतेमुळे विकासाची गती मांड झाली होती यातून मार्ग काढण्यासाठी भारत सरकारला नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करणे कमप्राप्त होते.

### १०. अनावश्यक नियंत्रण (Unnecessary Control on Licence) :

भारत सरकार परवाना पद्धतीद्वारे औद्योगिक विकास नियंत्रित करत होते. या परवाना पद्धतीमुळे सरकारी नोकरशाहीत भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले. सरकारच्या अनावश्यक नियंत्रणातून खाजगी उद्योजकांना मुक्ती मिळावी यासाठी 'खाउजा धोरण' नवीन आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून अवलंबन करण्याचा विचार सुरु झाला.

### ११. सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुतवणुकीची समस्या :

'निर्गुतवणूक' हा शब्द खाजगीकरणाची प्रक्रिया दर्शवितो. सार्वजनिक क्षेत्रातील वाढते तोटे, त्यांना द्यावे लागणारे संरक्षण यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग सुरु ठेवावे किंवा नाही यावर विचारमंथन सुरु झाले. निर्गुतवणूकीचा अवलंब केल्यामुळे त्या देशाच्या अर्थव्यवस्था प्रगतीच्या शिखरावर  आरूढ झाल्या. ज्या क्षेत्रात खाजगी क्षेत्र येण्यास तयार व सक्षम आहे त्यांना सार्वजनिक उद्योगात भांडवल गुंतवणुकीसाठी निकोप पर्यावरण निर्मिती करण्याचे सरकारने पाऊल टाकण्यास काय हरकत आहे असा व्यवहारवादी दृष्टिकोन लक्षात घेतला गेला जेणेकरून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग क्षेत्रातील तोटे कमी होणार होते या पार्श्वभूमीवर 'निर्गुतवणूक' धोरणाचा १९९१ पासून भारत सरकारने आपल्या नवीन आर्थिक धोरणात स्वीकार केला.

### १२. स्पर्धेत वाढ :

स्पर्धेशिवाय प्रगती अशक्य असते. प्रगती करण्यासाठी स्पर्धा ही आवश्यक आहे कोणत्याही बाजारपेठेत स्पर्धा असल्याशिवाय दर्जेदार मालाची निर्मिती होत नाही. ग्राहकांना वाजवी किंमतीत माल उपलब्ध होत नाही. परंतु, ही स्पर्धा निकोप असावी. गळेकापू नसावी. जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार कृषी क्षेत्रात निकोप स्पर्धेची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा होती तथापि, ही अपेक्षा फोल ठरत आहे.

## ८.५ भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची वैशिष्टये

१) **औद्योगिक परवाना परमिट राज रद्द करणे :** १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या घोषणेनंतर परवाना राज खालसा करायला सुरुवात केली. बंदिस्त अर्थव्यवस्थेकडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे प्रवासाला सुरुवात झाली. खासगी क्षेत्राला पुढाकार दिला, तसेच सरकारी क्षेत्रात निर्गुंतवणुकीची सुरुवात केली.

२) **सार्वजनिक क्षेत्राची भूमिका सौम्य :** भारत सरकारने सरकारी उदयोगांच्या खाजगीकरणाचा विचार १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या घोषणेनंतर झाला. सरकारी उदयोगांच्या मर्यादा स्पष्ट झाल्यामुळे त्यातून मार्ग काढण्यासाठी खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू केली गेली. सार्वजनिक व खाजगी क्षेत्राला समान वागणूक देण्याचा निर्णय सरकारने घेतला. १९९६ साली १८८ तोटयात असणाऱ्या सरकारी उदयोगांपैकी केवळ ३६ उदयोगांना त्यांचे त्यासाठीचा सरकारी निधी स्थापन करून पुनर्वसन करण्यासाठी मदत करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्राची भूमिका सौम्य केली गेली.

३) **निर्गुंतवणूक धोरण**: सरकारी उदयोगांची पुनर्रचना करण्याच्या संदर्भात सरकारचा अतिशय महत्त्वाचा निर्णय म्हणजे निर्गुंतवणूक (डिस्इन्व्हेस्टमेंट) या धोरणानुसार सरकार नफ्यात चालणाऱ्या उदयोगांचे भाग-भांडवल खाजगी व्यक्तींना - संस्थांना विकू शकेल, अशी तरतूद करण्यात आलेली असून सरकारचे भाग-भांडवल २६% पर्यंत खाली आणण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

४) **परदेशी गुंतवणूक :** परदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञानासाठी मोफत प्रवेश थेट परकीय गुंतवणूक (FDI), तांत्रिक सहकार्य यासाठी दारे खुली केली. परकीय गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ (FIPB) स्थापन केले. थोडक्यात उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण (LPG) धोरणाचा बिगुल वाजला.




https://pib.gov.in

५) **सरकारी हस्तक्षेप कमी झाला** : नव्या धोरणाचे परिणाम स्पर्धा वाढली. देशांतर्गत बाजार विस्तारला. बहुराष्ट्रीय कंपन्या हिरीरीने भारतीय बाजारात दाखल झाल्या. ग्राहकांना निवडीची संधी वाढली. ग्राहकोपयोगी वस्तूंची टंचाई संपून वैपुल्याकडे वाटचाल सुरू झाली. तंत्रज्ञान व मानवी कौशल्ये यात विविधता आली. आयात - निर्यातीवर भर वाढला. विनियंत्रण आल्यामुळे सरकारी हस्तक्षेप कमी झाला. एकंदरीच अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढली. काहींना ही सर्व नव्या युगाची चाहूल आहे, असे वाटले, तर काहींनी ही जगबुडीची सुरुवात आहे, अशी हाकाटी केली. -

६) **उद्योगांना विस्तार आणि उत्पादनासाठी स्वातंत्र्य :** आता या नव्या उदारीकरणाच्या युगात उद्योगांना त्यांच्या उत्पादन क्षमतेत विविधता आणण्यासाठी आणि उत्पादन खर्च कमी करण्यास मोकळे आहेत. पूर्वीचे सरकार उत्पादन क्षमतेची

कमाल मर्यादा ठरवत असे. त्या मर्यादेपलीकडे कोणताही उद्योग उत्पादन करू शकला नाही. आता उद्योगांना बाजाराच्या गरजेच्या आधारावर त्यांचे उत्पादन स्वतःहून ठरवण्याची मुभा आहे.

७) **प्रतिबंधात्मक व्यापार पद्धती रद्द करणे :** मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार (MRTP) कायदा 1969 नुसार, त्या सर्व कंपन्या ज्यांची मालमत्ता रु. 100 कोटी किंवा त्याहून अधिक कंपन्यांना MRTP फर्म म्हटले गेले आणि त्यांच्यावर अनेक निर्बंध घालण्यात आले. आता या कंपन्यांना शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार नाही. गुंतवणुकीचे निर्णय घेण्यासाठी. आता MRTP कायद्याची जागा स्पर्धा अधिनियम, 2002 ने घेतली आहे.

८) **आयात शुल्कात कपात :** आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत व्हावा व देशांनी आयात–निर्यातीवरील बंधने कमी करावीत म्हणजे व्यापारमुक्त होऊन सर्वच देशांना फायदा होईल, असा या कराराचा उद्देश होता. हा करार मुख्यत्वे आयात शुल्क कमी करण्याचा करार होता. पहिल्या करारात सुमारे ४५ हजार वस्तूंवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली

९) **बाजार नियमन मुक्ती :** आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी अनेक देशांशी द्विपक्षीय करार करण्याऐवजी या बहुराष्ट्रीय एकाच कराराने मोठी सोय झाली. भारतात विदेशी तंत्रज्ञान, भांडवल आणि कंपन्या आल्या. उत्पादन वाढले, उत्पादनाचा दर्जा सुधारला, उत्पादन खर्च कमी झाला आणि त्यामुळे किमती उतरल्या. उत्पादनांचे प्रकार वाढल्याने निवड करण्यास वाव मिळू लागला.

## ८.६ सारांश

२४ जुलै १९९१ भारत सरकारनेनवीन आर्थिक सुधारणांचे धोरण अगतकीतेने स्वीकारले आणि त्यांची अंमलबजावणी केली. १९९० ला भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे संकट ओढवले. या संकटाचे परिमार्जन करण्यासाठी नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यावाचून गत्यंतर नव्हते. नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल बाजाराधिष्ठीत अर्थव्यवस्थेकडे व्हायला सुरुवात झाली. भारताने राबविलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे वाढती संगणक साक्षरता मोबिल इ.मेलचा वाढता वापर यामुळे 'इ-बिझनेस' ही संकल्पना आपल्या अर्थव्यवस्थेत रुजत आहे. भारत सरकारने नवीन आर्थिक सुधारणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा आणि परिमाण लाभले. नियोजनातील सुधारणा, राजकोषीय सुधारणा, औद्योगिक सुधारणा, बँकिंग व्यवस्थेत बदल आणि कर रचनेत बदल यासारख्या सुधारणा हाती घेण्यात आल्या. या क्षेत्रातील नियंत्रणे शिथिल करण्यावर भर देण्यात आला आणि खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. खाजगीकरणाचा हेतू सफल व्हावा यासाठी सरकारने निर्गुंतवणूकीचा मार्ग स्वीकारला. १९९१ पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था बंदिस्त होती. उदारीकरणाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था बंदिस्त होती. उदारीकरणाच्या माध्यमातून अर्थव्यवस्था मुक्त अर्थव्यवस्था करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकारी नियंत्रण कमी करने म्हणजे उदारीकरण होय.

शासकीय बंधने कमी करणे म्हणजे उदारीकरण होय. खाजगीकरण हा जागतिकीकरण गाठण्याचा मार्ग आहे. जागतिकीकरण गाठण्याचा मार्ग आहे. जागतिकीकरण ही अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलुंशी संबंधित असणारी अशी एक प्रक्रिया आहे. जागतिकीकरण म्हणजे व्यापार करण्याच्या उद्देशाने जाग जवळ येणे. जागतिकीकरण संकल्पनेमध्ये विविध देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांशी जोडल्या जातात. जागतिकीकरणामध्ये उत्पादनांचे वितरण सोबतच विविध अर्थव्यवस्थांचे कर रचना आयात शुल्क विक्री व्यापार संघटन व सेवा यांचाही समावेश होतो. जागतिकीकरणामध्ये बहुराष्ट्रीय संपण्य आंतरराष्ट्रीय भांडवल पुरविणाऱ्या संस्था आणि जागतिक व्यापार संघटना यांचा विचार करावा लागतो. जागतिकीकरणाचा सर्वात जास्त फायदा बहुराष्ट्रीय कंपन्यांना होत असतो. या कंपन्यांना उत्पादनासाठी मोठया बाजारपेठेची गरज असते. ती गरज जागतिकीकरणातून भागवली जाते. बहुराष्ट्रीय कंपन्या ह देशामध्ये सर्यारात असतात. यातून जागतिकीकरणाची संकल्पना बळकट बनते. भारत ही बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी मोठी बाजारपेठ आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिकीकरणाला गती मिळाली आहे. नवीन आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून 'खाऊजा' धोरणामुळे अर्थव्यवस्थेत सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात असे मत अनेक अर्थतज्ञांनी वर्तवले आहे. नवीन आर्थिक धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेची सांगड जागतिक अर्थकारणाशी घातली गेली.

## ८.७ सरावासाठी प्रश्न

**दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडा.**

१. भारत सरकारने नवीन आर्थिक सुधारणा कोणत्या वर्षी स्विकारल्या ?

अ. १९९१ ब.१९९७ क. २००१ ड. १८९१

२. जागतिकीकरण ही कोणत्या प्रकारची प्रक्रिया आहे.

अ. साधी ब. सुलभ क. संकीर्ण ड. स्वाभाविक

३. जागतिकीकरण म्हणजे व्यापार करण्याच्या उद्देशाने ....... जवळ येणे.

अ. जग ब. मन क. बुद्धी ड. चित्त

४. ................याचा अर्थ मालमत्ता किंवा व्यवसायाची मालकी सरकारकडून खाजगी मालकीच्या संस्थेकडे हस्तांतरित करणे

अ. राष्ट्रीयकरण ब. उदारीकरण क. खाजगीकरण ड. जागतिकीकरण

५. ................ याचा अर्थ धोरणे बनवण्याचा प्रक्रियेत आर्थिक क्रियाकलाप कमी करणे किंवा गैर शुल्क अडथळे दूर करणे या प्रकियेचा संदर्भ दिला जातो.

अ. खाजगीकरण ब. उदारीकरण क. जागतिकीकरण ड. राष्ट्रीयकरण

**सरावासाठी प्रश्न :**

१. भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणांची गरज स्पष्ट करा.

२. नवीन आर्थिक धोरणाचे यश व अपयश स्पष्ट करा.

३. जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाविषयी चर्चा करा.

४. नवीन आर्थिक सुधारणा धोरणाचे थोडक्यात मुल्यांकन करा.

## ८.८ अधिक सरावासाठी संदर्भ

१. भारताची अर्थरचना, डॉ.मुकुंद महाजन निराली प्रकाशन १९९८

२. भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, डॉ.मुकुंद महाजन निराली प्रकाशन पुणे २००७

३. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास, भाग १. प्रा. एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००३

४. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग २, एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००३

५. कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, देसाई भालेराव, निराली प्रकाशन

६. भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टिक्षेप, प्रा. डी. आर. जगन्नाथ, प्रा. सौ. निता वाणी, डॉ. मंगल जंगले, प्रा. डी. जी. पाटील प्रशांत प्रकाशन २०११

७. पायाभूत अभ्यास, प्रा. एम.एस.लिमण, प्रा. एम. जे. वाघमारे, शेठ प्रकाशन, मुंबई २००७

८. भारतीय अर्थशास्त्र, विकास व भारतीय पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, डॉ. जी. एन. झावरे, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

९. अर्थसंवाद त्रैयमासिक ऑक्टोबर २०१६. खंड ४० अंक

१०. जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, कराडे जगन, डायमंड प्रकाशन, पुणे.३०

११. जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, गायकवाड मुकुन्द, कॉन्टीनेटल प्रकाशन, विजय नगर, पुणे ३०

१२. संदर्भ लोकमत दैनिक २१ ऑगस्ट २०११

❖❖❖❖

# ९

## जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण

**घटक रचना :**


९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ नवीन आर्थिक धोरणाच्या अंतर्गत उगम पावलेल्या संकल्पना

९.३ जागतिकीकरण संकल्पना व त्याचे परिणाम

९.४ खाजगीकरण संकल्पना आणि त्याचे परिणाम

९.५ उदारीकरण संकल्पना व त्याचे परिणाम

९.६ नवीन आर्थिक धोरणाचे यश व अपयश

९.७ सारांश

९.८. सरावासाठी प्रश्न

९.९ संदर्भ पुस्तके


### ९.० उद्दिष्टये

१) जागतिकीकरण संकल्पना व त्याचे परिणाम समजून घेणे.

२) उदारीकरण संकल्पना व त्याचे परिणाम समजून घेणे.

३) खाजगीकरण संकल्पना आणि त्याचे परिणाम समजून घेणे.

४) आर्थिक धोरणाचे यश व अपयशाचे आकलन होईल.

५) नवीन आर्थिक धोरणाच्या अंतर्गत उगम पावलेल्या संकल्पना अभ्यासणे.

### ९.१ प्रस्तावना

१९९०-९१ या वर्षापासून देशात उदारीकरणाचे वारे जोराने वाहू लागले होते; पण त्यापूर्वीच जागतिक स्तरावर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्याचे व्यासपीठ होते गॅट करार.

गॅट करार (General Agreement on Tariff and Trade) १९८६ मध्ये सुरू झालेली चर्चा १९९१ पर्यंत चालली. १९९१ मध्ये 'डंकेल ड्राफ्ट' या नावाने कराराचा एक मसुदा चर्चेतील देशांपुढे ठेवला गेला. पुढील २-३ वर्षे या ड्राफ्टवर भरपूर चर्चा चालली आणि अखेरीस मोरोक्कोच्या मारकेश येथील परिषदेत १५ एप्रिल १९९४ रोजी १२५ देशांनी या करारावर सह्या करून 'जागतिक व्यापार संघटना' (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन- डब्लूटीओ) या ऐतिहासिक संस्थेची स्थापना केली. या करारांची अंमलबजावणी आणि 'डब्लूटीओ'ची सुरुवात १ जानेवारी १९९५ पासून झाली. भारत हा १९४७ च्या गॅट करारात संलग्न सभासद देश होता आणि डब्लूटीओ स्थापनेतही संस्थापक सदस्य देश आहे.

30 वर्षापूर्वी 24 जुलै 1991 ला खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाऊजा) या नव्या आर्थिक धोरणाची संसेदेत घोषणा झाली. तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थसंकल्प सदर करताना नव्या आर्थिक धोरणांची रूपरेषाही मांडली. पण, आर्थिक धोरणांची चौकट बदलण्याची प्रक्रिया त्यापूर्वी अंदाजे एक दशक आधी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना सुरु झाली.

देशात 1991 च्या आर्थिक सुधारणा या अन्वयार्थाने मोठया व अचानक, तत्कालीन वाटण्याची शक्यता आहे, पण तशा मोठया धोरणात्मक बदलाची प्राथमिक पाऊले 1980-81 ते 1984-85 या 6 व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पडलेली दिसतात. अर्थात, राष्ट्रीय योजना आयोगाच्या अध्यक्षपदी पदसिद्ध म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधीच होत्या. त्याहीपूर्वी 1970 च्या दशकात - नियंत्रित, आदेशात्मक अर्थव्यवस्था अपेक्षित फलनिष्पत्ती देत नाही व बाजार व्यवस्थेचा आधार घेण्याची गरज आहे, असा विचार मांडला जात होता. देशाचे आर्थिक धोरण ठरविणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये (प्रशासकीय अधिकारही) आर्थिक वैचारिकतेची मानसिकता, छुप्या पद्धतीचे बदलत चालली होती.

1971च्या तेल (इंधन) किमतीच्या धक्क्यामुळे व्यापार तोलाची परिस्थिती अत्यंत नाजूक झाली. त्यातून बहुतेक नेते व सल्लागार यांच्या हे लक्षात आले की अखेरीस अती मान्य करून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज घेऊन अरिष्टातून बाहेर पडण्यास पर्याय नव्हता. 1980 मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधानपदी पुन्हा रुजू झाल्या. त्या काळात देशातील काही धोरणकर्त्यांनी संभाव्य आर्थिक शक्यतांचे - दिवाळखोरीचे एक चित्र तयार केले. या धोरणकर्त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना असे पटवून दिले की अंतर्गत आर्थिक परिस्थितीने लादलेल्या मर्यादांच्या अनुषंगाने आवश्यक बदल करणे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अटी मान्य करून धोरण बदल करण्यापेक्षा अधिक श्रेयस्कर ठरेल. भारताने आर्थिक धोरणांची रूपरेखा तयार करून योग्य वेळी आंतराष्ट्रीय नाणेनिधीकडे आवश्यक त्या मदतीसाठी (bail-out) जावे, अशी भूमिका प्रभावी ठरू लागली.

त्या काळात अत्यंत अतिरिक्त वाचाळ/ आक्रमक डाव्या पक्षांचा ठोस विरोध लक्षात घेऊन (राजकीय मर्यादा) धोरणांच्या बदलांचा समावेश अत्यंत सावधगिरीने, टप्प्या टप्प्याने कार्यवाहीत आणणे गरजेचे होते. वैचारिक रचनेतील हा बदल 6 व्या पंचवार्षिक योजनेच्या विकासनीतीमध्ये मसुद्यामध्ये अत्यंत चलाखीने समाविष्ट करण्यात आला. योगायोगाने 1980 व 1991 मध्ये एकप्रकारचे सातत्य आहे. 6 व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात योजना सदस्य सचिव डॉ. मनमोहन सिंग होते. त्यांच्याच माध्यमातून अर्थमंत्री म्हणून नव्या आर्थिक धोरणांचा -विजेचा लोळ पचविला/झेलला गेला.

1980 मध्ये आर्थिक धोरणांची दिशा - राजकीयदृष्टया नकोशी - ज्या भाषेत मांडायची ती काळजीपूर्वक निवडणे आवश्यक होते, पण चिकित्सक नजरेला नव्या धोरणाचा हेतु - मोठा बदल घडविण्यासाठी नाही- हा आहे हे लक्षात येत होते. यात पहिला महत्त्वाचा घटक म्हणजे या योजनेत शासकीय कागदपत्रात सार्वजनिक क्षेत्राच्या सुधारणाविषयी चर्चा सुरु झाली. पूर्वी त्या दिशेने पाहणेही क्षम्य नव्हते. कारण, सार्वजनिक क्षेत्रांतील प्रकल्प ही अर्थव्यवस्थेची नियंत्रणात्मक शिखरे होती.

## ९.२ नवीन आर्थिक धोरणाच्या अंतर्गत उगम पावलेल्या संकल्पना

स्वातंत्र्यानंतर भारतात 'समाजवादी' हे धोरण मान्य केल्यामुळे जवळ जवळ सर्व आर्थिक क्रियांवर सरकारचे नियंत्रण वाढत गेले. १९५० ते १९८० या काळात कोणताही आर्थिक क्रिया प्रारंभ करण्यासाठी सरकारी परवाना (Licence) आवश्यक ठरवण्यात आला. यामुळे या ३० वर्षाच्या काळात भारतात 'परवाना राज' (Licence Raj) अस्तित्वात होते असे म्हटले जाते परंतु या धोरणाचे सकारात्मक परिणाम क्रमाक्रमाने कमी कमी होत गेले व स्थिरीकरण, भाववाढ, निराशावाद व असमतोल या नकारात्मक बाबींना डोके वर काढले. अर्थ व्यवस्थेची कार्यक्षमता व स्पर्धा करण्याची शक्ती क्षीण होत गेली. याचा परिणाम म्हणून उत्पादन व रोजगारवाढीचा दर वाढवण्यात अडथळे येऊ लागले. १९९१ वर्षात देशाची आर्थिक घडी बिघडलेली होती. शासकीय नियंत्रणे आणि शासकीय हस्तक्षेपामुळे भारतीय अर्थव्यवस्था कुंठीत झालेली होती. भारताचा परकीय चलनाचा साथ इतका कमी झाला होता की पंधरवाडयानंतर लागणारे परकीय चलन सुद्धा रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक नव्हते. आपल्या कडील ४७ टन सोन्याचा साथ जागतिक बँकाकडे तारण ठेवावा लागण्याची नामुष्की भारतापुढे ओढवली होती. अशा अगतिकतेच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था अनावश्यक नियंत्रणातून मुक्त ठेवले पाहिजे असे भारत सरकारला प्रकर्षाने वाटू लागले आणि १९९१ मध्ये भारत सरकारने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनेचा उगम झाला. जागतिक बँक अमेरीका आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यांच्या रेटयांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेने 'खाउजा' धोरण स्वीकारले. आणि खाजगीकरण,

उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या रुळावरून भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड सुरु झाली.



https://marathivishwakosh.org

१९८५ मध्ये पंतप्रधान म्हणून कार्यभार हाती घेतल्यानंतर राजीव गांधी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये बदल करण्याचे सूचित केले. नवीन आर्थिक धोरणाचा मुलभूत विश्वास हा काजागी क्षेत्राच्या सहभागावर होता. खाजगी क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यासाठी औद्योगिक परवाना, परकीय व्यापार, परकीय समभाग भांडवल, खाजगी क्षेत्राला योग्य औद्योगिक पर्यावरण प्राप्त व्हावे आणि भारत देशाचा आर्थिक विकास जलद गतीने व्हावा यासाठी केले गेले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कारकीर्दीत आर्थिक सुधारणांची मुहुर्त मेढ रोवली गेली असली तरी त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम दिसून आलेला नव्हता. २१ जून १९९१ रोजी पी. व्ही नरसिंहराव यांनी देशाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्याला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. देशामध्ये अंतर्गत आणि बहिर्गत आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी स्थिरीकरणात्मक आणि रचनात्मक समायोजन यांची अंमलबजावणी सुरु केली आणि नवीन आर्थिक धोरणाच्या स्वरुपात अर्थ व्यवस्थेत खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पांचा नव्याने जन्म झाला.

## ९.३ जागतिकीकरण संकल्पना आणि त्याचे परिणाम

### जागतिकीकरण संकल्पना (Concept of Globalization)

जागतिकीकरण किंवा वैश्विकीकरण (Globalization) हा अत्यंत लोकप्रिय आणि चर्चेचा विषय झाला आहे. जागतिकीकरण हे नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे सूत्र आहे. जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलाच्या हालचालीवरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करणे व त्यांचा प्रवाह सुखकर व गतिमान करण्याची प्रक्रिया होत थोडक्यात व्यापार, विस, रोजगार, तंत्रज्ञान दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होणारे रुपांतर म्हणजे जागतिकीकरण असे म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या संकल्पनेत पुढील बाबींचा समावेश होतो.

- वित्त व भांडवल ह्यांची मालकी
- बाजार व स्पर्धा

- संशोधन व ज्ञान ह्यांना संलग्न तंत्रज्ञान
- राहणीमानाचे आधुनिकीकरण संपूर्ण जागाविषयी जाणीव
- राजकीय संलग्नता
- जागतिकनियमांची क्षमता व व्यवस्थापन इ.

**व्याख्या**

जागतिकीकरण ही अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलुंशी संबंधित असणारी अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे सोपे नाही. वेगवेगळ्या अभ्यासकांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या पुढील प्रमाणे अवलंबिता वाढणे म्हणजे जागतिकीकरण होय.

१. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने जागतिकीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे "जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवलप्रवाह, अतिजलद, व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान ह्यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता ह्यांच्या साह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परवलंबित्व होय"

२. **दिपक नय्यर** यांच्या मते 'एखाद्या राष्ट्राचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारित करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय'.

३. **श्रवण कुमार सिंग** याच्या मते, 'आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामुग्रीचे व भांडवलाचे सुलभ अभिसरण निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.'

४. जागतिक बँकेच्या मते जागतिकीकरण म्हणजे 'उपभोग्य वस्तूंच्या आयातीवरील नियंत्रण समाप्त करणे'

५. **ॲन्थनी गिंडेन्स** यांच्या मते जागतिकीकरण म्हणजे 'जगातील विविध लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारंपारिक व परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय.

६. जागतिकीकरण म्हणजे व्यापार करण्याच्या उद्देशाने जग जवळ येणे.

७. अर्थव्यवस्था जोडल्या जाणे आणि अर्थव्यवस्थेची एकमेकांवर थोडक्यात जागतिकीकरणामध्ये स्थानिक अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली जाते. त्याचप्रमाणे जकातीचे दर कमी केले जातात. किंवा जकातीच किंवा जकातीच कडून टाकल्या जातात. जगामध्ये कोठेही माल पाठविण्यासाठीची नियंत्रणे कमी केली जातात. किंवा जकातीच काढून टाकल्या जातात. जगामध्ये कोठेही माल पाठविण्यासाठीची नियंत्रणे कमी केली जातात. आणि कोटा (quotan) पद्धती बंद करणे इ. सर्व व्यापारी निबंध कमी केले जातात किंवा काढून टाकले जातात.

**जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्टये (Distinctive Characteristic of Globalization).**

१. जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती

२. उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांना चालना

३. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही विविध माध्यमाच्या द्वारे गतिमान झालेली आहे. ती माध्यमे पुढील प्रमाणे

अ. आंतरराष्ट्रीय संघटना यामध्ये उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी. ब. प्रादेशिक संघटना. उदा. आफ्रिकन राज्य संघटना, आफ्रिकन ऐक्य संघटना, युरोपियन मुक्त व्यापार संघ, सार्क इत्यादी. क. बहूराष्ट्रीय महामंडळे उदा. पॉडस, यनिलिव्हर, पेप्सी, कोको कोला इ. बिगरशासकीय संघटना उदा. अग्नेस्टी इंटरनॅशनल, रेडक्रॉस, स्काऊटस ॲड गाईडस ई. जनसंप्रेषण. उदा. मासिके, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट, इस्टाग्राम, फेसबुक इ.

४. विकसित राष्ट्राचे प्रभुत्व

५. गतिशिलतेत वाढ

६. आमूलाग्र बदलाची प्रक्रिया

**जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम (Impact of Globalization on Economy) :**

संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे हे जागतिककरणाचे पहिले वैशिष्टय आहे. भारताने जागतिकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे जागतिकीकरणाच्या नियमांचे पालन करावे लागते. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर भारत सरकारने त्याप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेत बदल केले. आयातीवरील संख्यात्मक निर्बंध दूर करण्याची अट जागतिकरणाच्या धोरणात समाविष्ट असल्यामुळे भारताने १९९१ पासून आयातीवरील निर्बंध कमी करण्यास प्रारंभ केला. १७६३ वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध उठविण्यात येऊन या वस्तूची आयात खुली करण्यात आली त्याचप्रमाणे परकिय भांडवलात बहूराष्ट्रीय कंपन्यांना प्रवेश देण्यात आला. शेती अनुदानावरील कपात करण्यात आली त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेतवर व अर्थ व्यवस्थेतील विविध क्षेत्रावर जागतिकरणाचे विविध परिणाम झालेले दिसून येतात. त्यापैकी काही सकारात्मक महत्वाच्या परिणामांची चर्चा करूया.

**१) आयात शुल्कात कपात :**

भारताने आयातीवरील प्रशुल्क कमी करावे, उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर घातलेली नियंत्रणे हटवावीत, नकारात्मक निर्बंध दूर करावेत इत्यादीबाबत जागतिक व्यापार संघटना (WTO) भारतावर दडपण आणीत आहे. परिणामी भारताने प्रामाणिकपणे करारातील अटींचे पालन करून सीमाशुल्क दरवर्षी घटवित नेले. यामुळे भारतीय उद्योगांना विदेशी मालाशी स्पर्धा करावी लागली.

**२) विदेशी भांडवलाची गुंतवणूक :**

जागतिकीकरणामुळे व उदारीकरणामुळे देशात मोठया प्रमाणावर विदेशी गुंतवणूक होऊ लागली. पायाभूत उद्योगामध्येही अशा प्रकारच्या गुंतवणुकीचा प्रभाव दिसू लागला. त्यामुळे देशातील साधन सामुग्रीचा पर्याप्त उपयोग होऊ लागला व रोजगाराच्याही अनेक संधी उपलब्ध होत आहेत.

**३) भांडवल बाजारामध्ये गुंतवणूक :**

परकीय गुंतवणुकीवर असेलेल निर्बंध कमी करण्यात आल्याने परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतातील भांडवल बाजारात मोठया गुंतवणूक केली. सन २००३-०४ या एकाचा वर्षात ४४,८०० कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक भारतीय भांडवल बाजारात झाली.

**४) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व :**

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात प्रवेश करण्याची मुक्त संधी मिळाली. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांशी मोठया प्रमाणावर देशात शिरकाव केला. सन २००३ मध्ये भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या १४९७ होती. ती सन २००४ मध्ये १६५४ इतकी झाली. त्यावेळी विदेशी भांडवल गुंतवणुकीमध्ये वाढ होऊन औद्योगीक क्षेत्राचा विस्तार घडून आला.

**५) टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ :**

विदेशी गुंतवणुकीचा ओघ देशात आला व मोठया प्रमाणावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांचे उत्पादन देशात सुरु केल्याने मोठया प्रमाणावर स्पर्धा सुरु झाली त्यामुळे टिकाऊ व उपभोग्य अशा वस्तूच्या उत्पादनात वाढ झाली. जागतिकीकरणापूर्वी ज्या उद्योगांची देशात मक्तेदारी होती ती जागतिकीकरणानंतर संपुष्टात आली.

**६) पर्यटनात वाढ :**

लोकांच्या वाढत्या उत्पन्नामुळे व सरकारच्या उदार धोरणामुळे पर्यटन उद्योगाला तेजी आलेली आहे. यामुळे वाहतूक व दळणवळण तसेच आतिथ्यशील उद्योग वाढत आहेत. यामुळे सरकारला उत्पन्नाचा महत्वपूर्ण स्त्रोत प्राप्त झाला आहे.

**७) सरकारी महसूल वाढ :**

बहुराष्ट्रीय कंपन्या (MNC) ज्या देशात येतात. त्याच देशात उत्पादन करीत असल्याने त्या देशातील लोकांना रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध होतात. त्याचप्रमाणे स्नाबाधित देशाला कर रूपाने मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळते.

**८) विविध क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी :**

जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे देशात मोठया प्रमाणावर कामगारांची संख्या वाढली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे देशात मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण झाला आहे. त्यापैकी काही रोजगाराच्या संधीची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल

**अ) जाहिरात क्षेत्रातील रोजगाराच्या संधी :**

जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे जाहिरातीला खूप मोठया प्रमाणावर महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादनाची जाहिरात करण्यासाठी व कंपनीचे नावलौकिक करण्यासाठी कंपन्यांना प्रभावी जाहिरातीची गरज असते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये जाहिरात करणाऱ्या संस्था व जाहिरात संस्थेत डिझायनर कॉपीराईटर आर्टिस्ट

इ. जागेसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. जाहिरात प्रसारमाध्यमेही मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती करतात.

**ब) माहिती व तंत्रज्ञान क्रांती :** जागतिकीकरणामुळे संगणक व सॉफ्टवेअर क्षेत्रात क्रांती झाली. आज भारतीय इंजिनिअरांना विदेशात मोठया प्रमाणता मागणी निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाच्या संगणकाच्या या युगामध्ये व्यवसायाची प्रक्रिया व्यवस्थित व त्वरित होण्यासाठी ई-मेल, इंटरनेटचा उपयोग, ई-कॉमर्स इ. उपयोग मोठया प्रमाणावर केला जातो. देशातील बहुतेक तरुण वर्ग या माहिती तंत्रज्ञानाकडे आकर्षित होत आहे. लहान वयात मोठी-मोठी पॅकेजेस तरुणांना भूलवत आहेत. बिझनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग (Business Process Ooutsourcing), कॉल सेंटर्स किंवा माहिती तंत्रज्ञान अंतर्गत येणाऱ्या बँका, विमा कंपन्या व आरोग्य सेवा इ. क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध आहे.

**क) दूरसंचार :** देशाच्या अर्थव्यवस्थेत जागतिकाराणाचे वारे घुसल्यापासून दूरसंचार (Telecom) विभागाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. मोबाईल, लॅन्डलाईन आणि इतर कंपन्या पुरवित असलेल्या सर्व दूरसंचार सेवामध्ये रोजच्या रोज प्रचंड वाढ होत आहे. तांत्रिक अनुभव, व्यवस्थापकीय कौशल्य व विपणनाची माहिती इ. क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना मोठया प्रमाणावर दूरसंचार विभागात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

**ड) बँका :** बँका आणि परकीय बँका मोठया प्रमाणावर भरती करीत आहेत. २००८-०९ या वर्षात स्टेट बँक ऑफ इंडियाने सर्वात मोठी कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. जागतिकरणामुळे बँकाचा विस्तार मोठया प्रमाणावर होत आहे. अनेक परकीय बँका देशात येत आहेत. बँक मॅनेजर, प्रोफेशनरी ऑफिसर्स, बँकेतील कर्मचारी म्हणून व इतर इत्यादी जागेवर बँकेत नोकरी मिळू शकते.

**इ) विमा कंपन्या :** खाजगी क्षेत्रासाठी विमा क्षेत्र खुले करण्यात आल्याने विविध खाजगी कंपन्या व परकीय कंपन्यांनी भारतीय विमा क्षेत्रात प्रवेश केला आहे. विमा कंपन्यामध्ये विमा एजंट, डेव्हलपमेंट ऑफिसर्स, सर्व्हेयर म्हणून (Surveyory) प्रशासकीय अधिक्षक या प्रकारच्या संधी प्राप्त करून घेता येतील.

**ई) जैवतंत्रज्ञान :** जागतिकीकरणामुळे जैवतंत्रज्ञानाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. औद्योगिकरण व पर्यावरण या ज्वलंत विषयांवर समन्वय निर्माण करण्यासाठी जैवतंत्रज्ञानाची गरज आहे. यामध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ, कृषी संशोधन, पर्यावरण तंत्रज्ञान इ. पदासाठी रोजगार मिळू शकतो.

### ९) बाजारपेठांचा विस्तार :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, तंत्रज्ञान तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांनापरकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्यांची उत्पादने परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी दिल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळाली आहे परिणामी बाजारपेठा विस्तारित झाल्या.

**१०) सामाजिक व सांस्कृतिक संबंधात वाढ :**

जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहेत. परिणामी जगातील विविध लोक व राष्ट्रे यांच्यात केवळ आर्थिक सहकार्याचेच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक सहकार्याचेही संबंध वाढत चालले आहेत.

**जागतिकीकरणाच्या विषयी अनेक लोक पुढीलप्रमाणे नकारात्मक मत व्यक्त करतात.**

१) **जुन्या कार आयातीची परवानगी :** भारताने विदेशातील जुन्या कार आयातीस परवानगी दिल्याने भारतीय ऑटोमोबाईल उद्योगांवर संक्रात ओढवली आहे. भारत सरकारच्या या निर्णयात प्रसिध्द उद्योगपती श्री. राहुल बजाज यांनी 'राष्ट्रविरोधी कार्य' असे संबोधले आहे.

२) **चीनमधील वस्तूंचे डंपिग :** सध्या चीनमध्ये उत्पादन झालेल्या वस्तूंचे डपिंग भारतामध्ये कमी किंमतीमध्ये होत आहे. भारतातील कोणत्याही उत्सवाला भारतीय बाजारपेठा चीनी वस्तूंनी गजबजलेल्या दिसतात. त्यामुळे भारतीय उद्योजकांपुढे नवीन समस्या निर्माण झाली आहे.

३) **बेकारीमध्ये वाढ :** जागतिकीकरणामुळे देशात आधुनिक तंत्रज्ञान आले, संगणक आले यामुळे उत्पादनाच्या पारंपारिक पद्धती कालबाह्य ठरल्या व त्यांचा परिणाम रोजगारावर मोठया प्रमाणावर झाला. अनेक लोकांना त्यांचा रोजगार गमवावा लागला. स्पर्धेला सामोरे जाण्याचा असमर्थतेमुळे भारतीय उद्योग बंद पद्धत आहेत. त्यामुळे बेरोजगारी व दारिद्र्याची समस्या वाढून भारतात विषमता वाढत आहे.

४) **देशातील उद्योग आजारी व बंद पडणे :** जागतिक स्पर्धा व बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्याबरोबर टिकून राहणे अनेक उद्योगांना शक्य न झाल्याने ते उद्योग बंद पडले. अनेक उद्योग आजारी पडले या सर्व उद्योगातील कर्मचाऱ्यावर बेकारीची समस्या निर्माण झाली.

५) **देशातील उद्योगांची पीछेहाट :** जागतिकीकरणानंतर देशातील उद्योगांना जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागत असल्याने देशातील अनेक प्रतिष्ठित उद्योगांना सुरुवातीला अतित्व टिकवून ठेवणे अशक्य झाले म्हणून भारतीय कंपन्यांची त्याच्न्ह्या नियंत्रणाखाली असलेल्या उद्योगाची विक्री केली. उदा. टाटा ऑईल मिल्स, पार्ले, सॉफ्ट डिंक्स, मॉडर्न फुड्स, रेमन्ड, स्टील इ. देशातील बाजारपेठांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र स्पर्धांमुळे अनेक उद्योगाची पीछेहाट झाली.

६) **जुन्या कार आयातीची परवानगी :** भारताने विदेशातील जुन्या कार आयातीस परवानगी दिल्याने भारतीय ऑटोमोबाईल उद्योगांवर संक्रात ओढवली आहे. भारत सरकारच्या या निर्णयात प्रसिध्द उद्योगपती श्री. राहुल बजाज यांनी 'राष्ट्रविरोधी कार्य' असे संबोधले आहे.

७) **देशी बाजारपेठेवरील विपरीत परिणाम :** जागतिकीकरण आणि उदारीकरण यामुळे भारतीय बाजारात आयात वस्तूंचा पुर ओसंडून वाहत आहे. त्यामुळे देशी वस्तूंच्या विक्रीत घट होत आहे.

८) **कंत्राटी पद्धतीच्या कामगारांमध्ये वाढ (Growth of Contractual Labour) :** भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण झाल्यामुळे रोजगाराचा कल हाकाटी पद्धतीच्या कामगारांची निवड करण्याकडे झुकत चालेला दिसून येत आहे. याचे कारण ही तितकेच स्पष्ट आहे. प्रचंड प्रमाणात श्रमशक्ती उपलब्ध आहे. कंत्राटी कामगारांची नेमणूक कंत्राटाचे म्हणजेच कराराचे काम पूर्ण होईपर्यंत असते. कंत्राट पूर्ण झाल्यानंतर या कामगारांना कामावरून कमी केले जाते कमी खर्चात काम पूर्ण होते. कारण भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, आजारासाठी रजा इत्यादी. कंत्राटी किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या कामगारांना लागू होत नाही. त्याप्रमाणे भारतामध्ये अशा कामगारांची संख्या प्रचंड असल्याने त्वरित उपलब्धता होत असल्याने मालक वर्ग हा कृषी उत्पादन वाहतूक व संपर्क बँका वित्तीयसंस्था आणि शैक्षणिक संस्था इ. क्षेत्रात कंत्राटी कामगार नेमणुकीचे स्वागत करतो.

९) **विकसित राष्ट्राचे वर्चस्व :** जागतिकीकरणामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत शिरकाव केलेला आहे. अमेरिकेतील कारगिल कॉन्टिनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील मोठया कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातला ८० टक्के धान्य बाजार आहे. या कंपन्या आर्थिक ताकदीच्या बळावर संपूर्ण जगावर वर्चस्व प्रस्थापित करू शकतात. बहुराष्ट्रीय कंपन्या माल विकसित देशात तयार करतात आणि त्याची निर्यात विकसनशीलदेशात करतात. त्यामुळे विकसनशील देशामध्ये रोजगार निर्मितीच होत नाही. बहुसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या विकसित राष्ट्रांच्याच आहेत. चायना जगाचं प्रोडक्शन हाऊस आहे आणि इंडिया बँक ऑफिस. जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे दोन देश जगातल्या श्रीमंत लोकांनी आपल्या सेवेला जुंपून घेतलेय.

१०) **अकुशल कामगारांची बेकारी :** व्यापाराचे उदारीकरण झाल्याने स्थानिक बाजारपेठेतील मालापेक्षा जागतिक मालाला मोठया प्रमाणावर मागणी येते. पर्यायाने स्थानिक कंपन्या बंद कराव्या लागतात त्यामुळे अनेक कामगार बेरोजगार होतात.

११) **मानवी जीवनाचे बाजारीकरण :** साधारणपणे ९० च्या दशकात जागतिकीकरणाने संपूर्ण जगावर आपली पावले रोवायला सुरुवात केली आणि त्यानंतर आलेल्या नवभांडवलशाहीमुळे झपाटयाने जगभरातील देशांमध्ये आणि पर्यायाने भारतात अर्थव्यवस्था सामाजिक सांस्कृतिक व्यवस्था लोकांची जीवनशैली आणि त्यांची जीवनमुल्ये तसेच जीवनाच्या सर्वच पैलूमध्ये आमूलाग्र बदल झाला. माणसाच्या जगण्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनातही संपूर्ण बदल झाला. पैसा हाच मानवी जीवनाचे केंद्रस्थान बनला आणि साधनांचा विधिनिषेध न बाळगता जास्तीतजास्त धन कमावणे, धनसंचय करणे आणि धनसंपत्तीचे अवाजवी गलिच्छ प्रदर्शन करणे पैशाच्या जोरावर सामाजिक प्रतिष्ठा सत्ता प्राप्त करणे हाच माणसाच्या जगण्याचा फंडा बनला. एकंदरीत मानवी जगण्याचेच बाजारीकरण आणि वस्तूकरण होण्याचा भयंकर काळात माणसामाणसांतील संबंधामध्ये देखील उपयुक्तता हे मूल्य प्रभावी ठरू लागले.

१२) **नवसाहतवाद जन्मण्याची शक्यता :** साधारणतः जागतिकीकरणाच्या पहिल्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उपलब्ध शेतजमीन पर्यायी उपयोगांकडे

वाढविण्यात आल्या. भारतीय संसदेने विशेष आर्थिक क्षेत्राचा (SEZ) कायदा २००५ मध्येच मंजूर केला. जागतिकीकरणाच्या काळात सेझ देण्यात आले, करार शेती, निगम शेती अशा विविध रूपांनी बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशांच्या ग्रामीण क्षेत्रात स्वार्थासाठी प्रवेश करीत आहेत. देशात ज्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध आहेत, अशा ठिकाणीच उद्योगाचे केंद्रिकरण झाल्याने ग्रामीण भाग पूर्वीप्रमाणे आजही मागासलेलाच राहिलेला आहे. पूर्वी आपल्यासाठी शेती ही काळी माय होती. आज ती व्यापारी फायद्याचे व झटपट जमीन विकून श्रीमंत होण्याचे साधन झाली आहे. उद्या मात्र मोठया कंपन्यांसाठी ती शोषणाचे साधन झालेली असेल. रस काढून उसाचे चिपाड फेकून द्यावे तशी सुपीक जमिनीची अवस्था होईल हे नुकसान दीर्घ काळापर्यंत भरून न निघणारे असेल. परिणाम : जमिनीची मालकी जाण्यासोबत तीचा कस जाण्याचीही शक्यता आहे तसेच यातून नववसाहतवाद जन्मण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१३) **पर्यावरणाची समस्या :** जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळवण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा स्वैरपणे वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याऐवजी जल, जमीन व ध्वनी यांचे प्रदूषण वाढवीत आहेत. शेतजमिनीवर नत्रांचा, कीटकनाशकांचा मारा, पाणथळांच्या जागांवर कब्जा, समुद्रातून मासे काढण्यासाठी वापरले जाणारे अनैसर्गिक तंत्र, औद्योगिक ऊर्जाप्रकल्पांचा विकासाच्या नावावर होणारा जैवविविधतेचा विध्वंस या साऱ्या गोष्टी पर्यावरणाचे आरोग्य बिघडवणाऱ्या आहेत.

## ९.४ खाजगीकरण संकल्पना आणि त्याचे परिणाम

### अ. खाजगीकरण संकल्पना :

भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी १९९१ रोजी जे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्या धोरणातील एक महत्वाची संकल्पना म्हणजे ;खाजगीकरण' होय. स्वातंत्र प्राप्तीनंतर आपल्या भारत देशाचा जलद विकास साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीअकर करण्यात आला होता. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाबरोबरच खाजगी उद्योगाची उभारणी करण्यासाठी शासनाने विकासात्मक धोरण आखले. महत्वाचे उद्योग व मुलभूत उद्योग (लोखंड पोलाद उद्योग, वीजनिर्मिती उद्योग, पोष्ट, दुरध्वनी, तारसेवा, सिमेंट उद्योग, वाहतूक दळणवळण सेवा) सार्वजनिक क्षेत्रात ठेवण्यात आले व कमी महत्वाचे उद्योग खाजगी क्षेत्राकडे ठेवण्यात आले. कालांतराने म्हणजे १९४७ ते १९९० या काळापर्यंत या क्षेत्रातील अकार्यक्षमता व भ्रष्टाचार यात वाढ झाली. कामगिरी निराशाजनक ठरली. सार्वजनिक क्षेत्र तोटयात जाऊ लागले त्यामुळे भारत सरकारला सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्यासाठी विशेष योजना आखणे जरुरीचे वाटले आणि त्यानुसार सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खुले करण्याचे धोरण सरकारने अमलात आणले. तोटयात चालणारे कारखाने कार्यालये यांचे निर्गुतवणुकीकरण करून ते खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्यात आले या प्रक्रियेला खाजगीकरण असे म्हणतात. म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकांची मालकी

त्यांचे व्यवस्थापन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया यांचा समावेश खाजगीकरण या संकल्पनेत होतो. खाजगीकरण हा जागतिकीकरण गाठण्याचा मार्ग आहे. खाजगीकरण ही राष्ट्रीयकारणाच्या विरुद्ध संकल्पना आहे. १९९१ नंतर भारतीय अर्थ व्यवस्थेने खाजगीकरण सुरुवात केली असली तरी ती १७७६ मध्ये अडॅम स्मिथने प्रकाशित केलेल्या 'राष्ट्राची संपत्ती' (Wealth of Nation) या ग्रंथाएवढी प्राचीन आहे. या ग्रानतात अडॅम स्मिथ यांनी निर्हस्तक्षेप नीतीचा उल्लेख केलेला आहे. खाजगीकरणाचा हेतु सफल व्हावा यासाठी सरकारने निर्गुंतवणूकीचा मार्ग स्वीकारला. १९९१ पासून जरी सार्वजनिक उद्योगांचे हस्तांतरण खाजगी क्षेत्राकडे करण्यावर भर दिला. शासनाने खाजगीकरण करण्यसाठी निर्गुतवणूक करण्याचा मार्ग अवलंबला आहे. यासाठी १९९६ मध्ये रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली तीन वर्षासाठी निर्गुतवणूक आयोग स्थापन करण्यात आला होता. सध्या निर्गुतवणूकीचे काम वित्त मंत्रालयांतर्गत निर्गुतवणूक विभागाकडे आहे. २०२१ च्या सादर झालेल्या अर्थ संकल्पात केंद्र सरकारने खाजगीकरणावर भर दिला आहे. उद्योग आणि वित्तीय संस्थामधून सरकारची उपस्थिती कमी करून खाजगी क्षेत्राचा जागा करून देणं हा त्यामागचा उद्देश आहे. सरकारने धोरणात्मक आणि बिगर धोरणात्मक असं वर्गीकरण केलं आहे. धोरणात्मक क्षेत्रात सार्वजनिक उद्योगात सरकारची किमान उपस्थिती असेल तर याच क्षेत्रातील इतर सार्वजनिक युनिटसचं विलीगीकरण व विक्री किंवा बंद केलं जाईल, तर बिगर धोरणात्मक क्षेत्रातील उद्योग विकले जातील किंवा बंद होतील (संदर्भ महाराष्ट्र टाईम्स दैनिक २५ मार्च २०२१).

**खाजगीकरणाच्या व्याख्या :**

१. पीटर ड्रकर या व्यवस्थापन शास्त्रज्ञाच्या मते खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांतील शासकीय भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय.

२. डी. आर पेंडसे यांच्या मते 'खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय'.

३. डेव्हीड हेरॉल्ट : खाजगीकरण म्हणजे 'साधनसामुग्रीच्या उपयोगासाठी बाजारविरहित पद्धतीऐवजी बाजाराधिष्ठीत पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया'.

४. बार्बरा ली व जॉन निलिस : खाजगीकरण म्हणजे 'सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात खाजगी व्यक्तींना सहभागी करून घेण्याची प्रक्रिया होय'. यामध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या ताब्यात तो उपक्रम देण्यात येतो. त्याच प्रमाणे हे संपादन व्यवस्थापन करार. भाडेपट्टीने चालविण्यास देणे किंवा मताधिकार पद्धतीने चालविण्यास देणे या पद्धतीने होते.

**खाजगीकरणाच्या पद्धती**

**१. मालकी हक्कासंबधी खाजगीकरण :** या पद्धतीमध्ये सार्वजनिक उद्योगाची मालकी पूर्णतः किंवा खाजगी उद्योगांकडे हस्तांतरीत केली जाते. त्याचे छार प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

**अ. संपूर्ण अराष्ट्रीयकरण (Total De-nationallisation) :** या पद्धतीमध्ये सार्वजनिक क्षेत्राची मालकी पूर्णतः खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत होते.

**ब. संयुक्त मालकी (Joint Venture) :** या पद्धतीत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात खाजगी क्षेत्राचा अंशतः सहभाग घेतला जातो अर्थात उद्योगातील्ब खाजगी क्षेत्राचा वाटा किती असावा हे सरकारी धोरणावर अवलंबून असते. यातील महत्वाचा उद्देश असा असतो की काही प्रमाणात खाजगी माहिती दिल्यामुळे उद्योग व्यावसायिक पद्धतीने चालविण्यात व कार्यक्षमता वाढविणे शक्य होते.

**क. विसर्जन (Liquidation) :** याचा अर्थ सार्वजनिक मालमत्ता खाजगी क्षेत्रातील व्यक्तीना अगर संस्थेला विकणे जो तीचा वापर त्याच उद्देशासाठी करण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतो.

**ड. संपूर्ण व्यवस्थापन खरेदी (Total Managemaent Buy- Out) :** या पद्धतीत उद्योगाचे भागभांडवल खाजगी व्यक्तीला किंवा कंपनीला न विकता त्याच उद्योगातील कामगारांना विकण्यात येते यामध्ये उद्योगाची मालकी व्यवस्थापनासह कामगारांकडे हस्तांतरित होते. या पद्धतीत कामगारांना वेतन आणि लाभांश असा दुहेरी लाभ मिळतो. त्यामुळे कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते.

भारतात नवीन आर्थिक धोरणानुसार खाजगीकरणासाठी खालील उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

**खाजगीकरणासाठी उपाय योजना :**

**१. काही उद्योगांचे अनारक्षण (Dereservation Policy) :** खाजगीकरणात सरकारी क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करण्यात आली. सांप्रत काळात ३ उद्योग वगळता इतर सर्व उद्योग वगळता इतर सर्व उद्योग अनारक्षित करून त्यांना खाजगी क्षेत्रातील मुक्त करण्यात आले आहे.

**२. उद्योग व वित्त पुनर्रचना मंडळाची स्थापना (Establishment of Board of Industrial and Financial Reconstruction) :** सार्वजनिक क्षेत्रातील आजरी उद्योगाबाबत धोरण निश्चित करण्यामध्ये या उद्योग व वित्त पुनर्रचना मंडळाची भूमिका महत्वाची आहे. जर आजरी उद्योग पुन्हा कार्यक्षम करण्याच्या अवस्थेत नसेल ते बंद करण्याचा किंवा त्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार या मंडळाला आहे.

**३. राष्ट्रीय नुतनीकरण मंडळाची निर्मिती (National Renewal Board) :** तोटयात चालणारे सार्वजनिक उद्योग जेव्हा बंद केले जातात तेव्हा त्यात काम करणारे कामगार बेकार होतात. जे कामगार ऐच्छिक निवृत्ती पत्करतात त्यांना मंडळ भरपाई देते.

**४. नवरत्नांचा दर्जा (Navaratana Status):** उद्योगाचे धोरणात्मक महत्व व त्यांचे अर्थव्यवस्थेतील कार्य लक्षात घेऊन ९ उद्योग निवडण्यात आले आहेत. ज्यांना नवरत्नाचा दर्जा देण्यात आला. जागतिक स्तरावरील विशाल उद्योग बनविण्यासाठी अशा उद्योगांना

पूर्ण वित्तीय व व्यवस्थापकीय स्वातंत्र देण्यात आले आहे. नवरत्नांचा दर्जा प्राप्त झालेले उद्योग म्हणजे. १. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (IOC) २. ऑईल अॅन्ड नेचरल गॅस कॉर्पोरेशन (ONGC) ३. हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (HPCL) ४. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) ५. इंडियन पेट्रो केमिकल लिमिटेड ६. विदेश संचार निगम लिमिटेड (VSNL) ७. भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड (BHEL) ८. स्टिल अॅथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (SAIL) ९. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन हे होत (NTPC).

**५. निर्गुतवणूक (Disinvestment) :** खाजगी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी स्वीकारलेला महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे निर्गुतवणूक होय. यासाठी सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे भागभांडवल व्यक्ती खाजगी प्रमंडळे (Private Coorporate Bodies) व वित्तीय संस्थांना विकण्याचे ठरवले भारतात निर्गुतवणूकीला राजकोषीय गरज म्हणून विचारात घेतले जाते. याचाच अर्थ राजकोषीय तूट (Fiscal Deficit) कमी करण्याबाबत निर्गुतवणूकीतून आवश्यक पैसा उभारला जातो. सन १९९१ पासून सन २००३ पर्यंत अनेक उद्योगांचे निर्गुतवणूकीतून (Disinvestment) भारत सरकारने केले. सन २००३-२००४ हया वर्षात सरकारने एकूण ७ सरकारी उद्योगाच्या (मारुती उद्योग लि. (MUL), सी. एम. सी. (CMC), डेजिंग कॉर्पोरेशन गॅस अॅथोरिटी लि. (G.A.I.L), आय.बी.पी. (L.B.P.), आय.पी.सी.एन्. जी.सी. (O.N.G.C.) समभाग भांडवलाचे निर्गुतवणूकीकरण करण्याचे ठरविले .

### ९.२.६ खाजगीकरण परिणाम

१९९१ पासून खाजगीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात आलेल्या निर्गुतवणूक प्रक्रियेमुळे देशातील उद्योगांवर त्याचप्रमाणे अर्थकारणावर जे परिणाम घडून आले त्यापैकी काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे आहेत.

**अ. खाजगीकरण सकारात्मक परिणाम :**

१. **उत्पादकता आणि कार्यक्षमता यामध्ये सुधार (Improve productivity and efficienc) :** खाजगीकरणाच्या प्रक्रियेत एटंरप्राइझमधून लाल फिती आणि आरामदायक प्रवृत्ती असेलेली नोकरशाही पासून मुक्तता मिळते म्हणून साप्रंत काळात खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्रातील उद्योग व्यवसाय अधिक उत्पादनशील आणि कार्यक्षम दिसत आहेत.

२. **व्यवस्थापन सुधारणा (Improvement in Managemaent) :** खाजगी क्षेत्रातील उद्योगाचे व्यवस्थापन सक्षम असल्यामुळे या उद्योगाचा नफ्याचा आलेख चढता राहिला आहे. सार्वजनिक उद्योगापेक्षा खाजगी उद्योग कार्यक्षम पद्धतीने चालतात ते केवळ व्यवस्थापनात सुधारणा झाल्यामुळे.

३. **स्पर्धा शक्तीत वाढ (Fostering Competition) :** नव्या आर्थिक धोरण राबविण्यापूर्वी भारतात स्पर्धा नसल्यामुळे अर्थव्यवस्था बंदिस्त होती. १९९१ नंतर खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे अर्थव्यवस्था बाजाराधिष्टीत झाली. उद्योजकांमध्ये महत्तम नफा कमाविण्यासाठी स्पर्धा वाढली. खाजगीकरणामुळे सार्वजनिक

उपक्रमांसाठी स्पर्धेची परिस्थिती निर्माण होते आणि त्यांना त्यांची कार्यक्षमता सुधारण्यास भाग पाडले जाते. उत्पादनाचा दर्जा सुधारतो.

४. **अतिरीक्त कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्यात यश (Reduce Fiscal Burden) :** कोणत्याही उद्योगाला अनुत्पादक कर्मचाऱ्यांचा भार पेलता येत नाही. हे अतिरिक्त कर्मचारी कमी करणे खाजगीकरणामुळे शक्य झाले. उदाहरणार्थ इंडिगो, गो एअर, स्पाइसजेट, एअरइंडिया एक्सप्रेस, विस्तारा एअरलाईन्स, एअर एसिया इंडिया या कंपन्यामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या गरजेपुरती ठेवल्याने या कंपन्यांच्या नफ्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे याउलट सरकारची मालकी असलेल्या 'एअर इंडिया' ही सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सेवा देणारी देशातील एकमेव कंपनी आहे. कंपनीकडे १३००० कर्मचारी आहेत. तसेच १२१ विमानांचा ताफा आहे. परंतु या कंपनीवर ८० हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे.

५. **उद्योग क्षेत्रात सकारात्मक बदल (Positive Changes in the Industry) :** १९९१ पूर्वी उद्योग सुरु करण्यासाठी लायसन्स किंवा परवान्याची गरज असे. तो मिळविण्यासाठी उद्योग निरीक्षकाकडे उद्योजकाला दहा खेटे घालावे लागत असे. Ease of doing business याची परिभाषा उद्योग निरीक्षकास माहीत नव्हती. उद्योग हे केवळ सरकारी संस्थांनीच करायचे खाजगी गुंतवणूकदारांना उद्योजकांना अनेक उद्योग निषिद्ध होते. काही उत्पादने ही केवळ लघु उद्योगांसाठी राखीव होती. उत्पादनाची किंमत ठरवायची मुभा देखील अनेकदा उद्योजकांना नसे. १९९१ मध्ये नवे औद्योगिक धोरण जाहीर झाले आणि यामध्ये आमुलाग्र बदल झाला. अनेक निर्बंध हटविले गेले. इन्स्पेक्टर राज' मधून मालकांची सुटका झाली. उद्योग परवाना न घेताही अनेक उद्योग सुरु करण्याची मुभा मिळाली.

६. **बँकिंग क्षेत्रातील सुधारणा (Improvement in Bank Sector):** १९९१ नंतर खाजगीकरणाच्या प्रक्रियेला अर्थव्यवस्थेत वेग आला. स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये इतर स्टेट बँकांचे विलीनीकरण करण्यात आले तसेच राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या कमी करण्यात आली. बँकांचे विलीनीकरण झाल्याने अनुत्पादित खर्चात आणि अनुत्पादित कर्जत कमी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे बँकांमधील कम्युनिस्ट प्रणित कामगार संघटनांच्या विरोधाला न जुमानता सरकारने बँकांचे विलीनीकरण केले.

७. **करातील सुधारणा (Tax Reform) : एक देश :** एक कर या तत्वानुसार जुलै २०१७ पासून जीएसटी ची अंमलबजावणी करण्यात आली. पेट्रोलियम उत्पादने दारू असे काही अपवाद वगळता सर्व वस्तू आणि सेवा चार दरात विभागण्यात आल्या असून त्यात सुसुत्रता आणण्यात आली आहे. त्यामुळे कर संकलनात वाढ होऊन आता दर महिन्याला १ लाख कोटीहून अधिक कर संकलन होत आहे. अर्थ मंत्रालयातून दिनांक जुलै २०२१ रोजी जीएसटी ची आकडेवारी जाहीर करण्यात आली. त्यानुसार जुलै महिन्यात जीएसटी ची मधून ११६३९३ कोटीचा महसूल मिळाला आहे.

८. **विमा क्षेत्रातील सुधारणा (Reform in Insurance Sector) :** १९९१ च्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून भारतात खाजगी विम्या कंपन्यांची संख्या वाढत

आहे. भारत सरकारने १९९३ मध्ये रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिने आपल्या अहवालात दोन प्रमुख शिफारशी केल्या

i) खाजगी कंपन्याना भारतात विमा व्यवसायात प्रवेश द्यावा.

ii) भारतीय विमा विनियामक आणि विकास प्राधिकरण (IRDA) या संस्थेची स्थापना करावी.

परिणामी ऑगस्ट २००० मध्ये 'आयआरडी'ने विमा क्षेत्र खाजगी व्यवसायासाठी खुले केले तसेच विमा कंपन्यात 26 टक्क्यांपेक्षा विदेशी गुंतवणूक करण्यास परवानगी दिली. जून २०१७ अखेरीस भारतात एकूण ५३ विमा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या आहेत. त्यापैकी २४ जीवन विमा तर २९ सामान्य जीवनेतर विमा व्यवसाय करीत आहेत, जीवन विमा व्यवसायात आयुर्विमा महामंडळ हे सार्वजनिक क्षेत्रात आहे तर अन्य सर्व २३ कंपन्या खाजगी क्षेत्रात आहेत. या कंपन्यांचा फायदा खाजगी विमा कंपन्यांना व जनतेला होत आहे. खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे विमा कंपन्यांमधील विदेशी गुंतवणूकीच्या मर्यादा वाढवून ७४ टक्के करण्यात आली आहे. सरकारी स्वामित्वाच्या साधारण विमा कॉर्पोरेशन (GIC) आणि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी यांची शेअर बाजारात नोंदणी करण्यात आली. संदर्भ महाराष्ट्र टाईम्स दैनिक दिनांक २१.८.२०१७

९. **खाजगी प्रक्षेपणावरचे निर्बंध हटवले (Interference on private broadcasts Removed) :** आज 'ओटीटी'चा जमाना आहे. सगळं जग मोबाईलमध्ये आहे. दूरदर्शनवर दिसणारी चैनल्स आपण मोबाइलवर पहू शकतो. ८०० च्या आसपास सतत चॅनल सर्फ करण्याची सवय आहे. त्या तरुणांना सांगूनही पटणार नाही की १९९१ पर्यंत आपल्याकडे केवळ एक टीव्ही चॅनल होतं, दूरदर्शन. १९८२ मध्ये भारतात रंगीत दूरदर्शन आलेला होता, पण माध्यमांच्या प्रसारणावर बंधने होती. वृत्तपत्रं ही खाजगी व्यावसायिकांची असली तरीही 'आकाशवाणी' हा सरकारी रेडीओ आणि एकमेव टीव्ही चॅनल 'दूरदर्शन' हेही सरकारी, अशीच स्थिती होती. सॅटेलाईट तंत्रज्ञान आणि परिणामी केवल टिव्ही नेटवर्कची परिमाणं जगभरात बदलत होती. हे तंत्रज्ञान भारतापर्यंतही येऊन पोहोचलं होतं, पण लायसन्स राजची अनेक बंधनं होती. भारताचे अनेक निर्माते, पत्रकार हे दूरदर्शनवर स्वतः चे कार्यक्रम करत होते, पण त्यांच्या डोळ्यात स्वतःच्या स्वतंत्र चॅनची स्वप्नं होती. या निर्बंधांना १९९१ च्या आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून खाजगीकरनाने सुरुंग लावला. याचा पहिला प्रत्यय आला तो १९९१ च्या पहिल्या आखाती युद्धाच 'सीएनएन' चं प्रक्षेपण भारतात केवल टीव्हीवरून अनेकांच्या घरात पोहचलं. परदेशी वाहिन्यांच्या सॅटेलाईट प्रक्षेपणाला भारतात केवल टीव्ही द्वारे दारं मोकळी झाली.

१०. **जबाबदारीचे व उत्तरदायित्वाचे निर्धारण (Determination of Responsibility and Accountability) :** सार्वजनिक उद्योगातील कर्मचारी होणाऱ्या तोट्याला जबाबदार नसतो याउलट खाजगी क्षेत्रामध्ये जबाबदाऱ्या

काटेकोरपणे निश्चित केलेल्या असतात. त्यामुळे त्या निर्धारित वेळेत (Span of Time) पूर्ण न केल्यास संबंधित कर्मचाऱ्याला जबाबदार धरले जाते.

११. **खाजगी उद्योगांना भांडवल बाजाराची शिस्त (Capital Market Discipline for Private Enterprizes) :** खाजगीकरणाच्या प्रक्रियेत खाजगी उद्योगांना भांडवली बाजाराची एक शिस्त असते त्याच छाननी वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञाकडून केली जाते.

१२. **राजकीय हस्तक्षेपाला बाब नाही (Reducing in Political Interferences) :** खाजगीकरणाची प्रक्रिया सार्वजनिक उपक्रमांच्या व्यवस्थापनात खाजगी क्षेत्राला अधिक प्रतिनिधित्व देऊन सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील हस्तक्षेप कमी करते. जेव्हा सार्वजनिक सेवेचे खाजगीकरण केले जाते तेव्हा ती राजकीय प्रभावापासून मुक्त होऊ शकते. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाला राजकीय हस्तक्षेप मोठया प्रमाणात झाल्यामुळे त्याचा उत्पादकता आणि लाभदायकता यावर परिणाम होतो. याउलट खाजगी क्षेत्रामध्ये राजकीय हस्तक्षेपाचा पूर्ण अभाव असतो.

१३. **काटेकोर नियोजन (Strict Planning) :** अनेक सार्वजनिक उद्योग दीर्घमुदत नियोजनाच्या बाबतीत अपयशी ठरतात. त्यामुळे निर्णय प्रक्रियेला उशिरा होतो. तसेच नवीन येणारी राजकीय सत्ता पूर्वीच्या निर्णयात सारखा बदल करत असते. अशा प्रकारची स्थिती खाजगी उद्योगात अस्तित्वात नसते.

१४. **जलद निर्णय प्रक्रिया (Faster dicision making process) :** खाजगी क्षेत्रामध्ये एखाद्या धोरणाची अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा प्रतिसाद तपासण्याचा कालावधी कमी असतो. खाजगी क्षेत्रामध्ये निर्णय प्रक्रिया जलद असते. त्याच बरोबर प्रतिसाद पडताळणी कालावधी कमी असतो.

१५. **उपभोक्त्यांना चांगली सेवा (Better Customer Service) :** खाजगी कंपन्या बाजारात चांगली सेवा देतात कारण त्या नफ्यावर चालतात म्हणून खाजगी क्षेत्रातील उद्योजक उपभोक्त्यांना सेवा पुरविण्याच्या बाबतीत अतिशय संवेदनशील असतात. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत बाजारात स्पर्धा वाढलेली असते. हे खाजगी उद्योग स्पर्धात्मक वातावरणात कार्य करतात जिथे त्यंचे लक्ष दर्जेदार सेवा (Quality Service) प्रदान करून अधिक ग्राहक मिळविण्यावर असते. ग्राहकांची दखल ग्राहकांचे समाधान या गोष्टी खाजगी क्षेत्रात महत्वाच्या मानल्या जातात. याबाबत सार्वजनिक क्षेत्र उदासीन असते.

१६. **संसाधनांचा इष्टतम वापर (Optimum Utilisation of Resources) :** राष्ट्रीय संसाधनाचा योग्य वापर करण्यात सार्वजनिक क्षेत्र अपयशी ठरल्याचे निदर्शनास आले आहे. खाजगी क्षेत्र कार्यक्षमता राखून संसाधनांचा इष्टतम वापर करण्यात यशस्वी होऊ शकते.

१७. **वैयक्तिक प्रेरणा (Individual Motivation) :** खाजगी क्षेत्राचे यश हे नफ्याचे हेतूमध्ये असते. खाजगीकरण व्यवस्थापकांना एंटर प्राइझच्या कामकाजात बनविण्यास प्रवृत्त करते जेणेकरून महत्तम नफ्याची पातळी गाठता येईल.

**ब. खाजगीकरणाचे नकारात्मक परिणाम (Nagative impact of Privatization) :** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पायाभूत क्षेत्र व अवघड उद्योगासाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या सरकारने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. या प्रयोगाचा परिणाम म्हणून भारताची अर्थव्यवस्था स्वीकारली. या प्रयोगाचा परिणाम म्हणून भारताची अर्थव्यवस्था ३ टक्यांपेक्षा अधिक दराने वाढली नाही. १९९१ मध्ये अर्थमंत्री असलेल्या डॉमनमोहन सिंग यांनी खुल्या बाजार व्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यामुळे सरकारी कंपन्या खाजगी कंपनीच्या स्पर्धेत मागे पडू लागल्या. त्यांना स्पर्धाक्षम बनविण्याचे अनेक प्रयत्न फसल्यानंतर या कंपन्या खाजगी कंपन्यांना विकण्याचे म्हणजे 'निर्गुतवणूकीचे धोरण' अमलात आणून खाजगीकर्णाला वेग आला त्याचा नकारात्मक परिणाम पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) खाजगी उद्योगपतीच्या सामर्थ्यात वाढ (Increase the strengths of Private Entrepreneurs) :** खाजगीकरणामुळे मोठया प्रमाणावरील सार्वजनिक क्षेत्रात घट झाली तर खाजगी क्षेत्राचा व्याप व सामर्थ्य यामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. खाजगी क्षेत्राचा व्याप वाढला. त्यामुळे बाजारपेठेतील खाजगी क्षेत्राच्या हिस्यात वाढ झाली. परिणामी खाजगी उद्योगपतींचे सामर्थ्य वाढले.

**२) कमी उत्पन्न (Low Income) :** जेव्हा एखाद्या राष्ट्राचे शासन एखाद्या १०० टक्के सरकारी भागीदारी असलेल्या प्रकल्प किंवा उपक्रमांतून पूर्णतः किंवा अंशतः भागीदारी काढून घेते व ती खाजगी क्षेत्राकडे सुपूर्त करते. त्यास 'निर्गुतवणूक धोरण' असे म्हणतात. हे धोरण म्हणजे आर्थिक विकेंद्रीकरणाचा भाग असतो. उदा. टूरझिम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीची भाग विक्री झाली. ही कंपनी Indian Railway Corporation ची उपकंपनी असून याचे १०० टक्के भागभांडवल भारत सरकारकडे आहे. आता हे समभाग सरकारने विक्री करून स्वतःची गुंतवणूक काढून घेण्याचे ठरविले आहे. २०१८ ते २०२० या दोन आर्थिक वर्षात सरकारला एकूण ४० सरकारची कंपन्याची निर्गुतवणूक करायची होती यापैकी सन २०१८ - १९ मध्ये १५ कंपन्यांची निर्गुतवणूक करण्यात आली आहे. यातून सरकारला ८४ हजार ९७२ कोटी रुपये येणे अपेक्षित होते पण ७७ हजार ४१७ कोटी रुपये मिळाले. ( संदर्भ. लोकमत दैनिक २० जाने २०२०) निर्गुतवणूकीचा कार्यक्रम व्यवस्थितपणे कार्यान्वित करण्यात न आल्यामुळे सरकारला अपेक्षेपेक्षा खूपच कमी उत्पन्न मिळाले. खाजगीकरणामुळे सरकारने सार्वजनिक क्षेत्रावरील त्याचंही मालकी व नियंत्रण गमावले परंतु त्याचा पुरेपूर मोबदला मिळाला नाही. पर्यायाने समाजाचे सर्वच आघाड्यावर नुकसान झाले.

**३) निधीचा गैरवापर (Misuse of Fund) :** खाजगीकरणाच्या प्रक्रियेतून सरकारला मिळालेला निधी हा पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी, सार्वजनिक उद्योगापुढील समस्या सोडविण्यासाठी, समाजातील दुर्बल वर्गाच्या कल्याणासाठी व देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी खर्च झाला पाहिजे परंतु प्रत्यक्षात या निधींचा उपयोग योग्य कारणासाठी करण्यात आला नाही.

**४) भांडवलदारांची मक्तेदारी (The Monopoly of the capitalist class) :** खाजगीकरणामुळे सार्वजनिक उद्योगांच्या मक्तेदारीचे बुरुज एका मागून एक ढासळू लागले.

त्याचा वेगाने खाजगी भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण होण्याच्या प्रक्रियेचा वेग वाढू लागला. त्याचे परिणाम समाज व सरकारला जाणवू लागले.

**५) अपेक्षेप्रमाणे परिणाम नाही :** खाजगीकरणामुळे उत्पादन खर्चात घट होईल, उद्योगांच्या उत्पादनक्षमतेचा पूर्ण उपयोग करण्यात येईल, उत्पादनाचा दर्जा सुधारेल आणि व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल आणि यामुळे सर्वच उद्योगांना मोठया प्रमाणावर नफा मिळेल या सरकारच्या अपेक्षा प्रत्यक्षात उतरल्या नाहीत.

**६) बेकारीमध्ये वाढ (Increased the Unemployment) :** ज्या सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले त्या सर्व उद्योगांमध्ये कामगारांची संख्या कमी करण्यात आली. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात बेकारीचे प्रमाण वाढले. अनेक कामगार संघटनांनी यावर निषेध नोंदविला. उदा. कोळसा खाण कामगारांनी तेथील निर्गुतवणूकीच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी तेथील सर्व संघटनांनी संयुक्तपणे पाच दिवसाचा संप पुकारला. त्यामध्ये विक्रमी ७ लाख कामगारांनी भाग घेतला. (संदर्भ. महाराष्ट्र टाईम्स दैनिक वृत्तपत्र दि. २४ मार्च २०१६) अनेक उद्योगांमध्ये संपही घडवून आले. परंतु देशपातळीवर विचार करता या सर्वाचा परिणाम देशाच्या अर्थ कारणावर झालेला दिसून येत नाही. खाजगीकरणाचा स्वीकार केल्यापासून भारताची रोजगार परिस्थिती अतिशय खालावली आहे. १९९३ -९४ मध्ये रोजगार वाढीचा दर 2.४१% इतका होता. यामध्ये मोठया प्रमाणावर घसरण होऊन १९९४ ते २००० या कालावधीत ०.९८% नी घटला हा रोजगारवाढीचा दर कमी होण्याची करणे म्हणजे शेतीकडे करण्यात आलेले दुर्लक्ष आणि सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त पडे भरण्यात आलेली नसल्याने या कालावधीत रोजगार वाढीचा दर घटल्याचे दिसून येते.

**७) भ्रष्टाचाराचा आरोप (Blam of Curruption) :** निर्गुवणूकरणाच्या अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचाराचे झाल्याचे आरोप करण्यात आले . त्याचप्रमाणे खाजगीकरणाची प्रक्रिया पारदर्शकता नव्हती असेही आरोप करण्यात आले. उदा. मुंबईतील जुहू सेंटॉर या दोन हॉटेल्समधील निर्गुतवणूकीचा व्यवहार. देशाच्या सुरक्षिततेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या व ज्यांची कामगिरी उत्कृष्ट आहे. अशा काही निवडक सार्वजनिक उद्योगांना 'नवरत्न उद्योग' या नावाने गौरविण्यात आले. आणि कोणत्याही परिस्थिती नवरत्न उद्योगांचे खाजगीकरण करण्यात येणार नाही असे ठरविण्यात आले होते तरीही सरकारने भेल (BHEL) या उद्योगामध्ये पुनिर्गुतवणूकीची प्रक्रिया सुरु केली. डाव्या पक्षांनी यास जोरदार विरोध केला खाजगीकरणाच अवलंब केल्यापासून जे काही बदल घडून आले ते सर्व खाजगी भांडवदाराच्या हिताचे व खाजगी मक्तेदारीच्या विकासाला साहाय्यक ठरतील असेच आहेत. खाजगीकरणामुळे कामगाराचे हित, देशहित व देशाच्या अर्थव्यवस्थेत बळकटी तसेच दुर्बल घटकांचा विचार व विकास अजिबात झाला नाही.

## ९.५ उदारीकरण संकल्पना आणि उदारीकरणाचे परिणाम

२४ जुलै १९९१ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही.नरसिंह राव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी ऐतिहासिक अर्थसंकल्प सादर करून देशात उदारीकरणाचे रणशिंग फुंकलं आणि भारतात उदारीकरणाला सुरुवात झाली. या घटनेला ३१ वर्षे होत आहेत.

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या त्रिसूत्री मधील उदारीकरण किंवा शिथिलीकरण ही एक महत्वाची संकल्पना आहे. या संकल्पनेत नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या जागी बाजाराभिमुख खुल्या व मुक्त स्पर्धेवर आधारित अर्थव्यवस्था ही उदारीकरण प्रक्रियेतील मूळ संकल्पना आहे

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. देशाच्या आर्थिक व्यवस्थेत विकासाच्या दिशेने करण्यात येणारी सुधारणात्मक उपायांची एक साखळी म्हणजे 'आर्थिक उदारीकरण' होय. हि संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरूपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.उदारीकरण म्हणजे अर्थ व्यवस्थेमध्ये लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रणे काढून टाकणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे, सरकारच्या सहभागाचे क्षेत्र मर्यादित करणे, उद्योजकांना व व्यावसायिकांना सोयी व सवलती पुरविणे, त्यांना पुरेसे स्वातंत्र देणे, देशी परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि एकंदरीने अर्थव्यवस्था अधिक मुक्त, पारदर्शी व स्पर्धात्मक करणे होय.

थोडक्यात जागतिकीकरण हे मुक्त अर्थव्यवस्थेचं अंतिम हे लक्ष गाठण्यासाठी उदारीकरण असे म्हणतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन, गुंतवणूक आयात-निर्यात इत्यादीवरील परवाना पद्धातीसारखे जाचक निर्बंध, नियंत्रणे व नियम कमीत कमी करण्याच्या धोरणाला समावेश उदारीकरणाच्या प्रक्रियामध्ये होतो.

उदारीकरणाची प्रक्रिया कार्यन्वित करण्यासाठी १९९९ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात काही उद्योगधंद्यांचा अपवाद वगळता (स्फोटकांचे उत्पादन करणारे उद्योग. संरक्षण विषयक उत्पादने. अल्कोहोलची उत्पादने. सिगारेट धोकादायक रसायने औषधे) इतर सर्व उद्योगांना परवाना पद्धतीच्या निर्बंधातून मुक्त करण्यात आले. विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहित करण्यासाठी 'विदेशी गुंतवणूक प्रवर्तक मंडळाची' स्थापना करण्यात आली. उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग केल्या जाणाऱ्या उद्योगामध्ये १००% परकीय गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली.

**उदारीकरणाची व्याख्या :**

१. उदारीकरण म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य किंवा आर्थिक निर्णयाचे स्वातंत्र्य. याचाच अर्थ उपभोक्ते, उत्पादक तसेच उत्पादन घटकांचे मालक त्यांच्या स्वहितासाठी स्वतः निर्णय घेऊ शकतात.

२. डॉ एम रामाजेनेयल यांच्या मते, 'आर्थिक गुंतवणूक, आयात व उत्पादक यावरील अनावश्यक बंधने न नियंत्रणे तसेच परवाने काढून टाकणे होय'

३. बाजार यंत्रणा आणि मुक्त स्पर्धेच्या कार्यप्रणालीतील अडथळे पूर्णपणे काढले नाहीत तरी ते कमी करण्यासाठी जे आर्थिक धोरण चालना देते त्याला आर्थिक उदारीकरण म्हणतात.

४. सरकारी नियंत्रण कमी करणे म्हणजे उदारीकरण होय.

५. शासकीय बंधने कमी करणे म्हणजे उदारीकरण होय.

आर्थिक उदारीकरणासाठी उपाययोजना : भारतात जरी उदारीकरणाचा प्रारंभ झाला असला तरी १९९१ पासूनच खऱ्या अर्थाने उदारीकरणाला सुरवात झाली त्यासाठी भारत सरकारने आर्थिक उदारीकरणासाठी पुढील उपाय योजना केल्या आहेत.

१. परवाना धोरणात उदारमत वादाचा स्वीकार केला.

२. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले.

३. विदेशी तंत्रज्ञाला प्रोत्साहन देण्यात आले.

४. मक्तेदारी आणि प्रतिबंधक व्यापार प्रथा कायद्याचे उच्चाटन करण्यात आले.

५. खाजगी क्षेत्राला परवानगी देण्यात आली.

६. राज्याची उद्योगातील मक्तेदारी हळूहळू संपुष्टात करण्यात आली.

७. परदेशी देशांना बाह्य व्यापार आणि पेमेंट सुलभ करण्याच्या उद्देशाने आणि भारतातील परकीय चलन बाजाराच्या सुव्यवस्थित विकासास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, भारत सरकारने १९९९ मध्ये परकीय चलन विनिमय कायदा (Foreign Exchange Managemaent Act) पारित केला.

८. उदार व्यापार धोरणाचा विकास करण्यात आला.

९. व्याजदरावरील नियंत्रणे रद्द केली.

उदारीकरणाचा भारतीय उद्योगावरील परिणाम (Imapact of The Liberalization) उदारीकरणाचा मूळ हेतू खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना सर्व प्रकारच्या सवलती मिळवून देणे, त्याच्या समस्या सोडविणे व अडचणी दूर करणे हा आहे. सोप्या शब्दात खाजगी उद्योगावरील सरकारी नियंत्रणे कमी करणे व त्यांना मोठया प्रमाणवर स्वतंत्र्य देणे हया उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब सरकारने केला.

**भारतीय उद्योगांवर उदारीकरणाचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात -**

१) **खाजगी उद्योगांना अनेक सवलती :** सरकारी पातळीवरून उदारीकरणाचे धोरण राबविण्याचे ठरविल्यामुळे खाजगी कारखानदारांवर सवलतींचा वर्षावच झाला. यामुळे सरकारची खाजगी उद्योगांविषयीची भूमिका मित्रत्वाची झाली. मक्तेदारी प्रतिबंध कायद्यामधील जाचक तरतूदी काढून टाकण्यात आल्या परवाना पद्धतही रद्द करण्यात आली. त्याचप्रमाणे लघुउद्योगातील गुंतवणूकची मर्यादा ३ कोटी रु. पर्यंत वाढविण्यात आली.

२) **स्पर्धेमध्ये वाढ :** उदारीकरणाच्या धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली. यामुळे देशातील उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड द्यावे लागते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात थोडेफार चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

३) **उत्पादनात वाढ नाही :** उदारीकरणानंतरच्या काही वर्षामध्ये म्हणजे १९९४-२००२ या कालखंडामध्ये औद्योगिक उत्पादनाच्या वार्षिक वाढीचा सरासरी दर कमी झाल्याचे दिसून येते. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रामध्ये अशाप्रकारे घट दिसून येते. म्हणजेच सरकारकडून उदारीकरणाचे धोरण राबविण्यासाठी करण्यात येणारी उपाय योजना योग्य नव्हती असे म्हणता येईल.

४) **सार्वजनिक उद्योगांच्या कार्यक्षमतेत वाढ :** उदारीकरणा अगोदरची सार्वजनिक उद्योगाची कार्यक्षमता व उदारीकरणानंतरची सार्वजनिक उद्योगांची कार्यक्षमता याचा आढावा घेतल्यास उदारीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी निश्चितच समाधानकारक होती. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी सुधारणे अपेक्षित होते परंतु प्रत्यक्षात सार्वजनिक उद्योगांच्या कामगिरीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसून येते.

५) **विदेशी उद्योगांचे वर्चस्व :** उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे उद्योगाचे एकत्रीकरण आणि एका उद्योगाने दुसरा उद्योग ताब्यात घेण्याचे अनेक प्रकार घडून आले. ताबा घेणाऱ्या उद्योगामध्ये विदेशी कंपन्यांचा भरणा जास्त होता. 'खाउजा' प्रक्रियेमुळे विदेशी गुंतवणूकदारांना व विदेशातील कंपन्यांना ज्या सवलती मिळाल्या, त्या सवलतीच्या हया कंपन्यांनी उपयोग करून घेतल्यामुळे भारतातील उद्योगांच्या मालकीचे हस्तांतर विदेशी कंपन्याकडे मोठया प्रमाणावर झाले.

६) **बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व :** उदारीकरणाचे धोरण राबविण्यासाठी भारत सरकारने कंपन्यांच्या समभागाची विक्री करण्याचे ठरविले. त्यावेळी बहुराष्ट्रीय कंपन्यानी भारतीय कंपन्याच्या समभागाची खरेदी मोठया प्रमाणावर केली. परिणामतः भारतीय उद्योगांना देशामध्येच बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते.

७) **आधुनिक उत्पादन तंत्र :** उदारीकरणानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण झाली त्यामुळे मोठया प्रमाणावरील स्पर्धेला तोंड देण्यसाठी आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर मोठया प्रमाणावर होऊ लागला. उदारीकरणानंतर भारतीय उद्योजकांमध्ये अशाप्रकारची जागरुकता निर्माण झाली. विदेशातून आधुनिक तंत्रज्ञान मिळवून त्यांचा उपयोग भारतात मोठया प्रमाणावर होऊ लागला.

८) **संशोधन व विकासावर खर्च :** उदारीकरणानंतर मोठया प्रमाणावर स्पर्धा वाढली. मोठया प्रमाणावरील जागतिक स्पर्धेचा सामना करण्यासाठी भारतीय कंपन्यांनी संशोधन व विकासावर पुरेसा खर्च करण्यास सुरुवात केली. अनेक कंपन्यांच्या संशोधन व विकास खर्चामध्ये वाढ झाली. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या व गुणवत्तेच्या वस्तूचे उत्पादन करून भारतीय कंपन्यांनी जागतिक स्पर्धेला तोंड देऊन उदारीकरणाचा फायदा करून घेतला आहे.

९) **लघु उद्योगांना अनेक समस्या :** भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासात लघु उद्योगांची भूमिका फार महत्त्वाची आहे. उदारीकरणामुळे मोठया व खाजगी उद्योजकांनाच मोठया प्रमाणावर सोयी व सवलती मिळाल्या. त्यातुलनेत लघु उद्योगांना उदारीकरणाचा काही फायदा झाला नाही. लघुउद्योगांचे भांडवल, साधने व उत्पादन मर्यादित असल्याने त्यांना जागतिक स्पर्धेला तोंड देणे अशक्य होऊ लागले. उदारीकरणामुळे भारतातील लघु उद्योगांवर विपरीत परिणाम घडून आला, त्यांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाच्या तीव्रतेमध्ये वाढ झाली.

१०) **कामगार कपात :** उदारीकरणाच्या धोरणामुळे जे बदल घडून आले, त्यामुळे कामगारांच्या हालाखीत वाढ झाली. उदारीकरणानंतर टाळेबंदी, कंपन्या बंद करणे, व

कामगार कपात याचे प्रमाण वाढले. अनेक कंपन्यामध्ये स्वेच्छा निवृत्ती (VRS) राबविण्यात आल्या. उदारीकरणामुळे भारतीय उद्योगावर काही सकारात्मक (Positive) तर काही नकारात्मक (Negative) परिणाम झाले. एकंदरीत विचार करता उदारीकरणामुळे भारतीय उद्योग स्पर्धाक्षम बनले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्यांच्या शक्तीमध्ये काढा झाली.

## ९.६ नवीन आर्थिक धोरणाचे यश व अपयश

जुलै १९९१ पासून पी.व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने ज्या व्यापक आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या त्या कालावधीस सुधारणांचेनवे पर्व किंवा नवीन आर्थिक धोरण म्हणता येईल. हे आर्थिक धोरण म्हणता येईल. हे आर्थिक धोरण जाहीर केल्यावर आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे मुलभुत स्वरूपाचे बदल केले. आर्थिक सुधारणांचा स्वैअक्र करून जवळ तीन दशकाचा काळ लोटला. या ३२ वर्षाच्या काळात आर्थिक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत कोणते बदल झाले याचे अवलोकन केले तर काही परिणामांचा सामना करावा लागत आहे असे दिसून येते.

**१. आर्थिक सुधारणांचे दर उंचावला :**

आर्थिक सुधारणामुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील वाढ झाली. विदेशातील प्रगत तंत्रज्ञान शोध संशोधन विदेशी भांडवल यामुळे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा विकास होण्यास मदत झाली व या बदलामुळे आर्थिक विकासाचा दर उंचावला. १९९१ मध्ये विकासाचा दर केवळ ०.५ टक्के होता तो २०२२ मध्ये ७ टक्के झाला आहे.

**२. राजकीय तुट कमी झाली :**

१९९० अंदाजपत्रकातील राजकोषीय तुट ६.६ टक्के होती ती १९९७ मध्ये ४.१ पर्यंत कमी झाली आहे. नवीन आर्थिक सुधारणामुळे ही तुट कमी होण्यास मदत झाली आहे.

**३. व्यवहार तोलातील तुट कमी झाली :**

आर्थिक सुधारणामुळे भारताच्या व्यवहारतोलातील तुट कमी होण्यास मदत झाली. १९९० मध्ये ही तुट ९६८० दशलक्ष डॉलर्सपर्यंत कमी झाली.

**४. मुद्रास्फितीच्या दारात घट :**

ऑगस्ट १९९१ मध्ये भारतात मुद्रास्फितीचा दर १७ टक्के होता. आर्थिक सुधारणेचा अंमल केल्यामुळे हा दर १ मार्च २००३ मध्ये ४.६९ टक्के पर्यंत कमी झाला

**५. निर्यातीत वाढ :**

आर्थिक सुधाराणामुळे निर्यातीत वाढ झाली. आर्थिक सुधारणाचा एक भाग म्हणून भारत सरकारने 'खाउजा' धोरण स्वीकारले आणि त्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षमता वाढून सरप्लस झालेल्या उत्पादनाची निर्यात वाढली.

### ६. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे विविध क्षेत्रातील गुंतवणूकीचे वाढते प्रमाण :

१९९१ मध्ये भारत सरकारने 'खाउजा' धोरणाचा अवलंब केला असल्यामुळे भारतीय उद्योगक्षेत्रात विदेशी भांडवल गुंतवणुकीला वेग आला व त्यामुळे बहुराष्ट्रीय निगमांचा भारतीय अर्थव्यवस्थेत शिरकाव होऊन (ॲपल वास्किान रॅबिन्स, इंटेल कॉर्पोरेशन, ओरॅकल, आयटीसी लिमिटेड, अडिदास, एम्फसिस, कॅडबरी, कॅल्टेक्स, केएफसी, गुगल, टेटली द वॉल्ट डिझनी कंपनी, नोकिया, पिझ्झा हट, पेपॅल, पेप्सिको, बर्गरकिंग, मॅक्डॉनल्डस, मोटारोला, रॉयल डच शेल, व्हर्जिन मोबाईल, सॅमसंग, सोनी, हिंदुजा समुह, हिंदुस्थान युनिलिव्हर) अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विकास होऊ लागला. बहुराष्ट्रीय कानापानी आणि निगम यांच्याकडे असणारे अतिविशाल विदेशी भांडवल भारतात आनिअल्य जाईल हया उद्देशाने काही बंधने घालून कंपनीला भारतात व्यापार करण्याची परवानगी देण्यात आली त्यामुळे अर्थ व्यवस्थेच्या विविध क्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण वाढले. सामान्यतः ही गुंतवणूक अशा उद्योगधंद्यांत करण्यात आली की जे उद्योगधंदे आपल्या उत्पादनाची निर्यात करतात. उदा. सुजुकी हया जपानी कंपनीने भारत सरकारबरोबर 'मारुती उद्योग लि' या संयुक्त साहसी उपक्रमात फार मोठया प्रमाणात गुंतवणूक केली.

### ७. पायाभूत उद्योगांमध्ये गुंतवणूक :

बहुराष्ट्रीय कंपन्याची वित्तीय संसाधनांवर असणारी पकड आणि पुरेपुर असा उपयोग ह्यामुळे हया बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातील पॉवर प्रोजेक्ट एअरपोर्ट व रेल्वे तसेच टेलिकम्युनिकेशन यासारख्या पायाभूत उद्योगांमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे भारतात औद्योगिक विकासाला चलना मिळत आहे. आताच्या भाजप सरकारने COMMON MINIMUM PROGRAMME नुसार अशी अपेक्षा करण्यात आलेली आहे की प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (Foreign Direct Investment;FDI) ही प्रामुख्याने १. पायाभुत सुविधा २. उच्च तंत्रज्ञान ३. निर्यात ४. स्वदेशी संपत्ती आणि ५. रोजगार हया क्षेत्रात निश्चितच क्रांती करेल.

### ८. तांत्रिकतेची अदलाबदल (Transfer of Technology) :

उपलब्ध साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर कार्य क्षमता आणि उत्पादकता यात वाढ हे तंत्रज्ञाच्या वापरावर अवलंबून असते. नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमधील विविध क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि तांत्रिक बाबींची आयात झाली त्यामुळे कामगारांची उत्पादन क्षमता वाढली. बहुराष्ट्रीय कंपन्याचे नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत आगमन होताना त्यांनी आपल्या सोबत फक्त विदेशी भांडवल तसेच यंत्रसामुग्रीच आणली नाही तर कुशल व कौशल्य प्राप्त कर्मचारी सुद्धा आणले. परिणामी भारतीय अभियंतांना हया नवीन तंत्रज्ञानाची माहिती झाली व ते त्याचा उपयोग सुद्धा करू लागले.

### ९. विना कर्ज भांडवलाच्या अंतप्रवेशाची निर्मिती :

१९९१ च्या आर्थिक धोरण स्वीकारण्यापूर्वी सरळ गुंतवणुकीला परवानगी नाकारण्यात येत होती तेव्हा भारत देशाला विदेशातून कर्ज घेऊन विदेशी भांडवलाची निर्मिती करावी लागत होती. ह्यामुळे भारतावरील कर्जाच्या त्यावरील व्याजाच्या व त्याच्या संबंधात सेवाच्या

राशीत वर्षानुवर्षे वाढत होत होती. भारताच्या एकूण आयातापैकी जवळपास ३५ प्रतिशत राशी विदेशी ऋणाच्या व व्याजाच्या शोधनात जात असे. हया परिस्थितीमुळे जगातील विकसित देशांमध्ये भारताची प्रतिमा थोडी काळवंडली होती. भारतात जर आपण विदेशी कंपन्यांना व्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहन दिले तर हया कंपन्या भारतात दिदेशी भांडवल आणतील आणि हया राशीतून भारत आपल्या कर्जाची परतफेड करू शकेल. तसाच पुन्हा हाही एक विचार करण्यात आला की जेव्हा हया कंपन्या आपल्या निर्यातीतून नफा मिळवतील त्यापैकी काही हिस्सा विदेशी चलनाच्या रुपात भारताला मिळेल. म्हणजेच भारताच्या एकूण विदेशी चलनात वाढ होवून भारतावर असलेले विदेशी कर्ज भारत परत करू शकेल व आपला विदेशी शोधनशेष अनुकूल करून घेईल.

**१०. स्पर्धा क्षमतेत वाढ :**

बंदिस्त अर्थव्यवस्थेमुळे ठराविक मक्तेदारींची मक्तेदारी निर्माण होते मक्तेदारांकडून ग्राहकांचे आर्थिक शोषण होते. स्पर्धक नसल्यामुळे निकृष्ट प्रतीचा वस्तूही मोठया प्रमाणात जास्त किंमतीला विकल्या जातात. 'खाउजा' धोरणामुळे देशी आणि विदेशी वस्तू व सेवाच्या उत्पादनामध्ये व विपणनामध्ये स्पर्धा सुरु होते. त्यातून वस्तुंचादर्जा सुधारून ग्राहकांना फायदा होतो.

**११.राहणीमानाच्या दर्जेत सुधारणा :**

नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत अधिकाधिक उत्पादनाच्या विविध क्षेत्रात दर्जेदार वस्तू व सेवा सहजतेने उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्याचा उपभोग घेऊन भारतीय उपभोक्तांचा राहणीमानाचा स्त्र उंचावत आहे.

**१२. नगदरहित अर्थव्यव्हारात वाढ :**

नवीन आर्थिक धोरण स्विकारल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत अधिकाधिक व्यवहार डिजिटल माद्यामांद्वारेपूर्ण करण्याच प्रमाण हळूहळू वाढत आहे. यात प्रामुख्याने इ वॉलेट, डेबिट कार्ड केडिटकार्ड, युपीआय, मायको एटीएम, मोबाइल वॉलेट, पेटीएम पे, गुगल पे, पे फोन, तेज अॅप, भीम अॅप, डिजिटल पेमेंट, मोबाइल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, आरटिजीएस, एनईएफटी, आधारकार्डच्या सहाय्याने धनादेश इत्यादी नगदरहित (Cashless) अर्थव्यवहारात वाढ होत आहे.

**१३. डिजिटल सेवाच्या माध्यमाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल :**

नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून भारतात डिजिटल सेवांच्या माध्यमातून भारतसरकारने जनतेला सशक्त बनविण्याचा विडा उचलला आहे त्यांचे दृश्यपरिणाम म्हणजे १. जनधन आधार मोबाईल (JAM) च्या माध्यमातून मध्यस्थ, दलाल आणि बनावट अर्ज दारांपासून मुक्तता मिळाली आहे. मे, २०२२ पर्यंत २२.७७ लाख कोटी रुपयांहून अधिक निधि लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट हस्तांतरित केला आहे. २. 'एक देश एक शिधापत्रिका' अंतर्गत देशभरातील ५.३७ लाख रेशन दुकानांमधून अन्नधान्य घेण्याची सुविधा पुरवली गेली आहे. ३. स्वामित्व योजनेअंतर्गत १.४५ लाख गावांमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाचा साहाय्याने भू. सर्वेक्षण पूर्ण झाले आहे तसेच ४४ हजारांपेक्षा अधिक

गावांमध्ये ७५ लाख मालमत्ता कार्ड जारी करण्यात आले आहेत. ४. डिजिटल सेवांच्या पूर्ततेसाठी ४.९४ लाख सामायिक सेवा केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. ५. जलदगतीने इंटरनेट कनेक्टीव्हिटीसाठी १.७० लाख गावे ऑप्टिकल फायबर नेटवर्कशी जोडली गेली आहेत. ६. जेम (Gem) पोर्टलमुळे सरकारी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आली आहे. ७. को. बिन सुविधेमुळे कोविड लसीकरण सुलभ झाले आहे. ८. डिजीलॉकर सुविधेमुळे कागदी दस्ताऐवज सांभाळण्याची आवश्यक उरली नाही.

**आर्थिक सुधारणांचे अपयश :**

**१. निर्यातीपेक्षा आयातीत जास्त वाढ :** प्रतिकूल व्यवहार तोलची समस्या लक्षात घेता आयातीत घट होणे आवश्यक आहे मात्र तसे दिसत नाही नवीन आर्थिक धोरणांचा स्वीअकर केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत निर्यातीपेक्षा आयातीत जास्त वाढ होत आहे.

**२. रोजगारात घट :** औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणात नवीन आर्थिक सुधारणा कालखंडात अद्ययावत यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान वापरात दिवसेंदिवस वाढ होत आहे त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही.

**३. लघूउद्योग अडचणीत :** आर्थिक सुधारणांमुळे भारतातील लघूउद्योग अडचणीत आले आहेत. आधीच या उद्योगाकडे भांडवलाची कमतरता आहे त्यात जागतिक स्पर्धेल तोंड द्यावे लागते.

**४. भाववाढीचे नियंत्रण करण्यास अपयश :** आर्थिक सुधारणांचा स्वीकार केल्यामुळे देशात किंमत स्थैर्य प्रस्थापित होईल अशी अपेक्षा होती तथापि, ही अपेक्षा पूर्ण झाली नाही. दैनंदिनी जीवनावश्यक वस्तू आणि पेट्रोलजन्य पदार्थाच्या किनाम्ती वाढत आहेत.

**५. आर्थिक सुधारणांचे अयोग्य संघटन :** आर्थिक सुधारणावर अशी तिका केली जाते की आर्थिक सुधारणांचे संघटन योग्य प्रकारे होत नाही. आर्थिक सुधारणा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने वित्तमंत्रालयाद्वारे जर काही बदल सुचविण्यात आले तर ते बदल रिझर्व्ह बँक नामंजूर करते.

**६. आर्थिक सुधारणेचे लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहचले नाही :** आर्थिक सुधारणेचे लाभ हे फक्त उच्चभू समाजपर्यत पोहचले. तळागाळातील बहुजन समाज हा या लाभांपासून वंचित राहिला.

**७. उपभोक्तावाद आणि सांस्कृतिक आक्रमण :** पी.व्ही. नरसिंहराव सरकारने १९९१ रोजी 'खाऊजा' धोरणाचा स्वीकार केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था बहुराष्ट्रीय कंपन्याचा (MNCs) शिरकाव झाला. उदाहरणार्थ केंडबरी, कोकोकोला कॉर्पोरेशन, कोलगेट पामोलिव्ह, जिलेट, पेपसी कॉर्पोरेशन, फिलिप्स, सोनी कॉर्पोरेशन, सुझुकी, टाइमेक्स, युनिलिव्हर, सेमसंग (SAMSUNG), हवाई (HUAWEI) नोकीया (NOKIA), ॲपल (APPLE), एलजी (LG), आणि झेडटीइ (ZET) या कंपन्यांनी लोकांना नवीन गोष्टीचे वेड लावले आहे. या कंपन्या दैनंदिनी वापरातील सॉफ्ट ड्रिक्स, हेअर शेंप्पू, केसाचे तेल, लिपस्टिक इत्यादी वस्तू बनवतात तसेच काही कंपन्या प्रसारमाध्यमातील असून या कंपन्या आकर्षक जाहिरात करून लोकांना त्यांचा उत्पादित वस्तू विकत घेण्यासाठी भाग पाडतात. आणि ग्राहक वादाला खतपाणी घालतात. परिणामी भारतीय संस्कृतीच्या मुल्यांवर घाला घालतात अशीही टिका केली जाते.

## ९.७ सारांश

जागतिकीकरण हा एक शब्द आहे जो वेगवान आणि व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील देशांचे एकीकरण आणि परस्परावलंबन सूचित करतो. जागतिकीकरणाचे परिणाम परंपरा, पर्यावरण, संस्कृती, सुरक्षा, जीवनशैली आणि कल्पनांवर दिसू लागले आहेत. जगभरात जागतिकीकरणाच्या ट्रेंडवर परिणाम करणारे आणि गती वाढवणारे अनेक घटक आहेत. जागतिकीकरणाचा परिणाम जगभरातील जवळपास सर्वच देशांवर सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मानसशास्त्रीय अशा विविध मार्गांनी झाला आहे.

## ९.८ सरावासाठी प्रश्न

योग्य पर्याय निवडा.

१. साधारण जागतिकीकरण ही कोणत्या प्रकारची प्रक्रिया आहे.

अ. आर्थिक ब. सामाजिक क. औद्योगिक ड. वरील सर्व

२. जागतिकीकरण कोणत्या सीमांचे उल्लंघन होत आहे.

अ. सामाजिक ब. आर्थिक क. भौगोलिक ड. व्यापार वाणिज्य

३. कोणत्या कार्यक्रमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली.

अ. समाजसुधारणेच्या कार्यक्रमातून ब. आर्थिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमातून

क. राजकीय सुधारणेच्या कार्यक्रमातून ड. सांस्कृतिक परिवर्तनाच्या कार्यक्रमातून

४. बहुसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या कोणत्या राष्ट्रांच्याच आहेत.

अ. अविकसित ब. विकसित क. विकसनशील ड. ऑफ्रीका

५. कोणाच्या मते जागतिकीकरण म्हणजे 'उपभोग्य वस्तूंच्या सर्व आयातीवरील नियंत्रण समाप्त करणे'.

अ. जागतिक बॅक ब. आय. सी. आय. सी. बँक

क. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने ड. श्रवण कुमार सिंग

**<u>सरावासाठी प्रश्न :</u>**

१. नवीन आर्थिक धोरणाचे यश व अपयश स्पष्ट करा.
२. खाजगीकरणा व्याख्या देऊन त्याचे सकारात्मक परिणाम स्पष्ट करा.
३. खाजगीकरणाची व्याख्या सांगून त्याचे नकारात्मक परिणाम स्पष्ट करा.
४. उदारीकरणाची संकल्पना आणि त्याचे परिणाम थोडक्यात विशद करा.
५. जागतिकीकरणाची संकल्पना विशद करून त्यांच्या व्याख्या व वैशिष्टये थोडक्यात स्पष्ट करा.
६. जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाविषयी चर्चा करा.

## ९.९ **संदर्भ पुस्तके**



१. भारताची अर्थरचना, डॉ.मुकुंद महाजन निराली प्रकाशन १९९८

२. भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, डॉ.मुकुंद महाजन निराली प्रकाशन पुणे २००७

३. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास, भाग १. प्रा. एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००३

४. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग २, एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००३

५. कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, देसाई भालेराव, निराली प्रकाशन

६. भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टिक्षेप, प्रा. डी. आर. जगन्नाथ, प्रा. सौ. निता वाणी, डॉ. मंगल जंगले, प्रा. डी. जी. पाटील प्रशांत प्रकाशन २०११

७. पायाभूत अभ्यास, प्रा. एम.एस.लिमण, प्रा. एम. जे. वाघमारे, शेठ प्रकाशन, मुंबई २००७

❖❖❖❖

**( वेळ : तीन तास )** **(गुण -१००)**

**Please check whether you have got the right question paper**

**सूचना- १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**
**२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**
**३) उजवीकडील अंक उपप्रश्नांचे गुण दर्शवितात.**

**प्र. १** भू प्रदूषणाची विविध करणे स्पष्ट करा **१४ गुण**

**किंवा**

**प्र. १** भू प्रदूषणाचे परिणाम सांगा **१४ गुण**

**प्र. २** जमिनीच्या उप-विभाजनाची करणे सांगा **१४ गुण**

**किंवा**

**प्र. २** स्थलांतराचे परिणाम स्पष्ट करा **१४ गुण**

**प्र. ३** दारिद्र्याची करणे सांगा **१४ गुण**

**किंवा**

**प्र. ३** दारिद्र्याचे परिणाम स्पष्ट करा **१४ गुण**

**प्र. ४** खाजगीकरणाचा शेतीवर झालेला परिणाम विशद करा **१४ गुण**

**किंवा**

**प्र. ४** उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पना स्पष्ट करा **१४ गुण**

**प्र. ५ खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा द्या** **१४ गुण**

अ. जमिनीचे तुकडीकरण
ब. स्थलांतराची करणे
क. बेरोजगारीची करणे
ड. जागतिकीकरणाचा ग्रामीण परिणाम